म. ग्रं. सं. ठाणें

विषय

लेखक वैद्य. बा. दि

सन

ग्रहालय क्रमांक

पुस्तकाचें नांव चमत्कारिक नाटक

# चमत्कारिक नाटक.

किंमत ० आणे.

नाटक

D. B. JAYAVANT'S
LIBRARY
BOOK No.

# चमत्कारिकनाटक.

हें पुस्तक,

बाळकृष्ण दिनकर वैद्य कल्याणकर

ह्यांनीं तयार केलें;

तें

मुंबईंत

जावजी दादाजी यांनीं

"निर्णयसागर" छापखान्यांत छापून प्रसिद्ध केलें.

( सन १८६७ च्या २५ व्या आक्टाप्रमाणें रजिस्टर करून या पुस्तका-
संबंधी सर्व हक्क प्रसिद्धकर्त्यानें स्वाधीन ठेविले आहेत. )

सन १८८९. शके १८११.

किंमत १० आणे. Postage 0-1-0

# अभिप्राय.

## रा. रा. बळवंतरावजी वैद्य मु. कल्याण, यांसीं,

वि. वि., तुह्मीं केलेल्या चमत्कारिक नाटक नांवाच्या नाटकाचा हस्तलिखित खर्डा मी साद्यंत वाचून पाहिला. हें नाटकही पूर्वींच्या बंधु* नाटकाप्रमाणेंच उत्तम झालें आहे. शिक्षण नसलेल्या भोळ्या बायकांस लबाड बैरागी कसे फसवितात, सामुद्रिकादि लंगड्या शास्त्रांच्या सिद्धांतांवर विश्वास ठेविल्यानें कसे अनर्थ होतात, व सांप्रतच्या पद्धतीप्रमाणें कॉलेजांत मिळालेल्या शिक्षणाचे योगानें ज्यांचीं मनें संस्कृत झालीं आहेत ते तरुण लोक आपल्या ठाम झालेल्या मतांस किती निग्रहानें चिकटून राहतात, या गोष्टी या नाटकांत फार उत्तम तऱ्हेनें दाखविलेल्या आहेत. या नाटकांत करुणरसाची परमावधि झालेली आहे. चिंगीचें विहिरींत जीव देणें, तिची माता सत्यभामा इचा शोक, व चिंगीच्या नवऱ्याला दुःसह शोकामुळें आलेली मूर्च्छा हा सर्व प्रकार रंगभूमीवर मार्मिक पात्रांनीं केलेला पाहून नेत्रांत अश्रु ज्याच्या येणार नाहींत असा पुरुष किंवा स्त्री या जगतीतलावर असेल असें मला वाटत नाहीं.

या पद्धतीप्रमाणेंच ऐतिहासिक विषयांवर नाटकें लिहिण्याचा आपला विचार आहे तो फार उत्तम आहे. तशा तऱ्हेचीं नाटकें लोकांना विशेष प्रिय होतील असें वाटतें. कळावें लोभ असावा, हे विनंति.

आपला,

**जनार्दन बाळाजी मोडक,**

**हेडमास्तर, बैरामजी जीजीभाई हायस्कूल, ठाणें.**

---

रा. रा. बाळकृष्ण दिनकर वैद्य कल्याणकर ह्यांनीं केलेल्या चमत्कारिक नाटकाची हस्तलिखित प्रत मीं आज समग्र वाचली. ह्या पुस्तकांतील पात्रांची योजना फार उत्तम झाली आहे. तात्या

---

* ह्या नाटकाचें नांव छापते वेळेस बदलून संसारचित्रनाटक या नांवानें तें प्रसिद्ध केलें आहे.

नांवाचें एक पात्र कल्पिलें आहे, त्यानें जीं एकेक कृत्यें केलीं आहेत तीं पाहून क्षणभर अंतःकरण तटस्थ होऊन जातें. असलीं कपटशिरोमणि माणसें जगांत असतात हें प्रत्येक मनुष्याला कळलें पाहिजे. अल्पवयी चिंगीच्या पात्राकडून सच्छील मनुष्याचें वर्तन कसें असतें हें स्पष्ट कळून येतें. तिचा पति बाळासाहेब हा सुशिक्षित विद्वान् कल्पिला आहे; व त्याचें जें आचरण ह्या नाटकांत दाखविलें आहे तें कित्ता घेण्यासारखें आहे. ह्या नाटकांत विदूषक नाहीं; पण टकूआत्या नांवाचें एक विधवा पात्र कल्पिलें आहे तें उत्तम हास्यरस उत्पन्न करतें व हाच ह्या नाटकांतला विदूषक असें भासवितें. ह्या नाटकांत भोळे व भाविक लोकांच्या मनावर सामुद्रिक लक्षणांसारख्या कल्पनिक भीतीचे किती विलक्षण परिणाम होतात हें स्पष्ट दाखविलें आहे. कुलीन स्त्रियांना देखील वाचण्याला, ऐकण्याला, व पहाण्याला योग्य अशी ह्या नाटकाची योग्यता आहे. स्त्रियांनीं एक वेळां तरी हें पुस्तक वाचावें अशी मी शिफारस करितों. एकंदरीला हें पुस्तक चांगलें मनोरंजक झालें आहे. भाषा सोपी असून चटकदार आहे. ह्या ग्रंथकर्त्याचे कित्येक ग्रंथ ( दक्षिणाप्राइज कमेटीकडून बक्षिसें मिळालेले ) माझ्या पाहण्यांत आहेत. पण नाटकरचनेचा ह्यांचा हा दुसराच यत्न आहे. ह्यापूर्वीं संसारनाटक किंवा बंधुनाटक ह्या नांवाचा ग्रंथ त्यांनीं केलेला मीं पाहिला आहे. त्यापेक्षांही ह्याची रचना उत्तम झाली आहे असें मला वाटतें. ह्या पुस्तकांत करुणरसाची तर अगदीं कमाल करून सोडली आहे. मी अशी शिफारस करतों कीं ग्रंथकर्त्यानें हें नाटक लौकर छापून प्रसिद्ध करावें. व नाटककारांनीं अकाळविकाळ ओरडणाऱ्या राक्षसांचीं पात्रें रंगभूमीवर आणून प्रेक्षकांच्या कांटाळ्या बसविण्यापेक्षां असल्या नाटकाचे जर प्रयोग तयार केले तर त्यापासून जनसमाजाचें खचित हित होईल असा माझा अभिप्राय आहे.

तारीख ५, माहे मार्च १८८८.

सीताराम श्रीधर गडकरी,

असिस्टंट जज्ज, बडोदा.

# चमत्कारिक नाटकाचा व्यवहारास उपयोग.

॥ पृथक् शय्या च नारीणां अशस्त्रवधमुच्यते ॥

कित्येक लोक अल्प स्वल्प कारणांवरून विवाहित स्त्रीचा त्याग करितात व केव्हां केव्हां त्याचा परिणाम अतिशय भयंकर होतो, इतकें जर या नाटकापासून लोकांच्या मनांत वागूं लागलें, तर आपल्या देशांतील शेंकडों स्त्रियांस ह्या नाटकानें मोठ्याच संकटांतून बाहेर काढलें असें होईल. तसेंच नवीन सुशिक्षित लोकांचे व जुन्या पद्धतीच्या लोकांचे विचार कसे असतात ते कळतील. सामुद्रिकासारख्या भविष्यदर्शक चिन्हांवर कितपत विश्वास ठेवावा याजविषयीं थोडेंसें विचार करण्यासारखें ज्ञान प्राप्त होईल. दुष्ट व कपटी लोक जगांत किती भयंकर कृत्यें करीत असतात व त्यांचा परिणाम कसा होतो हें कळेल. येणेंकरून अशा लोकांविषयीं कितपत सावधगिरी ठेविली पाहिजे हें लक्ष्यांत येईल. अखेरीस परमेश्वरी करणी अचिंत्य आहे हें मनांत येऊन अंतःकरण थक्क होऊन जाईल आणि वाईट कृत्य परमेश्वरास आवडत नाहीं, चांगलें कृत्य करणारांसच परमेश्वराकडून यश मिळतें हें तत्त्व मनांत बिंबेल.

वा. दि. वै.

पुस्तककर्त्ता.

# चमत्कारिक नाटकांतील संक्षिप्त संविधानक.

बाबासाहेब ह्मणून एक पनवेलचे सुखी गृहस्थ इंदुरास मोठे कामगार होते. त्यांच्या दत्तक मुलाचें नांव बाळासाहेब. ह्याची बी. ए. ची परीक्षा झाली होती व हा वडिलांची आज्ञा मानणारा होता. ठाणेकर अण्णासाहेबांच्या मुलीशीं ह्याचा विवाह झाला होता. तात्या ह्मणून एक अण्णासाहेबांचा हितशत्रु होता, त्याला हें आवडलें नाहीं. ह्या उभयतांमध्यें वांकडें पाडून बाळासाहेबांचें दुसरें लग्न करून द्यावें, अशाविषयीं त्यानें गुप्तरूपें जबरदस्त यत्न केले.

त्या यत्नांत एक यत्न असा होता कीं, एक्या बैराग्यास कांहीं देऊं करून त्याजकडून बाबासाहेबांच्या कुटुंबाचें मन इतकें बिघडविलें कीं, तिनें सुनेच्या हातचें पाणी देखील प्यावयाचें नाहीं असा निश्चय केला. सुनेला माहेरीं पाठविली ती तीन वर्षें इकडे आणली नाहीं. या मुदतींत बाबासाहेबानें आपल्या स्नेह्यांचे मार्फत मुलाचें मन दुसरें लग्न करण्यास वळावें ह्मणून पुष्कळ यत्न केला; परंतु तो सफळ झाला नाहीं. इतक्यांत एक्या स्नेह्यानें एक मसलत सुचविली, त्या मसलतीनें मुलगा दुसरें लग्न करील असें ह्यांस वाटलें व मुलगी पाहून तिथिनिश्चय ठरवून वऱ्हाड इंदुरास बोलविलें. ही मसलत फार गुप्त रीतीनें केली.

इकडे बाळासाहेबानें विचार केला कीं, आईबापांच्या सम्मतीनें आपला व आपल्या स्त्रीचा समागम होईल असें तर आतां वाटत नाहीं, इतक्याकरितां आपण नोकरी पतकरून तेथें स्त्रीस घेऊन जावें. संतति झाली ह्मणजे वैराग्याचें भविष्य कितपत

हें व सामुद्रिक लक्षणांची सत्यता किती असते हें आपो-
डलांस कळेल. आणि पुन्हां आपल्यावर प्रेम जडेल.
पतकरण्यास आईबापांची परवानगी मिळणार नाहीं ह्मणून
ळून जाण्याचा निश्चय केला.
ाचे नजीक धर्मशाळेंत बाबासाहेबांचे नवीन होणारे
वऱ्हाडासह उतरले होते व पुढें निघून जाण्याच्या गर्दीत
इतक्यांत बाळासाहेबाचा सासरा अण्णासाहेब व सासू,
टुंब, नवस फेडण्याकरितां जात होते; ते त्याच धर्मशाळेंत
ले. भावी (होणारी) सवत बाळासाहेबाच्या कुटुंबाच्या दृष्टीस
ली, त्या योगानें ती पुढील सुखाविषयीं निराश होऊन आ-
या पतीस वचनांतून मुक्त करावें आणि आपणही दुःखांतून
कदम मुक्त व्हावें, असें मनांत आणून तिनें विहिरींत उ-
ी टाकिली.

तिला विहिरींतून एक्या वैराग्यानें तावडतोब बाहेर काढली.
तों ती मेली आहे असें नजरेस आलें. पुढील व्यवस्थेकरितां
ब्राह्मण शोधीत असतां तिचाच पति खाणावळींत सांपडला. तो
पुढें येऊन पहातो तों ही आपलीच बायको. मग मूर्च्छित झाला.
डॉक्टरानें दोघांस सावध केलें. बाळासाहेबानें डॉक्टराचे व
विहीरींतून कुटुंबास बाहेर काढणाऱ्या बोवाजीचे फार आभार
मानले.

बाळासाहेबाचा शोध करीत त्याचे आईबाप तेथें आले. प-
रस्परांच्या भेटी होत आहेत तों बाळासाहेबाच्या आईची दृष्टी
त्या वैराग्याकडे गेली. ती ह्मणाली, हाच तो बोवाजी ! आपण
त्याच्या पायां पडली व बाळासाहेबास पायां पडण्यास सांगूं
लागली.

बाळासाहेब मोठ्या विचारांत पडला कीं, ह्या बोवाजीच्या

रणीनें तर मी सर्व सुखास अंतरलों. असें आतां उघडकीस आलें, ाणि हाच बोवाजी माझ्या कुटुंबास मृत्युमुखांतून काढण्यास ारण झाला सबब मी तुझे उपकार जन्मभर विसरणार नाहीं असें नुकतेंच मीं त्यास बोलून चुकलों. आतां ह्यास शिक्षा करावी कीं, याच्या पायां पडावें ?

बोवाजीनें त्याची मुद्रा ओळखून क्षमा मागितली. खरा शत्रु व अपराधी कोण हें स्पष्ट कळविलें. आणि ह्मणाला, जो मी तुमच्या घातास कारण झालों होतों त्या माझ्याच हातून परमेश्वरानें तुमचें कल्याण केलें. हें एक चमत्कारिक नाटकच झालें आहे. आतां तुह्मी कांहीं शंका मनांत न आणितां सुखानें नांदा.

सर्वानुमतें बोवाजीस क्षमा केली. मनांतल्या वाईट कल्पना नाहींशा झाल्या व सर्व आनंदच आनंद होऊन गेला.



## चमत्कारिकनाटकांतील मुख्य पात्रें.

बाबासाहेब.........एक पनवेलचे सुखी गृहस्थ, इंदूर येथील मोठे कामगार.

लक्ष्मीबाई .........बाबासाहेबांची बायको.

बाळासाहेब ......बाबासाहेबांचे चिरंजीव.

रावसाहेब.........बाबासाहेबांचे परम मित्र.

अण्णासाहेब ......ठाणें येथील सुखी गृहस्थ, बाबासाहेबांचे व्याही.

मित्रचंद्र .........बाळासाहेबांचे मित्र, बंगाली बाबू, कॉलेजांतील विद्यार्थी.

सत्यभामाबाई ...अण्णासाहेबांची बायको.

अन्नपूर्णा ( चिंगी )...अण्णासाहेबांची मुलगी, बाबासाहेबांची सून.

तात्या............अण्णासाहेबांचा दीर्घद्वेषी.

बोवाजी .........जटाधारी बैरागी.

ठकूआत्या ......एक विधवा स्त्री ( ठाणें येथील गांवमावशी. )

## या नाटकांतील किरकोळ पात्रें.

गंगाधर .........बाबासाहेबांचा खासगी कारकून.

राऱ्या .........अण्णासाहेबांचा खासगी गडी.

गणोजी ...... ..अण्णासाहेबांचा शिपायी.

शामभट.........नाशिककर उपाध्ये ( बाबासाहेबांचे. )

धोंडभट, गोविंदभट ...नाशीक येथील भिक्षुक.

जोशीबोवा.........इंदूर येथील ग्रामोपाध्याय.

विश्वंभरशास्त्री ...इंदूर येथील विद्वान जोशी.

श्री

# चमत्कारिक नाटक प्रारंभ.

## अंक पहिला.

### प्रवेश पहिला.

**स्थळ.** इंदूर येथील रहात्या घराचा दिवाणखाना.

**पात्रें.** बाबासाहेब, लक्ष्मीबाई, बाळासाहेब, जोशीबोवा.

**बाबासाहेब**—अग ए, ऐकलेंस का?

**लक्ष्मीबाई**—काय, मला हाक मारली?

**बाबा०**—होय. त्या लव्हाळ्यांचें ह्मणणें कळलें का? ते ह्मणतात आणखी एक पन्नास रुपये अधिक द्या! पण विहिणीचा मानपान, रासन्हाणें, जावयाचा मानपान, रुसणें, फुगणें, सगळें तुमचें तुह्मी संभाळा.

**लक्ष्मी०**—मला कांहीं दहा पांच मुलगे नाहींत कीं ह्या खेपेला नाहीं तर दुसऱ्या मुलाच्या वेळेस तरी मानपान मिळतील! तसं असतं ह्मणजे हो ह्मटलं असतं! पण तसं थोडंच आहे! एकदां हुंडा अधिक घेतला आणि अशीं बोलणीं सोडवलेलीं असलीं ह्मणजे मग कोणी विहिणीला विचारीत नाहींत आणि जावयांनाही विचारीत नाहींत! वाजत गाजत बोलावणं यायचं, तें मुकाट्यानें बोलावणं आलं, तरी मग चालवून घ्यावं लागतं. मग बायका तोंड काढूं देत नाहींत! त्यांचं सगळं ऐकून घ्यावं लागतं. आ-

णि मुकाट्यानें बसावं लागतं. पुरषांना काय होतं! त्याही, विहिणी हौशी पाहिजेत! आतां नाहीं हौस पुरवावी तर पुन्हा कांहीं आशा आहे का? दप्तरदारांचं जमलं असतं ह्मणजे ठीक झालं असतं!

( इतक्यांत टपालाचा शिपाई पत्र घेऊन येतो व पत्र देऊन जातो. )

**बाबा०**–बाळा, कोणाचें रे तें पत्र आलें आहे? पहा.

**बाळासाहेब**–( पत्रावरचें अक्षर ओळखून ह्मणतो ) अण्णासाहेबांचें तें ठाण्याचें. ( असें बोलून पत्र बापाजवळ देतो. )

**बाबा०**–ह्या! हें एक दुसरें टिपण आलें! दप्तरदारांच्या भावाचीच मुलगी. ईश्वरसत्तेनें जमलें मात्र पाहिजे, ह्मणजे तुझ्या सगळ्या हौशी पुरतील. जोशीबोवा आले ह्मणजे त्यांना विचारलें पाहिजे.

( इतक्यांत जोशीबोवा येतात. )

**जोशीबोवा**–नमस्कार!

**बाबा०**–नमस्कार. यावें, बसावें. हा एक चमत्कारच झाला! आतांच तुमचें स्मरण केलें होतें, तों तुह्मीच आपले हजर. बरें झालें! हें एक दुसरें टिपण आलें आहे पहा. ( टिपण त्यांच्यापुढें टाकतो. )

**जोशी०**–अहो, आपले येथें टिपणांचे ढीग पडतील. अशीं स्थळें आहेत कोठें? ( असें ह्मणून टिपणें जुळवून पहातो ) हें पहा. गोत्राशीं पडलेंच आहे. गणमैत्रकीही ठीक आहे आणि ग्रहही फार उत्तम आहेत. सकाळचें तेंही चांगलें आहे, हेंही चांगलें आहे. मंगळ

अम्मळ मध्यम आहे पण त्याला कांहीं हरकत नाहीं. जावास जात्र आहे. हिचे ग्रह फार उत्तम आहेत. सकाळच्या पेक्षां ही मुलगी सुरेख असावी.

**बाबा०**–टिपणाशीं उत्तम पडलेंना? झालें तर मग! मुलगी सुरेख आहे; त्याविषयीं पत्रांत लिहून आलें आहे आणि बाळाच्या पहाण्यांतलीच आहे. कायरे बाळा, कसें काय? तुझ्या पहाण्यांत दोन्ही आहेत, दप्तरदारांची चांगली कीं ही चांगली?

**बाळा०**–(नुसतें हसल्यासारखें करून) मला नाहीं ठाऊक!

**लक्ष्मी०**–तो काय सांगेल? मी समजलें त्याच्या मनांतलं, जमवा. हेंच जमवा. ह्मणजे सगळं यथास्थित होईल.

**बाबा०**–ठीक आहे. लिहितों तर मग पत्र, कां जोशीबोवा?

**जोशी०**–हं, ल्याहा पत्र. काम फत्तेच समजा!

**बाबा०**–आजचा योगच कांहीं चमत्कारिक आला आहे. आह्मी सहज लग्नाच्या गोष्टी बोलत बसलों होतों; इतक्यांत पत्र आलें व आपणही आलां. सगळाच योग चांगला जमत चालला. बरें आतां एकदां तंबाखू तर खा! कोणरे राम्या, पानसुपारीचा डबा आण.

**राम्या**–जी. (डबा आणून देतो.)

(जोशीबोवा तंबाखू खाऊं लागतात.)

(बाबा साहेब पत्र लिहितात.)

**बाबा०**–रामजी, हें पत्र टपालांत नेऊन टाक. (पत्र त्याजपुढें टाकतात.)

**राम०**–जी सरकार. ( पत्र घेऊन जातो. )

**जोशी०**–येतों आतां ! नमस्कार !

**लक्ष्मी०**–( हातांत नारळ घेऊन ) जोशीबोवांना नारळ द्यावयाचा होता.

**बाबा०**– (नारळ देतात. ) नमस्कार.

**जोशी०**–शुभफलप्राप्तमस्तु. ( जातात. )

---

## प्रवेश दुसरा.

**स्थळ.** एकांत.

**पात्रें.** तात्या. ( गुप्तपात्र. )

**तात्या**–( आपल्या मनाशीं ) हः हः ! आश्चर्य आहे एकेक ! काय लव्हाळ्यांची मुलगी वाईट का होती? त्यांनीं माझ्या सांगण्यावरून हुंड्याची रक्कम देखील वाढवली. तरी ती नाकारली. चमत्कार आहेत लोकांचे ! काय ह्मणे व्यांही, विहिणी हौशी पाहिजेत. आतां जेथें जमलें आहे तेथें काय उजेड पडेल तो दिसेल ! त्यांत अस्मादिकांसारखे हळूच फांदडा मारायला तयार होऊन बसलेच आहेत. आतां अण्णासाहेबांना ह्मणावें पडूं द्या तुमचीं लग्नें कशीं पार पडतात तीं ! बाबासाहेबांचें ठिकाण ह्मटलें ह्मणजे आमच्या मुठींतलें ! आणि ह्या ठिकाणीं जमवते वेळेस मला एक अक्षर देखील कळूं दिलें नाहीं ! ठीक आहे ! नका कळवूं ! तुह्माला काय वाटतें ! तात्या ह्मणजे कःपदार्थ होय? पण तात्याला तुह्मी ओळखलें नाहीं हो. तात्या पक्का पांढरा सर्प आहे. हें समजून असा ! एकदां दंश धरला ह्मणजे कधीं सोडणार नाहीं.

एक दिवस अगोदर मला कळलें असतें ह्मणजे ह्याच ठिकाणीं तुह्मी कसें जमवलें असतें तें पाहिलें असतें. आणि अजून काय झालें आहे? तुह्मी जिंकलंत असें नका समजूं, हा तात्या तुह्माला पायां पडायला न लावील तर कशाला बोललों आहें! ह्याच्या पोटांत पाय आहेत बरें! हा तुह्माला बाहेरून दिसायला मोठा गोड दिसतो आहे पण ह्याच्या मनांतला द्वेष अजून एक रतीभार देखील कमी झाला नाहीं हो! हा पुरता सूड उगवील तेव्हांच सोडील. अण्णासाहेब, हा तात्या लोकांसारखा वडबडून दाखविणारा नाहीं, प्रत्यक्ष करून दाखवणारा आहे. ह्याच्या कार्याची सिद्धि होईपावेतों ह्याच्या मनांतला व्यूह ब्रह्मदेवाला देखील कळणार नाहीं. अण्णासाहेब, आज तीन वर्षें माझा तुमचा द्वेष आहे हें तरी तुह्माला कळलें आहे काय? पक्की तुमची धूळदाणी होईपावेतों देखील फलाण्या नुकसानाला कारण तात्या आहे हें तुह्माला कळणार नाहीं. लोक काय करतात? एखाद्याशीं द्वेष पडला ह्मणजे अबोलेच धरतात. मी यंव करीन नि त्यंव करीन अशा वल्गनाच करितात. आपल्याला तें बिलकुल पसंत नाहीं! एखादें काम करणें असलें तर असें करावें कीं करूनसवरून पुन्हां आपला निराळ्याचा निराळाच. लोकांना त्याचा वहीम देखील येऊं नये. तर त्याचें नांव काम करणें! हाच तात्या उद्यां ह्याच लग्नांत किती गमती करील त्या पहा! पण "गांवानिराळा मारुती!" जावं आतां तयारीला लागलें पाहिजे. आपल्यांना दोहीं कडलीं लग्नाचीं बोलावणीं आहेतच. नाशीक मोठें शहर

आहे. ह्या लग्नामुळें आठ चार दिवस तेथें अधिकच मजेनें जातील. चला, जावेंच आतां! (जातो.)

---

## प्रवेश तिसरा.

**स्थळ.** नाशीक येथील बालाजी जवळचें पटांगण.

**पात्रें.** धोंडभट, गोविंदभट आणि शामभट. (क्षेत्रस्थ उपाध्ये.)

**धोंडभट**—(शामभटाकडे पाहून) नमस्कार! नमस्कार!

**शामभट**—नमस्कार.

**धोंड०**—कां, आज बनलंका गंगेच्या घांटावर यायला? तुह्मी तर अगदीं पक्के वऱ्हाडीच बनलां होतां!

**शाम०**—अहो, वऱ्हाडी कसले? बाबासाहेब आहेत आमचे यजमान. भांडींकुंडीं वगैरे लागेल तें सामान आह्माला मिळवून द्यावं लागत होतं. त्यामुळें चार सहा दिवस इकडे अड्ड्यांत येण्याला बनलं नाहीं! झालें! आणखी काय एकसारखी दगदग पुरवते आहे.

**धोंड०**—फुकटच करीत असाल अगदीं!

**गोविंदभट**—कोण? शामभटना? मोठे परोपकारी! आतां गायकवाडचे दिवाण येऊं द्या यजमान! ह्मणजे यांच्यापेक्षां शंभरपट दगदग करतील, आणि एखादी बाईबापडी येऊं द्या. मग बसलेले असले तर जागचे हालायचे देखील नाहींत.

**शाम०**—तें तर उघडच आहे. यजमान मात्र खर्चीक व हौशी पाहिजे, मग आम्हाला कितीकां दगदग पडेना!

तेव्हां आंगांत जोरच जास्त येतो आणि ह्याच बाबासाहे-बांच्या व्याह्यांचे दुसरे व्याही आले आहेत ते! एकदां गेलों होतों त्यांच्याकडे! पुन्हां बोलावण्यावांचून पाऊल ठेवलं नाहीं.

**धोंड०**—पक्का आहेसरे तूं! त्या कामाला पुरा वस्ताद!! ह्या खुब्या आह्माला नाहीं साधत बुवा! पण तुंबडी कितपत भरली?

**शाम०**—मिळाले पाचपंचवीस रुपये झालें! रुपये काय? रुपये मिळवून दाखविले असते! बाबासाहेब एक यजमान पण यजमान आहे! त्यांच्या मनांतून दोघांमिळून सभा देखील करावयाची होती.

**धोंड०**—मग! व्यत्यय काय आला?

**शाम०**—व्याह्यांनीं बाबासाहेबांचं चित्त रंजिस केलं. रासन्हाणं देखील राहिलं! बाकी तो व्याही तरी कमी नाहीं हो. ह्यांच्या टेकीस टेक देणारा आहे, पण तो थोडासा अडला गेला. त्यांना दुसऱ्या मुलीचें लग्न करावयाचें होतें; ती जेथें द्यावयाची होती, त्यांचं ह्मणणं कीं बाबासाहेबांनीं पहिपाव्हणा करूं नये, सभा करूं नये, दक्षणा आठचार आणेच द्यावी. मनांत हेतु काय कीं, ह्यांनीं असं केलं ह्मणजे आपणासही करावं लागेल. पण आमचे बाबासाहेब पडले सरदार गडी! त्यांनीं दक्षिणा तर रुपया रुपया वांटलीच. पहिपाव्हण्याचा थाट कसा ठेविला होता! तो तर पुसूंच नका! जावयाच्या पंक्तीपासून गड्यांच्या पंक्तीपर्यंत सारखा बेत!

**धोंड०**—तें कांहीं सांगायला नको. तो बेत आह्मी स्वतः पाहिला आहे. आज सगळं नाशीक वाखाणतं आहे.

सरसकट मुलांबाळांसुद्धां भूयसी दक्षिणा रुपरुपया वांटली, तेव्हांच त्यांचा उदारपणा दिसून आला, आणि चोहोंकडे कीर्ति झाली.

**शाम०**—अरे बाबा, तीच तर नडली. हें त्यांच्या व्याह्यांच्या व्याह्याच्या डोळ्यांत सलूं लागलं आणि मग पहिपाव्हण्यावर निमित्य ठेवलं कीं, आमच्या विचाराशिवाय तुह्मी पहिपाव्हणाच कां केला ? इतक्या निमित्यावरून दोन्ही व्याही ह्यांच्या मांडवांत जेवायला नाहीं आले. गांवसमाराधनेच्या दिवशीं व्याह्यांकडचं चिटपाखरुं देखील नव्हतं ! त्यामुळें बाबासाहेबांचें चित्त रंजीस झालं कीं खर्चून सवरून वाईटपणा !

**धोंड०**—काय दुष्ट आहेत हो लोक ! आपल्याच्यानें करवत नाहीं तर नाहीं, आणि दुसरा करतो तें पाहवतही नाहीं.

**गोविंद०**—कायहो शामभट ! त्या लेकाला ह्मणावें तूं नको करूंस गांव प्रयोजन ! आपले व्याही व्याही जेवा आणि जा. पण दुसऱ्यांचा कां विरस करितां ? तुमच्यावर कोणी ओझें का लादलें आहे ?

**शाम०**—मग ह्याच बोलण्यावरून तर इतकं पेटलं. आमच्या बाबासाहेबांचें ह्मणणं हेंच होतं कीं, ज्याला जसें वाटेल तसें त्यांनीं करावं आणि त्यांचं ह्मणणं काय कीं, एक्याच गृहस्थाचे दोन व्याही, त्यांत एकानें थाट केला आणि दुसऱ्यानें नाहीं केला किंवा त्यांच्यानें न करवला तर त्यांची नामोशी होईल.

**धोंड०**—भिकारडे शिंचे ! काय हो शामभट, आप-

ल्यांत सामर्थ्य नाहीं मग हे असल्याचे व्याही कशाला होतात हो? आपण आपल्यासारख्या भिकाऱ्याशींच संबंध ठेवावा. असो, पण आतां कांहीं सभाबिभा होण्याचा रंग दिसतो आहे कीं नाहीं!

**शाम०**—छे हो! मग एवढा वेळ ऐकलंत काय? ते लागले दुसऱ्या व्याह्यांची मर्जी संभाळावयाला! दुसऱ्या मुलीच्या लग्नाच्या गर्दींत ह्या विहिणीला रासन्हाणं देखील मिळालं नाहीं. जेवणावळ झाली आणि बाबासाहेब निघालेच येथून. येथें रहाते तर कशी तरी सभा करवलीच असती! मग आपलीं दहा पांच नांवं अस्मादिकांनीं यादींत घुसडलींच असतीं ह्मणजे सहज लाट सांपडला असता. तो बुडाला ह्मणून तर रडायचं!

**धोंड० व गोविं०**—अस्सें अस्सें! जाऊं देरे, आपलं काय घेऊन गेले आहेत ते! गंगाबाई दुसरा यजमान पाठवून देईल.

**शाम०**—देईल तर काय झालं? असो, पण तुम्हाला सांगतों. तुमचा त्यांचा परिचय नव्हता ह्मणून. नाहीं तर बाबासाहेब मोठा लाख माणूस! मोठा हौशी होता. आणखी एकदां दोनदां तरी घृतकुल्या मधुकुल्या सहज सांपडली असती! आणि तें त्यांच्याच व्याह्यांनीं दुसरी मुलगी दिली त्या ठिकाणचं ब्राह्मणभोजन पुरतं सगळ्या आदितवार पेठेला देखील कळलं नाहीं.

**धोंड०**—पण आतां असंच बसावयाचं कीं घरीं जायाचं!

**शाम०**—नाहीं, जातोंना आतां! आपली सहज गोष्ट

मराठी ग्रंथ संग्रहालय
ठाणे.

निघालें ह्मणून सांगितलें. मला अजून भद्रकालीस दर्शनास जायचें आहे. ( तपकीर ओढून वरीं जातात. )

---

## प्रवेश चवथा.

**स्थळ.** एकांत.

**पात्रें.** तात्या. (गुप्तपात्र.)

**तात्या**—( आपल्या मनाशीं ) बीजारोपण तर उत्तम प्रकारचें झालें! बाईसाहेबांच्या सगळ्या हौशी अगदीं रामन्हाण्यासुद्धां पूर्ण झाल्या! आतां व्याह्याव्याह्यांचीं व विहिणीविहिणींचीं मनें शुद्ध होतील ही गोष्ट तर बोलावयालाच नको! पुन्हां आपला वहीम कोणालाच नाहीं! आपण आपले दिसायला इकडेही गोड आणि तिकडेही गोडच! आतां ह्या बीजारोपणाचें फळ वर्षसणाच्या वेळेस किंवा दिवाळसणाच्या वेळेस चांगलें आलें पाहिजे. घडलेल्या गोष्टी मनांत वागवून दिवाळसणाला व वर्षसणाला जावयी गेले नाहींत ह्मणजे मग झालेंच आमचें फत्त्या काम! मग अण्णासाहेबांना ह्मणावें खुशाल आपली मुलगी घेऊन जन्मभर स्वस्थ आपल्या घरींच वसा! पाहूं आतां काय आमची कल्पनादेवी यश देईल तें खरें ( जातो. )

---

## प्रवेश पांचवा.

**स्थळ.** इंदूर येथील बाबासाहेबांच्या रहात्या घराचा दिवाणखाना.

**पात्रें.** बाबासाहेब व लक्ष्मीबाई.

**बाबा०**—ऐकलेंस का? दिवाळसणाला बोलावणें येणार

आहे. आज व्याह्यांचें पत्र आलें, कसा काय विचार आहे तुझा ? तुला तर गेलें पाहिजे. त्यांचें फार अगत्याचें बोलावणें आहे.

**लक्ष्मी०**—मी साफ जाणार नाहीं. त्यांना लिहून पाठवा पाहिजे तर आपल्या जावयाला खुशाल घेऊन जा. तेथें माझी मानप्रतिष्ठा रहाणार नाहीं आणि कांहीं नाहीं. मग जाण्यांत काय अर्थ आहे ? मला लग्नांतच त्यांचा विट्ट आला. जेवणावळीच्या दिवशीं आपण थोडाका त्यांना आग्रह केला पण कोणी एकानें तरी यायचं होतें. चमत्कारिक माणसं आहेत तीं ! मला कांहीं दहा पांचका मुलें आहेत ? कांहीं तरी त्यांनीं विचार करावयाचा होता ! यादींत रासन्हाण्याचा ठराव असून तें देखील दिलं नाहीं. समजला त्यांचा थोरपणा किती आहे तो ! त्यांचा जावयी आहे आणि ते आहेत, नेतील पाहिजे तर जावयाला !

**बाबा०**—अग, एकानें गैर केलें ह्मणून दुसऱ्यानें तसें करूं नये. आणि त्यांतून त्यांच्या पत्रांत लिहून आलें आहे कीं "लग्नांत अमळ धांदल झालीं व कांहीं कमजास्ती गोष्टी घडल्या व विनाकारण बोलणीं वाढलीं पण त्या गोष्टी कांहीं एक मनांत न आणतां सर्व प्रकारें क्षमा करून दिवाळसणाकरितां सर्व मनुष्यांची रवानगी अगत्य करून द्यावी. अनमान होऊं नये. लग्नाच्या वेळेस विहिणींच्या मानपानाची हैगय झालेली आमच्या लक्ष्यांत आहे. या खेपेस त्याचा सर्व वचपा निघून जाईल. तरी पाठविण्यास अनमान करूं नये," वगैरे पुष्कळ नम्रतेचें लिहिलें आहे, तेव्हां तुला गेलेंच पाहिजे.

**लक्ष्मी०**—आपल्यापुढें माझ्याच्यानीं कांहीं बोलवत नाहीं. पण माझ्या मनांतून कांहीं जावयाचं नव्हतं. त्यांनीं पुष्कळ लिहिलं असलं तरी तें कांहीं जमावयाचं नाहीं. लग्नांत त्यांनीं मानपानाच्या यादी करून दिल्या होत्याना? तितक्यावरून त्यांची परीक्षा झाली. शीत चांचपून सगळ्या भाताची परीक्षा होते.

**बाबा०**—एखाद्या वेळेस मनुष्यापासून वसरलें ह्मणून अक्षयीं घसरतें असें कांहीं नाहीं. त्यांत ते चूक कबूल करून क्षमा मागत आहेत. इतक्याउपर जर तूं गेली नाहींस तर आपल्याकडे हलकेपणा येईल.

**लक्ष्मी०**—त्यांनीं केला तो थोरपणाना?

**बाबा०**—(अंमळ रागावल्यासारखें करून.) त्यांचा थोरपणा त्यांच्यापाशीं. त्यांनीं हलकेपणा केला ह्मणून आपल्यांना नाहींना करावयाचा? आपण आपलें सभ्यपणानें वागावें. आतां पुन्हां कधीं तुला त्यांच्या घरीं जाण्याचा प्रसंग येणार आहे? दिवाळसणाला जा, मग वर्षसणाला गेलीस तर गेलीस नाहीं तर नाहीं.

**लक्ष्मी०**—आपला आग्रहच असेल तर जातें बापडी! मी कांहीं आपल्या बाहेर का आहें?

**बाबा०**—जायचेंच. बाळाला तिकडे पत्र पाठवितों. ह्मणजे परस्पर तोही तिकडेच येईल. लिहितों तर मग त्यांनाही पत्रें, येतील ह्मणून.

**लक्ष्मी०**—बरं, लिहा.

(बाबासाहेब पत्रें लिहून तयार करतात.)

**बाबा०**—रामजी, हीं पत्रें टपालांत नेऊन टाक.

**रामजी**—जी सरकार !

---

## प्रवेश सहावा.

**स्थळ.** दप्तरदारांच्या वाड्यांतील खोली. (ठाणें.)

**पात्रें.** सत्यभामाबाई, ठकूआत्या, लक्ष्मीबाई.

**ठकूआत्या**—(हेल काढून) झालाका दिवाळसण? माझी आठवण देखील नाहींना झाली? कशाला होईल बाई गरिबाची आठवण!

**सत्यभामा०**—झालें बाई. सुटलें एकदांची दिवाळसणाच्या हातून! आतां वर्षसणाची बात लांब आहे. आज आमच्या भावोजींच्या विहिणी गेल्या. जावयी गेले. उद्यां आमचे जावयी व विहिणी जाणार.

**ठकूआत्या**—कांहो, भावोजींच्या विहिणीला नागपुरी खण दिला ह्मणून ऐकलं आणि हिलाच कांहो मंदिली खण?

**सत्यभामा०**—अहो तें मोठेंच भारूड आहे. लग्नांत आमच्या विहिणीला रासन्हाणं द्यायाला झालं नाहीं ह्मणून त्याचा वचपा यांत काढला. तेव्हां रासन्हाणं झालं असतं तर पातळ नकोका द्यायाला हावं होतं?

**ठकूआत्या**—झालंच असतं रासन्हाणं तर द्यायाला हावं होतं, पण राह्यलं तें राह्यलं! आतां काय त्याचं? कांहीं कर्जका घेतलं आहे कीं फेडलंच पाहिजे!

**सत्यभामा०**—तसं कांहीं नाहीं. पण हा खण व्यायालाच पाहिजे होता हो. लग्नांत जेवणावळीवरून कांहीं पुरषापुरषांचीं बोलणीं झालीं आणि आह्माला तर भावोजींच्या व्याह्यांची मर्जी राखणं भाग होतं. दुसऱ्या का ति-

सऱ्याच दिवशीं भिमीचं लगीन होतं ह्मणून ह्यांजकडे अंमळ दुर्लक्ष केलं आणि काम साधून घेतलं. मग काय विचारतां? ( हळूच ) यादींत रासन्हाण्याचा ठराव होता वाटतं, आणि तें तर आमच्या कडून मिळालं नाहीं; मग जो या बयानं अकांडतांडव करून दिला तो कांहीं बोलण्याची सोय नाहीं "कोठच्या मेल्या भिकारड्यांशीं गांठ पडली आहे? मला कांहीं दहा पांच मुलं आहेत का? एक नि दोन! काय पाहिजे तें बोलली. मांडवपरतणीला देखील कोणी आमच्याकडे आलं नाहीं. बुरशांतच होत्या बाई साहेब!

**ठकूआत्या**–नाहीं दहा पांच मुलं झालीं तर आपल्या कर्माला बोट लावावं, दुसऱ्याला कशाला भिकारडीं नि फिकारडीं ह्मणावं? एकच टिकोबा आहेत ह्मणून ठीक आहे. एखादी मुलगी असती ह्मणजे समजलं असतं सुख!

**सत्यभामा**–अग हळू बोल. इथेंच शेजारच्या खोलींत निजल्या आहेत. कुठे जा पंचाईत करायाला? ( अगदीं हळूच सांगते ) आमचे जावयी तरी दत्तोबाच आहेत.

**ठकूआत्या**–आणि हा निवळ वांझोडाच का ओंडा आहे?

**सत्यभामा**०–अंमळ हळू बोलग!

**ठकूआत्या**–( आणखी मोठ्यानें बोलते. ) मला काय तिची एवढी भीती आहे? मी नसते तिचे एवढे दिमाख चालूं दिले. मी साफ सांगितलं असतं कीं, तुमच्या नशिबीं मूलच नाहीं मग रासन्हाणं कोठून असणार? नशिबाप्रमाणं घ्यावं द्यावं. इतका तोरा कशाला पाहिजे? आतां सात आठ वर्षे होळकर शाळेंत जाऊन चार पैसे

दृष्टीस पडले ह्मणून, बाईसाहेब लागल्याच ठमकूं लागल्या, पहिल्या भिकारड्याच होत्या. मला ठाऊक आहे.

**लक्ष्मी०**–( खोलींतून अवसानानें पुढें येऊन बोलते ) आह्मी भिकारड्या होतों नि तुह्मी श्रीमंत आहां! माझ्या मुलाचं लगीन होत नव्हतं असं नाहींना कांहीं? आह्मी तुमच्या पायां पडायला नव्हतोंना आलों कीं द्याहो आमच्या मुलाला मुलगी!

**ठकूआत्या**–बसा ऊगीच, ठाऊक आहे तुमची थोरवी. काल वैभव नाहीं आलं तों आज दिमाख चढला. आमच्या दप्तरदारांचं गर्भश्रीमंत घराणं; कशीं तरी दहा पांच कार्यं त्यांच्या हातून घडलेलीं! तुह्माला कांहीं त्याचा वारा ठाऊक आहे? अगोदर वेणा द्याव्या लागतात तेव्हां वरमाय होते बरं! फुकाचं नाहीं हो मोठेपण! आणलं लोकाचं मुलगं धरून, झाली विहीण! आणि लागली रुसायला!!

**लक्ष्मी०**–( मोठ्या अवसानानें पुढें होऊन ) काय ह्मणतेस? काय ह्मणतेस?

( इतक्यांत सत्यभामाबाई पुढें होऊन विहिणीचा हात धरून तिला आपल्या जवळ बसविते आणि ठकूआत्याकडे वळून ह्मणते. )

**सत्यभामा०**–ठकूआत्या, जा बाई तुह्मी आपल्या घरीं जा. नसता भोग एकेक! अगदीं चिप् बस. तोंडांतून एक अक्षर नको काढूं. तुला माझ्या गळ्याची शपत आहे. घरचे पुरुष आले तर काय ह्मणतील?

**ठकूआत्या**–बरं हो, तुह्मी पडा तिच्या पायां! आणि

बसा आपल्या विहिणीला घेऊन ! तुह्माला कंटाळा आला असला तर ही मी चाललें. ( असें बोलून झणकाऱ्यानें निघून जाते. )

**सत्यभामा**०—विहिणीबाई, तिचं बोलणं काय तुह्मी मनावर धरतां ? ती आहे फाजील बायको ! वेडीच ती !

**लक्ष्मी**०—बरी असेल वेडी ! कांहीं दगड नाहीं मारीत; कांहीं शेण नाहीं खात ? असल्या दोन चार वेड्या असल्या ह्मणजे गांवाला आग लावायच्या ?

**सत्यभामा**०—ती इतकं बोलायची नाहीं पण घसरलं तिच्या हातून. आणि ती सैरीभैरीच आहे थोडीशी ! गुदस्तां असंच, कारण ना बिरण. त्या मुनसफसाहेबांची बायको आमच्या येथें सहज बसायला आली होती आणि हिचं नि तिचं आपलं जुंपलं भांडण ! आह्मी कांहीं तुह्माला बोलत नाहींना ? लोकांच्या तोंडाला का हात लावायचा आहे ?

**लक्ष्मी**०—तुह्मी बोला कां त्या बोलोत. मीच निलाजरी ह्मणून तुमच्या घरीं पुन्हा आलें. मी येणारच नव्हतें पण घरच्यांचा काय आग्रह ? गेलंच पाहिजे तुला ! गेलंच पाहिजे तुला ! आतां अप्रतिष्ठा होते आहे माझी !

**सत्यभामा**०—कांहीं अप्रतिष्ठा होत नाहीं. अशा हलकटांच्या बोलण्यांनीं मोठ्यांना कलंक लागूं लागला तर मग काय ? चोर चांदिण्या रात्रीला शिव्या देतात ह्मणून ती वाईट होते कीं काय ? आपण कांहीं बोलण्याचालण्याचा राग मनांत आणूं नका. आह्माला ती विहीण, तशाच तुम्ही. कांकणभर तुह्मींच अधीक ह्मटल्या तरी चालेल. आह्माला दोघींचा मानपान सारखा ठेवा-

यत्रा. तुमच्या गळ्या शपथ मी सांगतें (तिच्या गळ्यास हात लाऊन) आमचा हात गुंतला होता तो सोडवायाचा होता ह्मणून त्या वेळेस थोडेंसं त्या व्याह्यांच्या कलाप्रमाणें वागणं झालं. एकदां भावोजींच्या जावयांच्या गळ्यांत माळ पडे तोंपावेतों त्यांचं बोलणं आमच्यानीं मोडवेना. तेव्हांच तुह्माला रासन्हाणं द्यायचं होतं. पातळ देखील घरांत आणून ठेवलेलं तसंच आहे. तुह्माला दाखवितें पाहिजे तर. आमच्या भावोजींची तरी एकुलती एकच मुलगी आहे. आह्माला तुम्ही ह्मणजे कमी आणि ते जास्ती असं कांहीं मुळींच नाहीं. उलटा तुमचाच वडील मान आहे. तुम्ही अगदीं काडीची देखील शंका मनांत आणूं नका. कमजास्त झालेलं सगळं बोलणं इथल्या इथेंच बरं! चला आतां देवदर्शनास जाऊं.

**लक्ष्मी०**—चला, तुमच्यापुढें कनै माझं कांहीं चालत नाहीं. (जातात.)

(दुसऱ्या दिवशीं जावयांची व विहिणींची रवानगी केली.)

---

# अंक दुसरा.

## प्रवेश पहिला.

**स्थळ.** इंदूर. बाबासाहेबांचा दिवाणखाना.

**पात्रें.** लक्ष्मीबाई, बाबासाहेब, गणोजी, रामजी.

**बाबासाहेब**—(देवपूजा करितांना फुलें वाहतां व

बोलतात. ) आज हा प्राजक्ताच्या कळ्यांचा अब्दागीर व फुलांची छत्री कोठून आणली?

**लक्ष्मीबाई**—आपल्या अन्नपूर्णेनें केली ती.

**बाबा**०—वाः! फार पसंत आहे बुवा. ह्या जिनसा सोवळ्यांत घेण्याजोग्या आहेतना पण?

**अन्नपूर्णा**—हो, त्या केळीच्या सोपटांनीं व चोयांनींच केल्या आहेत.

( असं बोलून जाते. )

**बाबा**०—( बायकोकडे पाहून ह्मणतो. ) कां कशी आहे कुशळता?

**लक्ष्मी**०—आह्माला नव्हतं बाई हें ठाऊक. हा पहा मोगऱ्याच्या फुलांचा दुहेरी गजरा कसा छानदार गुंफला आहे तो! आणि कनै कामाची टापटीप देखील बरी आहे हो! बाळाच्या धोत्राच्या निऱ्या कशा चापचोप करून ठेवते कीं, जसं नेमूंचं सोडून ठेवलेलंच आहे. मला काय वाटलं कीं, ही फार फार दिवस माहेरींच रहाते. हिला आपल्याकडलं कामाचं वळण कसं लागेल कोण जाणे! पण हुषार आहे! ह्या खेपेला तिनें येथलं काम एक्या आठ दिवसांत आपल्या आटोक्यांत आणलंन्.

**बाबा**०—बरं चला! तुला आवडलें ह्मणजे झालें. आपल्याला तिच्या माहेरच्यांशीं काय करावयाचें आहे? आपली वस्तु चांगली असली ह्मणजे झालें.

**लक्ष्मी**०—फारच चांगली! पण चांगली ह्मणून फार नावाजूं नका हो. नाहीं तर डोक्यावर बसेल.

**बाबा**०—चांगल्याला चांगलें ह्मणायला काय हरकत

आहे? वाईट गुण केले ह्मणजे वाईट ह्मणूं. तिला वाईट ह्मणून घेण्याची भीती नाहीं काय?

**लक्ष्मी०**–तें खरं हो पण तोंडावर चांगलं ह्मटल्यानें माणूस चढून जातं.

**बाबा०**–मला तर असें वाटतें कीं, तोंडावर चांगलें ह्मटलें तर त्याला आणखी उत्तेजन येतें.

( इतक्यांत बाळा येतो. )

**लक्ष्मी०**–कायरे बाळा, आतां तूंच सांग याचं उत्तर. एखाद्याला तोंडावर चांगलं म्हणावं कीं पाठीमागून!

**बाळासाहेब**–पण ही गोष्ट कशावरून निघाली?

**लक्ष्मी०**–तें कशाला तुला हावं? निघाली कशावरून तरी! मी तुला विचारलं ह्याचं उत्तर सांग आधीं. एखाद्याला तोंडावर चांगलं ह्मणावं कीं पाठीमागून?

**बाळा०**–असं मोघम विचारलं ह्मणजे कांहीं खात्रीनें सांगतां येत नाहीं. पण सांगच ह्मणतेस ह्मणून सांगतों. केव्हां केव्हां तोंडावर चांगलें ह्मणणें चांगलें आणि केव्हां केव्हां पाठीमागून चांगलें ह्मणणें चांगलें.

**लक्ष्मी०**–( हसून. ) हेंरे काय असं दुटप्पी उत्तर? एक सांग काय तें.

**बाळा०**–आई, हें मीं खरेंच सांगितलें. ह्या प्रश्नाचें उत्तरच असें आहे. कसें तें पहा. एखादा मूर्ख मनुष्य शेरंडावण्याजोगा असला तर त्याच्या तोंडावर कधींच चांगलें ह्मणूं नये. त्याला पाठीमागूनच चांगलें म्हणावें. आणि—

**लक्ष्मी**०--पुरे! झालं माझं काम. ( बाबासाहेबांकडे वळून ) कां कोणाचं खरं झालं?

**बाबा**०–पण त्याचें उत्तर पुरतें होउं दे तर खरें!

**लक्ष्मी**०–बरं होऊं द्या! पण माझंच खरं. सांग बाळा सांग.

**बाळा**०–आणि एखाद्या मुलानें एखादें काम चांगलें केलें तर त्याला तोंडावर चांगलें ह्मणावें, शाबासकी द्यावी इतकेंच नाहीं तर बक्षीस देखील द्यावें.

**बाबा**०–कां आतां कोणाचें खरें?

**लक्ष्मी**०–तो मागून काय पाहिजे तें सांगू द्या. पण त्यानें पहिल्यानें सांगितलं तेंच खरं. माझंच ह्मणणं खरं.

**बाबा**०–आतां मी परस्पर त्याच्या बोलण्यावरून ह्मणतों कीं, केव्हां केव्हां तुझंही खरं होईल पण सध्यां कोणाचं खरें?

**लक्ष्मी**०–सध्यांच माझं ह्मणणं खरं. आपण ज्याजविषयीं बोलत आहों हें माणूस नाहीं का चढून जायचं? ह्मणून तर मी ह्मटलं कीं, तोंडावर चांगलं ह्मणूं नये ह्मणून!

**बाबा**०–वाः! ही मूर्ख का आहे? ही शेरंडावणारी नाहीं. हिला आणखी उत्तेजन देखील येईल.

**लक्ष्मी**०–आतां आपण गप्प बसावं. मी त्यालाच पुन्हां विचारतें. बाळा, ही तुझ्याच बायकोची गोष्ट. आतां सांग तिला तोंडावर चांगलं ह्मणावं कीं पाठीमागें?

**बाळा**०–ह्यांत मला मुळींच कांहीं कळत नाहीं. आपण आपले आतां बहिरे! (कानावर हात ठेवतो.)

**लक्ष्मी**०–पक्का आहेसरे तूं. ( बाळाकडे बोट दाखवून ) आतां लाजला तो! माझंच खरं.

( इतक्यांत अन्नपूर्णा येते. )

**वाळा०**—( आईच्याजवळ लाडुकपणानें जाऊन ) तें राहूंदेग. त्यांत कांहीं नाहीं. पण आतां श्रीखंड कधीं करणार ?

**लक्ष्मी०**—तुला तें फार आवडतं ह्मणून ह्मटलं तूं जाई-पर्यंत दोन चारदां करणार आहें. आणि आजही केलं आहे.

**वाळा०**—तर मग आज इच्छाभोजनच ह्मणावयाचें. माझी आई काय आई एक कल्पतरु आहे. श्रीखंड ह्मटलें तों श्रीखंड तयार ! !

( इतक्यांत भोजनाची वर्दी येते सर्व जातात. )

---

## प्रवेश दुसरा.

**स्थळ.** बाबासाहेबांच्या घराची ओटी.

**पात्रें.** लक्ष्मीबाई, अन्नपूर्णा, बोवाजी.

**बोवाजी**—बं भोला ! शंकर शंकर ! गुरु दत्तात्रय ! लाव माई भिच्छा.

**अन्नपूर्णा**—( तांदूळ घालण्यास पुढें येते. )

**बोवा०**—हंम चावल नहिं लेनेवाले.

**लक्ष्मी०**—तुह्माला पीठ घालूं का ?

**बोवाजी**—नहीं नहीं; हमकूं आटा नहीं चाहिये. दोप-हरका बखत है ! भगवत् कोनसे बखत कोनसा रूप लेताहै और भक्तजनोका कल्यान करता है. तुमकूं कुच खबर है ? तुम हमकूं पछानते है ?

लक्ष्मी०—आह्माला काय ठाऊक बोवाजी ?

बोवाजी—अच्छा ! हमारेपर तुमारा विस्वास है ?

लक्ष्मी०—हो. विश्वास नाहीं तर काय झालं ?

बोवाजी—नहीं नहीं ! ऐसा विस्वास नहीं बैठनेका. मै कहताहूं ये बात सुन लेव. सब अदमी एक सरीखे नहीं होते और सब मंगनेवाले बोवाभी शंकर नहीं होते. देखो, मनमें विचार करो, मैं कहताहूं के तुमारेकूं बहुत दिनतक लडका नहीं था. क्यौं ? सच है के झूट ?

लक्ष्मी०—खरं आहे महाराज. मग मी.

बोवाजी—तुम मत बोलो. मैं आपकूं सब हवाल बयान करताहूं. अभिभी तुमारेकूं जो लडका है ओ दुसरेका लिआहै. लडका आच्छा है. गुणीजन है. विद्वान् है. और उसका नसीबभी बहुत अच्छा है. बहुत पैसा कमायेगा. जब आपने लडका लिया होगा तबसे आपकूंभी बहूत फायदा हुवा होगा. बडा भाग्यवान् है, लेकिन ( नजीक सून उभी होती तिच्याकडे पाहून ह्म० ) ये कोन तुमारे लडकेकी औरत है ?

लक्ष्मी०— होय.

बोवाजी—जाव बेटा अंदर जाव. हमारे सरीखे बावा, कानफटे, गुसाई उनकी बात बचपनमें सुन्ना नहीं. ये तुमारी सास ह्यां बैठी है उसकूं हम सब कहतेहैं. ये तुमकूं सुनावेंगी. जाव अंदर जाव.

( अन्नपूर्णा आंत जाते. )

बोवाजी—( हळूच बोलतो ) देखो ये तुमारी वहू है

उसका सामुद्रिक लछन बहुत बुरा नजर आता है. उसके भिवर्योके पास जो गंड है ये उस्से बढनेवाला है. ये गंड जैसा जैसा बढेगा वैसा वैसा तुमकूं अवगुन होगा. बचपनमें अवगुन कुच मालुम पडने लायक नहींथा. लेकीन् ये ऐसा बुरा लछन है के मैं क्या कहूं? ये औरतका जो तुम संगत रखोगे और तुमारा लडका इसका संग रखेगा तो तुमारा जी एक तुटेला फुटेला जहाजमें बैठेला है वैसा समजो. उसके सरीखी औरत करनेसे कुलक्षय होता है मेरेपर कुच बिस्वास होगा तो इसकूं छांडकर छोकरेकूं दुसरी औरत करदेव. बहोत मिलेगी. शास्त्रमें लिखा हैके "त्यजेदेकं कुलस्यार्थे, ग्रामार्थे च कुलं त्यजेत् ॥ ग्रामं जनपदस्यार्थे, आत्मार्थे पृथिवीं त्यजेत् ॥" यह शास्त्रका बचन है. उसका मतलब इतनाहीं हैके एक अदमी छोडनेसें जो सब कुलका स्वार्थ होनेका है तो अदमीकूं छोडना बेहत्तर है. और ग्रामके हितके वास्ते कुलकू छोडना और सब देशकेवास्ते गांवभि छोडना और आत्मार्थे उसका अर्थ ऐसा हैके अपने जीके स्वार्थके खातर सब दुनयाका त्याग करना. ऐसा है. देखो मैं जो आपकूं कहा है इसमें कुच मेरा स्वार्थ नहीं है, आपके कुलका स्वार्थ है. चाहियेसो करो नहीं तो आपका नसीब फुट गया है वैसा समजो. आपका नसीब बहुत अच्छा है इसवास्ते मेरेकूं ये बात कहनेकी बुद्धि हुई! अच्छा! अबी बहुत देर हुवा; मैं जाताहूं. (असें ह्मणून जाऊं लागतो इतक्यांत लक्ष्मीबाई त्यास आग्रह करून शिधा देते व बोवाजी तो घेऊन निघून जातो)

---

## प्रवेश तिसरा.

**स्थळ.** दिवाणखाना.

**पात्रें.** बाबासाहेब, लक्ष्मीबाई, विश्वंभरशास्त्री, ग्रामजोशी, बाळासाहेब व रामजी.

**लक्ष्मी०**—एक गोष्ट बोलावयाची आहे. बोलूंना? नाहीं तर राग यावयाचा एखादा?

**बाबा०**—( हंसत हंसत ) अंमळ हळू! हळू तरी बोल! एखाद्यानें ऐकलें तर तो ह्मणेल ह्यांच्या घरीं बायकांना बोलायला परवानगी मागावी लागते?

**लक्ष्मी०**—तसं नाहीं कांहीं, नेहमीच्या बोलण्याला कांहीं परवानगी नाहीं घ्यावी लागत? पण तसंच कांहीं मोठें प्रकर्ण असलं ह्मणजे आपलं विचारून बोलावं हें चांगलं. बोलूंना पण?

**बाबा०**—पुरे पुरे! बोला आतां काय बोलायचें आहे तें. असेल झालें कांहीं त्या गंगाधर आचाऱ्यानें असें असें केलें ह्मणून, नाहीं तर एखाद्या गड्याचें कांहीं असेल. दुसरें काय असावयाचें आहे? पण डौल किती आणला आहे? बोलूंना पण? बोलूंना पण? बोल हो खुशाल बोल. तुला परवानगी आहे.

**लक्ष्मी०**—परवानगी रागानें मिळो कीं लोभानें मिळो. आपल्याला बोललं पाहिजे खरं! आपल्या सर्वांच्या घाताचीच गोष्ट ती! ती आपल्याच्यानें तर बाई पोटांत घालवणार नाहीं! मला कळल्यापासून मनाला जशी हुर हुर लागून गेली आहे. आणि इकडे कळवल्यावर तरी काय?

चित्ताला स्वस्थता का रहाणार आहे ? आपल्याला देखील फार वाईट वाटेल. पण ह्या वाटण्याला भिऊन स्वस्थ का बसावयाचं आहे ? आपल्याला कळवलंच पाहिजे. त्यावांचून तर इलाज नाहीं. आपल्या घाताचं निराकरण आपणच केलं पाहिजे. सगळी तजवीज जमण्यासारखी आहे. कांहीं फारशी काळजी वाळगायला नको.

**बावा॰**–(अंमळ विचारांत पडल्यासारखें करून) आतां हें असेंच बोलणें लांबवायाचें कीं सांगावयाचें आहे पटकन् ? (अंमळ आश्चर्यानें) आतां जेवणाच्या अगोदर आपण गप्पा मारीत बसलों होतों. आणि इतक्यांत हिला आमच्या घाताचं कारण सांगण्याला ब्रह्मदेव आला ! मूर्ख कोठली ! एखादें स्वप्न विप्न पडलें असेल तेंच आपलें आणलें बाऊ करून; झालें !

**लक्ष्मी॰**–अहो स्वप्न नाहीं ! प्रत्यक्ष जागेपणांतच ब्रह्मदेव नाहीं साक्षात् शंकरच आला होता आणि त्यानें (कानाशीं लागून) * * * (मोठ्यानें) हें असं असं सांगितलं. आपला याजवर भरंवसा बसो कीं न बसो, पण मी आपणाला सांगतें; मला तर तो अगदीं ईश्वरासारखा वाटला. तो बैरागी खचित नव्हता, देवच तो ! काय त्याचें रूप ! काय त्याची कांति ! मी त्याच वेळेस आपणास उठवणार होतें, पण म्हटलं नको. झोंप मोडली ह्मणजे प्रकृति बिघडायची ! त्यानें जेव्हां सुनेविषयीं हें असं सांगितलं तेव्हांपासून माझ्या मनाला चटका लागून गेला आहे. सोन्याची सुरी झाली ह्मणून का उरीं खुसपून घ्यावयाची आहे ? माझ्या बाळाचं दुसरं लगीन करावयाचं; काय होईल तें होवो !

**बाबा**०–अग हो पण हो ! अशी उतावळी होऊं नकोस. असल्या जोगड्यांच्या बोलण्यावर विश्वास ठेवून कोणी माणसें का टाकलीं आहेत? गावांत चांगले चांगले विद्वान् जोशी आहेत. त्यांना विचारूं. त्यांचें मत काय आहे तें पाहूं. एखादी शांत विंत असली तर करून टाकूं. बोलली, दुसरें लगीन ! लगीन काय सोपें आहे? लोक काय ह्मणतील?

**लक्ष्मी**०–लोक काय ह्मणतील? भिडस्त असतील ते तोंड पाहून बोलतील. असा स्पष्ट बोलणारा कोण आहे? मेल्यांच्या हातावर दक्षिणा दिली ह्मणजे पाहिजे तसा शास्त्रार्थ काढून देतील, त्यांना का दुसऱ्याची कळकळ आहे? नवरा मरो कीं नवरी मरो ! दक्षिणा मिळाली ह्मणजे झालं. मी कांहीं आपल्या मुलाचं दुसरं लगीन केल्यावांचून रहायची नाहीं !

**बाबा**०–काय सांगावें बोवा ! हा एक नस्ता भोगच उभा राहिला. ( मनाशीं ) आतां हें हिच्या मनांतलें घालवावें कसें? (उघडपणें ) पण अग ए, तूं अंमळ दम धर ! सगळेंच बोलून संपवूं नको. कोणतेंही काम युक्तीनें केलें पाहिजे. लगीन दुसरें करण्याचें ठरलें तरी देखील हिला युक्तीनें माहेरीं पाठविली पाहिजे. उगीच बचबच करून काम मात्र बिघडेल. तुझें वाईट होणार आणि आमचें नाहीं का वाईट होणार? आह्माला नाहीं का त्याची काळजी? धीर धर. धीर सो गंभीर ! तूं येथें बाजूला उभी रहा. मी जोशी बोवांला बोलावून आणतों. आणि जशी कांहीं तिऱ्हाइताची गोष्ट आहे, अशी बतावणी करून खरा शास्त्रार्थ काय आहे तो काढून घेतों. तूं अंमळ

स्वस्थ बैस. मुलीच्या कानावर यांतील एक शब्द देखील जाऊं देऊं नको. आणि जोशी बोवा आले ह्मणजे बाळालाही इकडे हाक मार.

( असें बोलून राम्याला हाक मारून जोशीबोवांस बोलावूं पाठवितात. )

( जोशीबोवा येतात. )

**जोशीबोवा**–नमस्कार !

**बाबा**०–नमस्कार ! आपण बोलावणं पोंचल्यावरून आलां कीं वाटेंतच रामजीची गांठ पडली व त्यानें निरोप सांगितला ?

**जोशी**०–आह्माला निरोप नाहीं नि बोलावणेंही नाहीं पोचलें ! आह्मी आपले शेजारच्या घरीं आलों होतों, तों इकडे सहज आलों; ह्मटलें इकडे आलों आहें तों रावसाहेबांची भेट घेऊन जावें !

**बाबा**०–मग हा गेला कोणाला बोलावूं ? काय चमत्कारिक माणसें आहेत बोवा हीं ? आतां आपण सहज आलां ह्मणून ठीक झालें. नाहीं तर आपले बसलों असतों वाट पहात, असेंच कीं नाहीं.

( इतक्यांत रामजी शिपाई येतो. )

**रा**०–आले ! रावसाहेब !

**बाबा**०–अरे कोण ! तूं कोणाला बोलावूं गेला होतास ?

**रा**०–इस्वंभर शास्त्री जोसीबोवा. आन् आपन् त्यांस्नीच सांगितलं नव्ह का ?

**बाबा**०–अरे वाः ! हें मोठें प्रकरण. ह्यांना कशाला तसदी दिलीस ? बरोबर ऐकत नाहींस आणि कांहीं नाहीं.

आणि करितोस झालं कांहीं तरी ! मी सांगितलं होतं (बसलेले जोशीबोवांकडे हात दाखवून ) ह्यांना बोलावण्याला.

( विश्वंभरशास्त्री येतात. त्यांजकडे पाहून )

यावें, बसावें ! या राम्याच्या चुकीमुळें आपणास येथें येण्याची तसदी पडली, पण अह्मांस मोठाच लाभ झाला ! ग्रामजोशीही आहेत. आपणही आहांत. थोडीशी कांहीं एक्या कामांत समजूत करून घ्यावयाची आहे.

**विश्वंभरशास्त्री**–विचारावं ज्याहेत्ते. कळेल तर उत्तर देऊं !

**ग्रामजोशी**–येथें काय? येथें अवघ्या जगांतल्या जरी पृच्छा आणल्या तरी शास्त्रीबोवांपुढें त्यांचा लयच व्हावयाचा. आजपर्यंत नाशकाहून, पुण्याहून, सातार्‍याहून मोठमोठाल्या शंका येथपावेतों आल्या, त्यांपैकीं एखादी शिल्लक आहे काय? कळेल तर उत्तर देऊं हें म्हणणें आमच्यासारख्याला शोभेल !

**विश्वंभर**०–छे ! छे ! ! आपणही विद्वान् आहां. समयस्फूर्ती होऊन वेळेवर शंकेचं समाधान होणं ज्याहेत्ते अवघड आहे.

**बाबा**०–तसली कांहीं माझी शंका नाहीं. त्या तुमच्या विद्वानांच्या शंका. आह्मी आपले गृहस्थ भाई ! कांहीं तरी व्यवहारांतलाच शास्त्रार्थ विचारावयाचा झालं; ( इतक्यांत मुलगा येऊन नमस्कार करून जवळच बसतो ) मी असें विचारतों कीं, एखाद्या मनुष्याकडे सहज पाहिलें तर असें सांगतां येईल का कीं तें मनुष्य ज्याच्या कुळांत असेल त्याचा कुळक्षय होईल ?

**विश्वंभ०**—हो ! हो ! ! ज्याहेत्ते असलीं पुष्कळ लक्षणं आहेत. पण तीं पहातो कोण आतां ? कां जोशीबोवा सत्य कीं मिथ्या ?

**ग्रामजोशी**—सत्य आहे. आतां टिपणें देखील पाहण्याची पंचाईत ! मग हा तर सामुद्रिकशास्त्राचा विचार. हा कोणी पहातही नाहीं व तो कोणाला अवगत ही नाहीं.

**विश्वंभर०**—अवगत नाहीं कां ह्मणतां ? ज्याहेत्ते शोधक आहेत त्यांना सर्व अवगत आहे. वराहसंहिता नामक एक ज्याहेत्ते मोठा ग्रंथ आहे, त्यांत वराहमिहिराचार्यांनीं पुरुषांचीं व स्त्रियांचीं सर्व ज्याहेत्ते शुभाशुभ लक्षणं सांगितलीं आहेत. भट्टोत्पलांनीं देखील पुष्कळ ज्याहेत्ते वर्णन केलेलें आहे. (**श्लोक**) कुलक्षयकरी दीर्घा, ग्रीवा ऱ्हस्वा च निस्वना ॥ पृथुत्वया प्रचंडत्वं, ग्रीवया योषिता वदेत् ॥ १ ॥ तसेंच (**श्लोक**) यस्यास्तु हसमानाया जायंते गल्लकूपकाः ॥ भर्तारं हंति सा क्षिप्रं, नैकत्र वसते चिरं ॥ २ ॥ भावार्थ आला कां लक्षांत ?

**बाबासाहेब**—( बाळासाहेबांकडे पाहून ) कां समजलानारे भावार्थ ?

**बाळा०**—समजलों. उत्तानार्थीच श्लोक आहेत हे. ह्मणजे लांब मान असली तर ती स्त्री कुलक्षय करणारी होते. आंखुडमानी असली तर निर्धन होते, स्थूल ग्रीवा असली तर प्रचंडत्व प्राप्त होतें, इत्यादि गोष्टी पहिल्या श्लोकांत सांगितल्या आहेत. दुसऱ्यांत असें सांगितलें आहे कीं, ( गालांतल्या गालांत हंसून ) हंसतांना गालांला जिच्या खळगे पडतात ती स्त्री लौकरच भर्त्याला मारिते, अक्षयीं एकत्र रहात नाहीं.

विश्वंभर०—भले शाबास! जाहेत्ते उत्तम भावार्थ सांगितलात. आणखी एक आर्या आठवली. उत्पात गंड पिटिका, दक्षिणतो वामतस्त्वभीघाताः ॥ धन्या भवंति पुंसां, तद्विपरीताश्च नारीणां ॥

बाबा०—बाळा, कायरे ह्याचा अर्थ?

बाळा०—ह्याचा कां? ह्याचा इतकाच कीं, गंड (गांठ) पिटिका इत्यादि उजव्या भागाला उत्पन्न झाल्या तर तो पुरुष धन्य होतो. व डाव्या बाजूला असल्या तर त्यापासून वाईट परिणाम होतो. यांच्याविरुद्ध स्त्रियांचीं लक्षणें समजावीं. ह्मणजे पुरुषांच्या उजव्या भागाला जीं लक्षणें चांगली तीं स्त्रीच्या डाव्या भागाला असलीं तर चांगलीं व उजव्या भागीं असलीं तर वाईट. कां असेंच ना शास्त्रीबोवा?

विश्वंभर०—ठीक आहे. असेंच, याचप्रमाणें. श्लोक ॥ इति पिटकविभागः प्रोक्त आमूर्धतोयं ॥ व्रणतिलकविभागेऽप्येवमेव प्रकल्प्यं ॥ भवति मशकलक्ष्मावर्तजन्मापि तद्वन्निगदितफलकारी प्राणिनां देहसंस्थं ॥ १ ॥

जोशी०—हें एक भांडार आहे! पाहिजे तें प्रकरण काढा. आपल्या या प्रांतांत असले विद्वान् कोणीही नाहींत.

बाबा०—शास्त्रीबोवांनीं श्लोक ह्मटला त्याचा अर्थ माझ्या लक्ष्यांत नाहीं आला!

जोशी०—त्यांत कांहीं विशेष लक्षणें सांगितली नाहींत. फक्त इतकेंच सांगितलें आहे कीं, जसा हा गंडपिटिकाविभाग वरील श्लोकांत मस्तकापर्यंत सांगितला त्याप्रमाणेंच व्रण, तीळ, मस, भोंवरा, इत्यादिक चिन्हें जीं अं-

गावर असतील त्यांचीं हीं फळें जाणावीं ! अस्तु. शास्त्रीबोवा माझ्याही एका पोथीच्या मलपृष्ठावर एक श्लोक लिहिला आहे कीं, त्रीणि यस्याः प्रलंबंते ललाटमुदरं स्फिचं ॥ स्त्रीश्च सा पुरुषान् हंति देवरं श्वशुरं पतिं ॥ १ ॥ भावार्थ. जिचें ललाट, उदर, आणि कुले लोंबलेले असतात ती ( अनुक्रमेंकरून ) दिराला, सासऱ्याला, व पतीला मारिते. तर मग असे सामुद्रिकशास्त्रांत पुष्कळच प्रकार असतील नाहीं काय ?

**विश्वंभर०**–हो ! हो ! ! असतील ह्मणजे ज्याहेत्ते आहेतच. पण ते पहातो कोण ? आणि ज्याहेत्ते पाहूं लागलें तर विवाह होण्यास फार पंचायती पडतील, ह्मणून कोणी पहातही नाहीं. हे कोण आपले चिरंजीव वाटतें ?

**बाबा०**–होय.

**विश्वंभर**–चांगले हुषार आहेत. संस्कृत भाषेचा चांगला अभ्यास झाला आहे. आज हा चमत्कारिक प्रश्न जाहेत्ते कोठून निघाला ?

**बाबा०**–कांहीं त्यांत विशेष मुद्दा नाहीं. सहज मनांत विचार आला कीं, सामुद्रिक शास्त्रांत काय काय आहे ?

**विश्वंभर**–मोठा शोध ज्याहेत्ते आपला ! जोशीबोवा, जाहेत्ते आतां असले गृहस्थ विरळा बरं !

( नंतर पानसुपारी दक्षणा बाबासाहेब देतात व जोशी जातात. )

## प्रवेश चवथा.

**स्थळ.** दिवाणखाना. (निजावयाचा.)

**पात्रें.** बाबासाहेब, लक्ष्मीबाई व बाळासाहेब.

**बाबासाहेब**—निजली वाटतं मुलगी? विचारी गरीब रे गरीब! पुढें येणारें संकट! तिच्या अजून ध्यानीं मनींही नाहीं.

**लक्ष्मी०**—निजली ती मघाशींच! कां झाली खात्री कीं अजून कांहीं संशय आहे? अहाहा! काय सांगूं त्या बोवाजींचं स्वरूप, तेजःपुंज! मला वाटलं कीं, प्रति ईश्वरच तो! आपल्याला मोठ्या संकटांतून पार पाडलन त्यानें.

**बाबा०**—काय बोवा, मला कांहीं सुचेनासें झालें आहे. इकडे पोरीकडे पाहिलें ह्मणजे फार वाईट वाटतें. तिची कला कुशळता किती? तिच्या बोलण्यांत नम्रता किती? तिचे गुण आठवले ह्मणजे त्याग करण्याचें अगदीं जिवावर येतें. बरें न त्याग करावा तर दुसरी तिसरी हलकीशी भीति नाहीं. लागलीच कुलक्षयाची गोष्ट! करावें तरी काय? अशा मोठ्या विचारांत पडलों आहें.

**लक्ष्मी०**—विचार कसला त्यामध्यें? तिच्यामुळें आपला का घात करून घ्यावयाचा आहे? पोटच्या पोराला रक्तपिती झाली तर घरांत बाळगून रोग जडवून घेतात काय? त्याला एकीकडे टाकलंच पाहिजे.

**बाबा०**—ती गोष्ट खरी. पण तो व्याधिष्ठ तरी असतो. ही चांगली धड धाकट, हिचा त्याग केल्यावर हिनें आयुष्य कसं काढावं?

**लक्ष्मी०**—नाहीं नाहीं त्या एकेक कल्पना! हिच्या

एवढाल्या पोरींचे नवरे मरतात तेव्हां त्या कसं काढतात? हिचं नशीब फुटकं, येथें आपण काय करणार? बोलूं नये पण बोलणं येतं. हिच्याशीं आपण संबंध ठेवला आणि हिच्यापायगुणांनीं + + भलतं नि सलतंच झालं ह्मणजे मग कसं कंठील?

**बाबा०**—नको नको. भलतं सलतं नको बोलूं! तेंच तर माझ्या मनांत घोळतं आहे. परमेश्वर बाळाला सुखी राखो. पण आणखी एकदां विश्वंभरशास्त्र्यांला बोलावून आणलें पाहिजे आणि विचारलें पाहिजे कीं, असा प्रसंग कोणावर आला असला तर त्याला कांहीं तोड आहे कीं नाहीं?

**लक्ष्मी०**—आपण पडलां आतां मायापाशांत! आपलं हित आपल्याला कळत नाहीं ह्मणजे काय? शास्त्रीबोवांना काय? आपण आग्रहानें विचारलंच तर एखादी शांत सांगतील झालं. पण शांतीनें हें लक्षण नाहींसं का होणार आहे? हें दिवसानुदिवस वाढतच जाईल असं निखालस तो बोवाजी ह्मणाला. मनाला मळमळच कीं नाहीं?

**बाबा०**—तूं ह्मणतेस तेंही खरेंच आहे, पण आतां करावें कसें? त्या पोरीकडे पाहून फार वाईट वाटतें.

**लक्ष्मी०**—करावं कसं? करावं कसं? असा जप करीत बसावं ह्मणजे झालं! मी साफ सांगतें कीं, आपल्याला बाळाचं लगीन केलंच पाहिजे. मी कांहीं उद्यांपासून इच्या हातचं पाणी देखील घेणार नाहीं. हाच निश्चय!

**बाबा०**—मी आतां वेडा झालों आहें. मला कांहीं सुचत नाहीं. बाळा कांहीं आतां लहान नाहीं. एकदां त्याला विचार बरं तो काय ह्मणतो पाहूं!

**लक्ष्मी०**—त्याला काय विचारावयाचं आहे? लेंकरूं तें!

जसं आपण सांगाल तसं ऐकेल तो. आपल्या आज्ञेबाहेर का आहे आपला बाळा?

**बाबा०**—पण विचार तर खरी तूं!

**लक्ष्मी०**—मी आतां हाक मारून आणितें आणि त्याला सांगतें कीं, उद्यां तुझ्या बायकोला माहेरीं पाठवून देतें आणि तुला दुसरी बायको करून देईन.

**बाबा०**—पहा, त्याचें मन वळतें का; पहा, मग एखादा विचार करतां येईल.

**लक्ष्मी०**—पुन्हा तेंच तें! त्याला काय विचारावयाचं आहे? मी आतां हाक मारून बाळास सांगतें. (असें बोलून बाळास हाक मारते.)

(बाबासाहेब झोपेचें सोंग घेतात.)

**बाळासाहेब**—(चपापल्यासारखा येऊन) कायग आई! मी आतां निजणार होतों. मला कां हाक मारली?

**लक्ष्मी०**—इकडे ये. बैस येथें. ह्मणजे तुलाच सांगतें.

**बाळा०**—(उभ्या उभ्याच) काय पण काय? (असें ह्मणत जवळ जाऊन बसतो.)

**लक्ष्मी०**—असा घाबरूं नको! मी तुला एक गोष्ट सांगणार आहें पण तूं ऐकशीलना?

**बाळा०**—ह्मणजे? मी कधीं नाहीं तुझें ऐकत?

**लक्ष्मी०**—अरे, हें काम तसं नाहीं. हें मोठ्या महत्त्वाचं आहे. दुपारीं जोशीबोवा, शास्त्रीबोवा काय ह्मणाले तें तूं ऐकलंसना? तें सगळं ह्या तुझ्या बायकोविषयीं बरं. (कानांत सांगते) (उघडपणें) आतां असं असं करावयाचं समजलास?

**बाळा०**—काय ह्मणतेस? मी हिला टाकून देऊं? आ-

णि दुसरें लग्न करूं? बाबाही याला रुकार देतात? अरेरे! किती भोळेपणा हा! तूं उठीव त्यांना. मला ह्या बावतींत त्यांच्याशीं पुष्कळ बोललें पाहिजे.

**लक्ष्मी०**—अरे पण माझ्याशीं तर बोल, मग तिकडे.

**बाळा०**—तुझ्याशीं बोलून ह्या कामांत तुझी समजूत लौकर पडावयाची नाहीं. तुझीचशी काय? तुला राग नको येऊं देऊं. बहुतेक सर्व बायका अशा तुझ्यासारख्याच असतात!

**लक्ष्मी०**—(अंमळ रागानें) मोठा आला शहाणा! कालचा नि मंगळवारचा! हा वडिलांना अक्कल शिकवणार! तूं त्यांना काय सांगणार तें मला सांग आधीं! मला कांहींच का कळत नाहीं? आह्मी तुझं अनहित का करूं?

**बाळा०**—आई, तुह्मी खचित माझें अनहित करणार नाहीं. जें माझें हित त्यांतच तुमचें कल्याण हें मी समजतों. पण तुमचा हा विचार चमत्कारिक व गैरसमजुतीचा आहे. ह्या तुमच्या सल्ल्याप्रमाणें जर मी वागलों तर तुह्मी फसाल इतकेंच नाहीं तर अखेर पस्तावाल सुद्धां. असो आतां तूं बाबांना उठीवच. मग मी त्यांच्यापाशीं कसें बोलतों तें तूं ऐक पाहिजे तर!

**लक्ष्मी०**—(बाबासाहेबांस उठवूं लागते व ते अधिकच झोंपेचें सोंग घेतात.) जा, नीज जा आतां. त्यांना झोंप लागली आहे, आतां उद्यां बोलूं. पण मी सांगितलं याचा पुरता विचार कर. त्यांत तुझं कल्याणच आहे.

(बाळासाहेब अभ्यासाच्या खोलींत जातो.)

**बाबा०**—गेला का तो? मी जागाच होतों. हें पहा, तो आहे इंग्रजी शिकलेला. त्यांचा विश्वास अशा गोष्टीं-

वर नसतो. ह्यांच्याशीं बोलण्याला आपल्याला पुरें पडवणार नाहीं. भिडस्त आणि मर्यादशीळ पडला ह्मणून तो काल कांहीं बोलला नाहीं. नाहीं तर त्यानें विश्वंभरशास्त्र्यांची देखील टर उडवून दिली असती. पाहिलेंसना? कसें दुपारीं गालांतल्या गालांत हंसत होता तो! आपल्याला बुवा त्याच्याबरोबर बोलण्याला भय वाटतें. तो बरोबरीचीं उत्तरें देऊन आह्माला कुंठित करूं लागला, ह्मणजे मग आमची काय शोभा राहिली?

**लक्ष्मीबाई**—आपण आज आपल्या मुलाला भितां. मग पुढें कसं करणार? उद्यां तर तिला माहेरीं पोंचवल्यावर तिचे आईबाप भांडायला पुढें येतील. मग लपून बसणार कीं काय? मला कांहीं धडगत दिसत नाहीं आपल्या संसाराची.

**बाबा०**—धडगत दिसत नाहीं तर काय झालें? कां असाच स्वस्थ बसतों? पहिल्यानें आपल्या मुलाचें मन वळवलें पाहिजे, हा आपल्या काबूंत पक्का आला ह्मणजे मग एखादी गोष्ट करतां येईल. तुझ्यासारखें 'घे सुरी आणि घाल उरीं, असें मला नाहीं करितां येत.

**लक्ष्मी०**—काय पाहिजे तें करा! पण यंदा दुसरं लग्न केल्यावांचून राहूं नका ह्मणजे झालें. माझं दुसरं कांहीं ह्मणणं नाहीं? मी उद्यांपासून एक्या कामाला देखील हात लावूं देणार नाहीं आणि तिच्या हातचं पाणी देखील घेणार नाहीं. साफ सांगतें. समजलं?

**बाबा०**—शिकस्त आहे तुझी! पण सहज माहेरीं जाईपावेतों धीर धर! एकदां गेली म्हणजे पुन्हां कोण आणायला पाठवितो आहे? उगीच आतांपासून तिच्याशीं

धुसपूस करून आपल्या नांवाचा दांडोरा मात्र पिटवून घेशील. त्यांत काय अर्थ आहे?

**लक्ष्मी**०—माझं नांव गेलं चुलींत! थोडंकां मेल्यांनीं छळलं आहे? लग्नांत ते तसले वखेडे केले, दिवाळसणाच्या वेळेस तो तसा झगडा केला, आठवण झाली ह्मणजे आंगाची आग होते! वांझोडा ओंडा तर ह्मटलं, आतां आणखी कोणतं नांव ठेवायचं शिल्लक राहिलं आहे? मला लग्नांतच वाटलं होतं कीं, हें कांहीं नांदायचं नाहीं फार दिवस! त्याचा अनुभव अखेर आलाच. आपणाला पाहिजे तर आपण बोलावं तिच्यापाशीं. मी भाषण देखील करणार नाहीं.

**बाबा**०—बरें, आतां तर नीज. मग पाहूं. उद्यांची बात उद्यां. आतां रात्र फार झाली आहे.

**लक्ष्मी**०—पहायचं काय? माझा निश्चय झाला तो झाला! इकडला सूर्य इकडे उगवेल पण माझा निश्चय नाहीं टळावयाचा. मग याच्यापायीं जें होणार असेल तें होईल.

**बाबा**०—बरं, आतां नीज. परमेश्वर चांगलेंच करील.

(लक्ष्मीबाई निजते.)

**बाबा**०—(आपल्या मनाशीं) हर! हर!! काय नस्ता भोग उभा राहिला पहा! कांहीं या गोष्टीची जरूर होती? उद्यां ही तिच्याशीं धुसपूस सुरू करील! मुलाला तें आवडणार नाहीं! मध्यस्ती पडण्याचा इलाज नाहीं! ही (बायको) पडली अशा तऱ्हेची! मुलगा पडला तशा तऱ्हेचा! वेडा, खुळा, साधाभोळा असता ह्मणजे

सांगितलेलें ऐकता तरी ! करावें तरी काय? ह्या वेळेस मुलगा इंग्रजी शिकलेला हुषार असा नसता, तर मी सुखी झालों असतों; तिच्याजवळ बोलण्याच्या त्याच्या थोडक्याच झोंकावरून स्पष्ट दिसून आलें कीं, ही गोष्ट त्याला अगदीं नापसंत आहे. तो ब्र देखील काढूं देणार नाहीं तोंडांतून; पण बोललें पाहिजे खरें ! त्याच्यापाशीं बोलल्यावांचून व त्याचें मन वळविल्यावांचून तर तोड नाहीं. तिच्या माहेरचीं गोंधळ घालतील; अण्णासाहेबांला ठपका देतील, ते आपल्याला नाहीं नाहीं तें बोलतील, त्यांची भीड मोडावी लागेल, मोठा कठीण प्रसंग आला आहे बोवा ! परमेश्वरा ! आतां माझी लाज रक्षिता तूंच आहेस. तुजवांचून दुसरा कोणी त्राता नाहीं ( असें बोलून ईश्वरचिंतन करून निजतो. बाळासाहेबही अभ्यासाच्या खोलींतून येऊन हळूच निजतात. )

( सर्वांस झोंप लागली आहे असें पाहून अनपूर्णा
उठून दरवाजा उघडून तुळशीच्या
आंगण्यांत जाऊं लागते. )

**बाळासाहेब**—( दरवाजा वाजल्याचा कानोसा ऐकून आपल्याशींच ) इतक्या पहांटेस ही एकटी कां उठली असावी बरें ! आज सासूबाईला सोबतीस देखील हाक मारली नाहीं ! हिला कांहीं रात्रींच्या आईच्या बोलण्याची कुणकुण तर नसेल कळली? न जाणो ! ही जागी असेल ! हिचें वय लहान आहे ! स्वभाव अल्लड आहे ! एकदम आपल्यावर मोठाच दुःखाचा प्रसंग आला असें वाटून जीव देखील देईल ! आपला तर अजून हिच्याशीं

बोलण्याचा प्रसंग नाहीं. आईला हाक मारून सांगावें तर नुकतीच उभयतांना झोंप लागली आहे. मी तिकडे अभ्यासाच्या खोलींत होतों पण माझें सर्व लक्ष्य इकडे होतं. आज सारी रात्र त्यांची कुजबुज कुजबुज चालली होती. ह्याजविषयींच असेल ती! असो! त्याचें पाहूं उद्यां. समक्ष काय बोलंणें होईल तें खरें! अरे पण ही दिवा देखील बरावर घेत नाहीं, अंधेरांतच चालली! हाक मारूं का कोणाला? नको. कशाला हाक मारायाला पाहिजे! उगीच बोभाटा व्हायचा व मग ती कां उठली होती हें देखील कळणार नाहीं. आतां एक युक्ति आहे. बस हीच उत्तम! आपणच हिच्या मागोमाग जावें व हळूच काय करते तें पाहवें. तसाच कांहीं प्रसंग दिसला तर होऊं पुढें! आज सारी रात्र झोंप नाहीं! मनांत एकावर एक तरंग येत आहेत. आतां कोठें पहांटेची झोंप लागली असती तर हें काय संकट येत आहे कोण जाणे. (दबकत दबकत तिच्यामागें जातो.)

---

## प्रवेश पांचवा.

**स्थळ.** तुळशीवृंदावनापुढें. (चौकांत)

**पात्रें.** अन्नपूर्णा.

**अन्नपूर्णा**–(तुळशीपुढें बसते व नमस्कार करून) आई माते तुळशी, काय हा प्रसंग मजवर येत आहे? कपाळावरची गांठ नाहींशी होणं किंवा वाढूं न देणं हें माझ्या स्वाधीनचं आहे काय? मीं आतां काय करावं? सासूबाईंचं मन तर आतां मजवर बसेल असं मला वाटत

नाहीं. आजपासून त्या मला दुष्टासारखं पाहतील. हें त्यांच्या बोलण्यावरून स्पष्ट झालं. मामंजींचं मन इतकं निष्ठुर नाहीं, पण ह्यांनीं तें बहुतेक वळविलेंच. आणि रोज रोज त्यांच्यामागें ह्या कटकटी लावून त्या आपलंसं करतील! देवा! न्हाण आल्यावर जर अशी गोष्ट घडवितास तर त्यांच्या तरी पायां पडलें असतें, चार गोष्टी बोललें असतें, त्यांचा पदर धरला असता, त्यांना ह्मटलं असतं कीं, एकदां मला विहरींत ढकलून द्या आणि मग पाहिजे तें करा. अजून मला पुरतं त्यांच्या तोंडाकडे पाहण्याचं धैर्यही होत नाहीं. आतां कसं करूं? काळरूपी दुष्ट तो बोवाजी आला आणि मला आंत जाण्यास सांगितलं, तेव्हांच मी चपापलें. झोंपेची मी येवढी हळवी! पण आज ती कोणीकडे पळून गेली कोण जाणे? सासूबाईचं भाषण ऐकल्यापासून थोडासा झोंपेचा चुटका तरी यायचा होता! पण हरा, शिवा, केशवा! अगदीं स्तब्ध झालें आहें. काय अशीच माझी झोंप जाणार काय? पोटांत कसे कड येत आहेत! मी आपलें हें दुःख सांगूं तरी कोणापाशीं? आई तुळशी, तुजवांचून दुसरं कोणीदेखील या वेळेस माझं सख्खं नाहीं. तूंच त्यांना चांगली बुद्धि दे, त्यांच्या बोलण्यानें मामंजींचं मन वळूं दे. दोघांचं मन एक झालं तर सहसा असं वाईट घडणार नाहीं. पण छे, तसं कसलं घडणार? सासूबाईपुढें मामंजींचं कांहीं चालायचं नाहीं. दुसरं लगीन करण्याचा आग्रह धरतीलच. पण न जाणो. ईश्वरकरणी अगाध आहे. हेच लग्नाला उभे न राहिले तर? देवा असं घडेल काय? छे! आतां कशाला अशी सुखाची आशा धरावी? आपलं न-

शीव आपल्याला दिसूं लागलं, वेडं मन हें. देवी, तूंच काय आतां निभाव लावशील तो खरा! तुळशी माते, मीं तुला शरण आलें आहें, माझी लाज आतां तूंच राख. ( असें ह्मणून पायां पडते व बिछान्यावर येऊन निजते. )

( मागून बाळासाहेबही आपल्या बिछान्यावर येऊन निजतात. )

**बाळा०**–( मनाशीं ) पोरबुद्धि असून काय धारिष्ट हें! एकटी उठून अंधारांत खालीं गेली अँ! किती विचार हे! केवढें संकट तिच्यावर येऊन पडलें आहे? तिला भिऊं नको असें सांगण्याला तरी कोणी आहे का येथें? माझ्या मनांत अगदीं आलें होतें कीं, पुढें व्हावें, आणि खात्रीनें सांगावें कीं, तूं भिऊं नको. पण ह्मटलें नको! तिला गहिंवर आला, आणि गळा काढून मोठ्यानीं रडायलाच लागली, तर! सध्यांच आई व बाबा जागे होतील आणि तारांगण माजेल! आणि दुसरी एक कल्पना मनांत आली कीं, ही इतकी अविचारी नाहीं कीं, भलताच घात करील. मग इतकी घाई तरी कशाला करावी? आपला थोडासा कल तिला कळला आहेच. उजाडल्यावर अधिक स्पष्ट कळेल. काय? ती काय ह्मणाली? बाबांचं मन वळणार नाहीं? पाहिजे तसं करीन, शेंकडो उदाहरणें देईन आणि मन वळवीनच; आणि दुसरं लग्न तर नाहींच करायचं! हा निश्चय तर पक्का झालाच; मग पाहिजे तें होईना? ( असे विचार करतां करतां त्यासही झोंप लागते. )

---

## प्रवेश सहावा.

**स्थळ.** बाळासाहेबांची अभ्यास करण्याची माडी.

**पात्रें.** बाबासाहेब, रावसाहेब, ( बाबासाहेबांचे स्नेही. ) लक्ष्मीबाई, बाळासाहेब, अन्नपूर्णा.

**बाबा०**–अग ए ऐकलेंस का ? मी पहांटेस उठून आपल्या रावसाहेबांकडे गेलों होतों आणि त्यांना आपल्या बाळाचं मन वळविण्याला सांगितलें आहे. ह्मटलें समक्ष बोलण्यांत वेळेस आपली मर्यादा रहाणार नाहीं. बाकी तो मर्यादशील आहे, सहसा मला वांकडा जबाब देणार नाहीं. पण न जाणों ! वेळ आहे, एखादा त्यानें भलताच जबाब दिलान् ह्मणजे मग आपली शोभा काय राहिली ?

**लक्ष्मी०**–( अंमळ अवसानानें ) फार बाष्कळपणा करायला लागला तर फाडकन् एक मुस्कुटांत द्यावी भडकावून, आणि ह्मणावं, माझ्याजवळ नाहीं असले चाळे चालावयाचे ! मला मागं एकदां सांगायचं झालं होतं कीं, मुलाचें फार लाड करूं नये आणि आपण कधीं बोट तरी लावलं आहेका मुलाला ? मी नाहीं कधीं क्षमा करायची ! दोन चार वेळां अशी भडकावली होती कीं, त्याच्या गालाला ठाऊक कीं माझ्या हाताला ठाऊक. अजून तो विसरला नसेल !

**बाबा०**–अग पण नखानें जर तुटत असलें, तर तिथें कुऱ्हाड कशाला लावावी ? परस्परें काम होत असलें तर स्वतः कशाला त्या भानगडींत पडावें ? रावसाहेब कांहीं कमी नाहींत. पोटांत शिरून त्याच्या मनांतलें काढून घेतील. वेळ आली तर दोन बोधाच्या गोष्टीही सांगती-

ल. आणि तशीच जरूर वाटली तर दबकावतीलही ! ह्याच दिवाणखान्यांत ते त्याला घेऊन बसणार आहेत. आपण येथेंच अशीं बाजूला उभीं राहूं आणि त्यांचें व याचें काय बोलणें होतें तें ऐकूं.

**लक्ष्मी०**—बरं, तस्सं होऊं द्या ! पण ते मुळमुळीत बोलायला लागले आणि हाही इकडं तिकडं करायला लागला तर मी पुढें होईन आणि चांगल्या चार खमंरीत गोष्टी बोलेन.

**बाबासा०**—बरें बरें ! बोल ! ते कांहीं परके नाहींत. त्यांच्या देखत बोललीस तरी चालेल; पण आपलें वडील-पणाचें नातें मनांत आणून बोल. आतांच्या मुलांपासून आपली शोभा आपणास राखून घ्यावी लागते; नाहीं तर येशील हमरीतुमरीवर ! चल, आतां बाळा अभ्यासाला येण्याची वेळ झाली, व रावसाहेबही आतां येतील. ( बाजू-ला जाऊन कानोसा घेत उभे राहतात. ) ( बाळासाहेब येऊन पुस्तक वाचीत बसतो. )

( इतक्यांत रावसाहेब येतात, नमस्कार चमत्कार होतो व या बसा होते. )

**अन्नपूर्णा**—( आपल्या मनाशींच ) रावसाहेब एवढ्या सकाळींच कां बरं आले? आणि ते परस्परें त्यांच्याकडेच गेले ! काय बरं असेल हें ? हें कांहीं तरी कालच्या प्रकरणाचंच असेल ! एरव्हीं मामंजी कांहीं कानोसा घेत उभे रहाव-याचे नाहींत. बरं ! आपणही गुपचिप दुसऱ्या खिडकीं-तून ऐकावं ! ( हळूच दुसऱ्या एका खिडकीपाशीं जाऊन ऐकत उभी रहाते. )

**रावसाहेब**—कां बाळासाहेब! आज अभ्यास फार केला वाटतें? डोळे जाग्रणासारखे दिसताहेत?

**बाळा०**—नाहीं. तसें कांहीं नाहीं. आपले उन्हाळ्याचे दिवस! रात्रीची झोंपच लौकर येत नाहीं. मुरकुटें, ढेकूण चावतात, वारा नसतो. आत्तां पहाटेस अंमळ डुलकी लागली होती. इतक्यांत जागा होऊन पहातों तों अगदीं उजाडलें!

**रावसाहेब**—असें चोरून कां ठेवितां? रोज रात्रीं नसतात का मुरकुटें ढेकूण? पण आज कांहीं तरी झोंप न येण्याचें विशेष कारण असेल.

**बाळा०**—( मनांत ) ह्यांना कांहीं आपलें कारण कळलें असेल काय? ( उघडपणें ) छे! तसें विशेष कांहीं नाहीं.

**रावसाहेब**—कशाला लपवितां उगीच? मला सगळें बाबासाहेबांनीं उजाडतांच येऊन सांगितलें आहे आणि तेवढ्याकरितां तर मी मुद्दाम या वेळेस येथें आलों आहें.

**बाळा०**—मग तुमचें ह्मणणें काय आहे?

**रावसाहेब**—मी असें ह्मणतों कीं, दुसरें लग्न करण्यांत तुझा तोटा कोणता? आईबापांच्या मनाला आनंद होईल, चांगले सुखानें नांदाल, संसार कराल, ह्यांत तुह्माला वाईट काय वाटतें आहे? खुशाल टाकून द्यावी पहिली बायको, आणि आनंदानें संसार करावा.

**बाळा०**—रावसाहेब! तुह्मी असें बोलाल असें मला नव्हतें वाटलें? तुह्मी तर चांगले संस्कृत शिकलेले, विद्वान्, कथा पुराणें ऐकलेले आणि तुह्मीच असें ह्मणतां हें मोठें आश्चर्य आहे. विनाकारण स्त्रीचा त्याग करणें

आणि तिचा वध करणें ह्यांत अंतर कोणतें? हें स्त्रीहत्येचें पातक तुम्ही मजपासून करवितां काय? असें करणें तुह्माला योग्य वाटतें काय? आणि असल्या सामुद्रिक लक्षणांवरून आजपर्यंत कोणी बायका टाकल्या आहेत काय? जर इतकें निवळ नितळ पाहून करावयाचें होतें तर लग्नाच्या अगोदरच हवी तेवढी चिकित्सा करावयाची होती! आतां काय उपयोग? लग्नांत आपण कोणत्या वचनांनीं देवाब्राह्मणांसमक्ष गुंतलेले असतों हें बाबांना समजत नाहीं पण तुह्माला तर त्या वचनांचा अर्थ समजतोना? अंधळी, लुली, पांगळी, व्याधिष्ट कशीही असली तरी तिला आतां अंतर देतां कामा नये.

**राव०**—मग तिला अंतर देण्याला कोण सांगतो? तिला खायला प्यायला द्या, वस्त्रपात्र द्या, पालणपोषण करा, तुह्माला नाहीं कोण ह्मणतो आहे? पण बाबांच्या हेतूप्रमाणें दुसरी बायको करून त्यांचा हेतु पूर्ण करा ह्मणजे झालें. आह्मी कांहीं तुह्माला तिचे हाल करायला सांगत नाहीं. एखाद्याला दोन बायका नसतात काय? आमच्याच येथें प्रत्यक्ष आह्मालाच दोन कुटुंबें आहेत हें तुह्मी पाहातांना? मग—

**बाळा०**—काय बोलतां हो? ह्या भाषणांत कांहीं अर्थ आहे? बायकांना जें मुख्य पतिसुख तें अंतरलें आणि पुष्कळ खायाला प्यायला नि ल्यायला देखील दिलें, तर तें त्यांस रुचेल काय? अन्न तरी आंगीं लागेल काय? तिनें ह्या सुखावांचून दिवस कंठावेना? ह्यापेक्षां वैधव्य बरें! मुळींच आशा तरी नाहीं. धडधडीत मी तिचा पति जिवंत असून दुसऱ्या स्त्रीशीं संसार करितों हें तिनें पहावें

आणि स्वतः तळमळत पडावें हे हाल नाहींत ना? ह्यापेक्षां मरण बरें, असें तिला होईल. बाबा एक मला दुसरी बायको करून देतील पण तिला तर दुसरा पति करितां येत नाहींना? कांहीं तरी पोक्त विचार करा! तिला काय वाटेल? ती मनांत ह्मणेल, मी एखाद्या भिकारड्याच्या पदरीं पडलें असतें, तरी बरें झालें असतें. अशा तिच्या पश्चात्तापाला कारण मी व्हावेंना?

**रावसाहेब**—तुमच्याकडे काय त्याचें? तुह्मी होऊन कांहीं तिला टाकीत नाहींना? आईबापांच्या आग्रहास्तव तिला टाकावयाची. हा सर्व दोष व लोकापवाद तुह्मी त्यांजकडे द्या. ते घेण्याला तयार आहेत.

**बाळासा०**—रावसाहेब, आज तुह्मी कांहीं तरी बोलावयाचें ह्मणून बोलतां! आईबापांवर कसचा दोष व लोकापवाद ढकलतां? मी कां आतां लहान आहें? कीं बोवा "आईबापांनीं त्याच्या गळ्यांत दोन लोढणीं बांधलीं त्यास त्याचा काय इलाज आहे" असें लोक ह्मणतील. मी जर लग्नासच उभा न राहिलों, तर हे लग्न कसें लावणार? तिचें सुखदुःख सगळें मजवर अवलंबून आहे. मीं दुसरें लग्न केलें, ह्मणजे झाला तिच्या सर्व सुखाचा मातेरा! आणि आईबापांचें मन वळवून मी लग्नाचा बेत फिरविला कीं झाली तिची काळजी दूर! कां मी ह्मणतो हें खरें कीं नाहीं?

**रावसाहेब**—( आपल्याशींच ) हा जें जें बोलतो तें सर्व खरें आहे. मला अगदीं चिप्प बसावें लागतें. ह्याच्यापुढें माझें बोलणें फिकें पडणार. आतां मी बाबासाहेबांना काय सांगूं? त्यांची समजूत कशी करूं? आतां

ह्यालाच एकदां निक्षून विचारावें. ( उघडपणें अंमळ अवसान आणून ) तूं मातापितरांची अवज्ञा करून आपला हेका सिद्धीस नेणार किंवा ह्याला एखादी तोड काढतोस? तुला जो त्यांनीं अगदीं ल्हानपणापासून वाढवून पुढें हौशीनें दत्तक घेतला तो सुखाकरितां कीं दुःखाकरितां? ह्या तुझ्या आचरणानें आईबापांस सुख होईल काय? याचा कांहीं विचार केला आहेस?

**बाळा०**–हो विचार केला आहे तर? सांप्रत माझ्या आचरणानें त्यांस थोडेसें दुःख होईल, पण परिणामीं सुख होईल. माझी त्यांचें मन दुखविण्याची मुळींच इच्छा नाहीं. व सहसा मी त्यांच्या अनुमतीवांचून फारसा संबंधही ठेवणार नाहीं. मी त्यांचें मन वळवीन. या सामुद्रिकावरील त्यांची भक्ति उडवीन त्या जोगड्याची काय लबाडी असेल ती बाहेर काढीन आणि ह्यांच्या डोळ्यांदेखत ईश्वर करील तर ह्याच स्त्रीला घेऊन सुखानें नांदेन. तुह्मी पहाल? कसाही प्रसंग आला तरी ही स्त्री जिवंत आहे तोंपर्यंत दुसरें लग्न तर हा नाहींच करणार. पहा माझा नेम कसा आहे तो!

**लक्ष्मी०**–( अवसानानें पुढें येऊन ह्मणते ) कायरे! काय ह्मणतोस तूं? दुसरें लगीन नाहीं करणार ह्मणतोस? तर कां तिच्यापायीं आमचा सगळ्यांचा सत्यानास व्हावा अशी तुझी इच्छा आहे? तुझ्यासुद्धां आह्मी मरून जावं आणि तिनें येथें मौजा कराव्या असं तुला वाटतं? आग लागो तुझ्या अकलेला! समजलं तुझं शहाणपण! आमचंच फुटकं नशीब! तुझ्याकडे काय त्याचं! (असें ह्मणून डोळ्यांला पाणी आणिते. )

**बाळा०**—आई, असें भलतें भलतें कशाला बोलून घेतेस, आणि रडून मला कां दुःख देतेस? आई, मी तुला सांगावें असें नाहीं. परमेश्वरावर भरंवसा असूं दे. तो सगळ्यांचें बरें करील. तूं ह्मणतेस असा दुःखाचा प्रसंगच येऊं देणार नाहीं.

**आई०**—अहाहा! बाळा, आतां कसं गोड बोललास? माझं तेंच तर ह्मणणं आहे. दुःखाचा प्रसंग नको येऊं देऊं ह्मणजे झालं. करशीलना दुसरं लग्न?

**बाळा०**—छे, छे, दुसऱ्या लग्नाची गोष्ट नको काढूं तूं! दुसरं लग्न केल्यावांचून आपलें चांगलें होणार आहे.

**आई०**—तर कां ती गांठ आपोआप जिरून जाणार आहे? तूं ह्मणशील ती मी आतां कापून काढीन आणि तेथें पाहिजे तर खळगा करीन. पण हंसतांना गालांला खळग्या पडतात त्यालारे काय करशील? वेडा कुठला! अरे हीं जन्मतांचींच लक्षणें. पदरीं पाप पुष्कळ असलं ह्मणजे या गांठोड्या बरोबर यावयाच्याच.

**बाळा०**—आई, आपल्या शेजारीं गंगाबाई रहाते हीं; एवढी ह्मातारी झाली तरी तिच्या गालांला किती खळगे पडतात? तिला किती मुलगे आहेत? तिचा नवरा आहेना अजून जिवंत? अग ह्या लक्षणांशीं आणि नवरा मरण्याशीं किंवा कुलक्षयाशीं काय संबंध? तें सर्व मिथ्या आहे.

**लक्ष्मी०**—तूं सगळ्याला खोटं ह्मणशील. प्रत्यक्ष ईश्वरासारखा बोवाजी भेटला त्याची देखील लबाडी बाहेर काढणार तूं! देव तरी खरा आहे का? तूं इंग्रजी शिकलेला. तुला देव नाहीं, धर्म नाहीं, शास्त्र नाहीं, सगळंच

खोटं. हें असलं बोलणं माझ्यापाशीं नाहीं चालावयाचं, आजपर्यंत इतके लोक शास्त्रं खरीं मानीत आले ते सगळे वेडेच वाटतें? आणि आतां आले हे विलायती शहाणे! मी तुला साफ सांगतें, तुला दुसरं लग्न केलंच पाहिजे. नाहीं तर आपला विचार पहा.

**बाळा०**—विचार काय पहावयाचा आहे? मी कांहीं दुसरें लग्न करणार नाहीं. तुह्मी बायका अविचारी असतां. तुमच्या नादीं लागून त्या गरीब गाईचा गळा कापूं होय?

**लक्ष्मी०**—(रागानें) तिचा नको कापूं. माझाच काप! ह्मणजे झालंना तुझ्या मनाजोगं? माझं तूं नाहीं ऐकत तर मी आतांच जीव देतें! जगून तरी काय करावयाचं आहे? हेंच सुख पहावयाचं कीं नाहीं! असलीं पोरं असलीं निनसलीं सारखीं. (असं ह्मणून ताडकन् भुईवर डोकें आपटते, देवांनीं पोर नाहीं दिलं ह्मणून हें सुखाकरितां पोर घेतलं! झालं, फिटली ना हौस? रावसाहेब आतां नाहीं हो सहन होत! आह्मी अविचारी आणि हे विचारी उपजले! देवा पुरे झालं सुख! लग्नांत भोगलं, दिवाळसणांत भोगलं आणि आतां तर कळस झाला! इतकं ह्या कारट्याच्या करितां मी सोसलं, आणि त्याचीं हीं फळं काय? मुलगा मांडीवर घेतला तेव्हां माझ्या थोबाडींत मारण्याला नव्हतं जवळ कोणी! (असें ह्मणून फडाफडा आपल्या थोबाडींत मारून घेते आणि नकोरे देवा! नको हा संसार! असें ह्मणून भुईवर पडते व रडूं लागते.)

**बाळा०**—(तिच्या जवळ येऊन) आई हें काय?

**बाबासा०**—(पट्कन् पुढें होऊन) वाहवा! हें काय? ऊठ. वेळ आली तर पुढें होऊन हवें तर थोडेंसें बोल असें

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

मीं सांगितलें तरी तूं हा प्रकार केलास ! अविचार सगळा ! कोणतेंही काम विचारानें केलें पाहिजे. चल ऊठ. घरांत चल. ( असें ह्मणून तिचा हात धरून आंतल्या बाजूस नेतात. )

**रावसाहेब**—बाळासाहेब ! हें चांगलें नाहीं झालें. पुरता विचार करा. ह्या तुमच्या आचरणापासून मातोश्रीला, बाबासाहेबांला, आणि परंपरेनें तुह्मालाही दुःख होणार आहे.

**बाळासा०**—असले विनाकारण एखाद्यावर प्रसंग येऊं लागले तर काय करावयाचें ? नशीब आपलें ! माझा हेतु कांहीं वडिलांना दुःख देण्याचा नाहीं.

**रावसाहेब**—जातों मी आतां ! बाबासाहेबांना वहिनीबाईंचं शांतवन करून बाहेर येण्याला बराच वेळ लागेल. मला जेऊन गांवास जावयाचें आहे.

( रावसाहेब जातात. )

**बाळासाहेब**—( मनाशींच ) यांत मी आईला काय गैर बोललों होतों ? कांहीं अपशब्द तरी माझ्या तोंडांतून निघाला काय ? शिकस्त आहे बायकांची ! काय त्रागा केलान पहा. एखाद्याला वाटेल कीं, मुलगा काय बोलला असेल नि काय नाहीं ! पण बरें ! रावसाहेब जवळ होते ह्मणून ठीक झालें ! बाबांनींही बहुधा सगळें बोलणें ऐकलें असेल. मला तर वाटत नाहीं कीं मीं यांत कांहीं गैर केलें ! मी करितों हें परमेश्वराच्या वरीं खास रुजू आहे. परमेश्वर वडिलांना चांगली बुद्धि देवो आणि याचा परिणाम चांगला होवो. जावें आतां आई साहेबांकडेच शांतिः शांतिः करायला ! ( जातो. )

---

## प्रवेश सातवा.

**स्थळ.** इंद्रचा राजरस्ता.

**पात्रें.** गंगाधर आणि रावसाहेब.

**रावसाहेब**—कायरे गंगाधर! इकडे कोणीकडे चाललास!

**गंगाधर**—कोण रावसाहेब! तुह्मी कधीं आलां? मी इकडे पानें आणावयाला जात होतों.

**रावसाहेब**—मी हा येतों आहें हात्र. तो ओझेवाला. (ओझेवाल्यास) अरे ए, थांब अंमळ, उभा रहा. (गंगाधराकडे वळून) बाबासाहेब आहेत का घरीं? कसें काय, मी गेल्यावर पुढें कसें काय झालें? आज दहा बारा दिवसांत मला खबर कळली नाहीं तिकडली!

**गंगाधर**—तिकडली खबर काय? काल सून तर माहेरीं गेलीच. सुटली बिचारी! त्या दिवसापासून बाईसाहेबांचें तिच्यापाशीं भाषण नाहीं. मुलाशीं देखील आठ दिवस अबोला होता. पण बाळासाहेब मोठे हुषार! त्यांनीं कांहीं सहज बोलतां बोलतां एखादी नकलच करावी आणि आईला हंसवावें. तिच्यापुढेंच जाऊन बसावें. तिच्या अंथरुणावरच जाऊन निजावें, असें करून करून आतांशीं बाईसाहेब कोठें थोडें थोडें त्यांच्याशीं बोलूं लागल्या आहेत.

**रावसा॰**—तो पक्का हुषार आहे! अरे पण सुनेला ह्यांनीं कोणाबरोबर माहेरीं पाठविली? आणि माहेरीं पाठविण्याला निमित्त काय योजलं?

**गंगाधर**—तें कांहीं विचारूं नका! बाईसाहेबांचा एकसारखा आग्रह चालला होता, "हिला माहेरीं पाठवा,

ही माझ्या दृष्टीस नको." रोज दोघांची ह्याजवरून तापातापी व्हावयाची ! पण देवाला करणं ! तर तिच्या भावाची मुंजच एकाएकीं निघाली आणि माहेरचं बोलावणं आलं. मग काय विचारतां, परवां रात्रीं मुराळी आला आणि काल सकाळींच तिची रवानगी केली. पण रावसाहेब, पोरगी गरीब हो ! इतका सासूबाईंनीं गहजब केला पण तिनें मिळून तोंडांतून एक अवक्षर देखील काढलं नाहीं! आमच्या सारख्यांनीं कोणी गोष्ट काढली तर तिनें आपलं डोळ्यांला पाणी आणावं आणि "नशीब माझं !" इतकं मात्र म्हणावं. जाते वेळेस मला फार वाईट वाटलं. शेजारच्या कुशीनें आणि बजीनें तिला गाडींत बसते वेळेस विचारलं, "वहिनी, आतां कधीं येशीलग ?" तेव्हां मात्र रडत रडत सगळ्यांच्या समक्ष उत्तर दिलं कीं "मी कशाची आतां येतें ! आतां तुम्हाला दुसरी वहिनी येईल हो !" तेव्हां खरोखर सांगतों, रावसाहेब ! माझ्या पोटांत तर तटतटां तुटूं लागलं. जातों आतां ! उशीर झाला. मला अजून देवदर्शनाला जायचें आहे, जातों.

**राव०**—बरें जा. बाबासाहेबांना मी आलों आहें म्हणून कळव. ( जातो. )

---

# अंक तिसरा.

## प्रवेश पहिला.

**स्थळ.** ठाणें. दप्तरदारांच्या वाड्यांतील एक खोली.

**पात्रें.** सत्यभामाबाई ( आई ) अन्नपूर्णा ( चिंगी. )

**सत्यभामाबाई**—चिंगे, आतांशीं तुला होतं आहे

तरी काय ? ( पाठीवरून हात फिरवून ) तूं अशी वाळलेली कां दिसतेस ? तुझें जेवण अगदीं तुटलं कशानं ? ह्या मुंजीच्या गडबडींत तुझी किती गडबड असावयाची, पण तूं भिक्षावळीला देखील मिरवायला निघाली नाहींस. बस अशी, अगदीं जवळ बस ( हनुवटीला हात लावून ) सांग बेटा, काय होतं तुला तें ? ( मुका घेते. )

( चिंगी गोरमोरं तोंड करून डोळे पुसूं लागते. )

अग ! बोलत कां नाहींस ? बोलल्यावांचून कसं बरं समजेल ? तुला काय होतं आहे हें समजल्यावांचून त्याचं निराकरण तरी कसं करतां येईल ? वैद्यबोवांना बोलावून आणूं का ?

**चिंगी**—आई, काय सांगूं ग ! तूं विचारण्याच्या अगोदरच मी तुला सांगावं असा मीं विचार केला होता. पण जेव्हां जेव्हां सांगावं असं मनांत आणतें तेव्हां तेव्हां मला कससंच होऊं लागतं, ऊर भरून येतो, डोळे भरून येतात आणि रडूं कोसळतं. एक शब्दही बोलण्याची हिंमत रहात नाहीं. सासऱ्यां मला असं झालं होतं कीं, मी केव्हां माहेरीं जाईन आणि केव्हां एकदां तुमच्या कानावर घालीन ! पण आई ती गोष्ट बोलण्याचं मनांत आणलं कीं आधीं रडूं कोसळतं ( रडूं लागते. )

**सत्यभामा०**—उगी, उगी ( असें ह्मणून तिचे डोळे पुसते ) बये, असें रडून काय बरें होतें ? सांगितल्यावांचून कसं बरं कळेल ? तुला झालं तरी काय ? तुला सासू जाच करिते का ? किंवा मामंजी बोलतात ? आहे तरी काय ? सांग बेटा सांग.

**चिंगी**—आई, माझ्यावर जो प्रसंग आला आहे तसा प्र-

संग वैऱ्यावर देखील येऊं नये. आई, तो प्रसंग माझ्याच्या- नें तोंडानें बोलवणारच नाहीं असें जेव्हां खास वाटलें तेव्हां मीं त्या हकीकतीचें एक पत्र लिहून तयार केलें आणि तें तुझ्याजवळ द्यावें असा विचार केला. हें घे तें पत्र आणि पहा. ( पत्र तिच्याजवळ देते. )

**सत्यभामा**—( पत्र वाचून ) काय बाई एकेक चमत्का- र आहे ! सामुद्रिक लक्षणांवरून तुझा त्याग करणार आणि मुलाचं दुसरं लगीन करणार ? असं कधीं कोठें ऐ- कलं देखील नाहीं. चिंगे, एवढा प्रसंग तुझ्यावर आला आणि तुझ्याच्यानें आह्माला कळवल्यावांचून रहावलं तरी कसं ? केव्हांच पत्र लिहून कळवायचं. तुला कांहीं लि- हितां येत नाहीं असं नाहींना ? आह्मी तेथें ताबडतोब निघून आलों असतों.

**चिंगी**—काय लिहूं तुम्हांस पत्र ! क्षणांत एक विचार मनांत येई, क्षणांत तो जाऊन दुसराच विचार येई. "वैरी चिंतीत नाहीं असं मन चिंतितं" ह्या ह्मणीचा मला तेव्हां अनुभव आला ! आई, ज्या दिवशीं यांची बोलाचाली झाली आणि सासूबाईनीं आपल्या थोबाडींत फडाफडा मारून घेतल्या आणि ताडकन् भुईवर डोकं आपटलं त्या दिव- शीं मला असं झालं कीं, जावं पटकन् आणि एखाद्या वि- हिरींत उडी घ्यावी. कारण इतकं सगळं माझ्यामुळें होत आहे. मीच मेलें ह्मणजे सगळ्यांना सुख होईल. असं वा- टलं ! पण आई मन वेडं ! ह्यांनीं माझ्याकरितां आग्रह धरिला आणि दुसरं लग्न करणार नाहीं ह्मणून साफ सां- गितलं, त्यामुळें मनानें उलट खाल्ली आणि जीव देण्याचा विचार राहिला. पण आई, जीव दिला असता तर सुटलें

असतें एकदांची ! आई, त्या दिवसापासून पाझ्या हालांस आरंभ झालाग. ती सयंपाकीण बाई बिचारी गरीब ! तिचं देव बरं करो ! तिनें मला चोरून मधले वेळचं खायला द्यावं. आई, तीन दिवस ती बाहेरची बसली होती. त्या वेळेस माझी वेणी देखील मी आपल्या हातानें घातली. आई, काय सांगूं ग, उगीच तुला मात्र अधिक दुःख होईल. आई, इतके माझे हाल सासुबाईच्यानें खचित करवले नसते. त्या मोठ्या दयाळू आहेत पण त्या दुष्ट चांडाळ बोवाजीनें त्यांच्या मनांत जी भीती भरवून दिली आहे त्याला काय उपाय? आतां ह्यांच्या मनांतलं निघून जाणं घडणार नाहीं. हेंच खचीत. नशीब माझं ! (असें ह्मणून रडूं लागते.)

**सत्यभामा**०—(तिचे डोळे पुसून ह्मणते) उगी रडून काय होतें ? हे दैवाचे खेळ आहेत. असेच दिवस राहतील असं नाहीं कांहीं ! देव करील तर काय होणार नाहीं ? जावयी शहाणे आहेत. त्यांचा आग्रह ते शेवटास नेतील. आणि तुम्ही सुखानें नांदाल. असं रडून काय होणार आहे ? आणखी दुःखमात्र अधीक होईल.

**चिंगी**—आई, दुःख मेलं माझ्या कपाळाला लागलेंच आहे. आतां कशाला सुखाची आशा करावी ? मी जीव दिला असता ह्मणजे एकदांच तुला दुःख झालें असतें आणि आतां माझ्यामुळें तुह्माला पदोपदीं दुःख सोसावं लागणार आहे. मी खोट्या नशिबाचीच उपजलें ! माझ्यामुळें तुला बाबांला आणि सासुसासऱ्यांलाही दुःखच होणार आहे, पण त्यांच्या तरी जिवाला सुख असावयाचं होतं ! तेंही नाहीं ! जेवण कमी झालं आहे. झोंप देखील येत नाहीं.

नुसतं अभ्यासाच्या खोलींत जाऊन मात्र बसावयाचं, पण बूक कांहीं हातांत नसतं. अगदीं स्तब्ध असावयाचं! आमच्या घरीं पूर्वी आठ आठ दहा दहा तास अभ्यास होत असे, पण आतां तें सगळं राहिलं. मी इकडे यायच्या अगोदर पांच चार दिवसच सासूबाई त्यांच्याशीं थोडं थोडं बोलूं लागल्या आहेत. पण बोलणं हें! कुचकट! एखाद्याच्या उराला भोंकें पडावयाचीं ऐकून! बळेंच लाडानें हे पुढें जाऊन बसूं लागले ह्मणजे ह्मणायचं "जा, आपल्या बाइलेला घेऊन बस जा, मी कशाला तुला हवी? आईबापांला लाथा माराव्या आणि बाईलेला डोक्यावर घेऊन नाचावं" आतांचीं पोरें अशीं नि तशीं! एक नि दोन! त्या बोलण्याला मग कांहीं मेळच नाहीं. आई, इतकं सारं माझ्यामुळेंना त्यांना सोसावं लागतं आहे? आई, असलं बोलणं माझ्या समक्ष झालं ह्मणजे त्यांना काय वाटत असेल? पण काय सांगूं स्वभाव! आपलं सगळं बोलणं मुकाट्यानें ऐकून घेणं होई. एक शब्द देखील पुढें बोलायचा होत नसे, फारच झालं तर आपल्या खोलींत जाऊन बसणं होतं! एक दोनदां तर मी खोलींत एकटं असतांना डोळ्यांला पाणी आलेलें पाहिलं आहे. आई, त्या वेळेस माझ्या मनाची स्थिति काय होत होती तें मला नाहींग सांगतां येत. पोटांत तटतटा तुटूं लागे आणि मग मी एकीकडे जाऊन रडत बसें. आई, त्याची आठवण झाली ह्मणजे रडूं येतें. ( असें ह्मणून रडूं लागते. )

**सत्यभामा०**—पुरे आतां, उगी रहा बेटा! किती रडशील? तुझें हें रडणें पाहून माझी काय दशा होत असे-

ल. याचा कांहीं विचार कर. पुष्कळ रडलं ह्मणून कांहीं दुःख का कमी होणार आहे ?

**चिंगी**—आई, तें मला सगळं समजतं. पण नाहीं ! मला आतां माझं रडूं आवरतच नाहीं. आई, मुंजीमध्यें मी किती आवरलं ? मी तुमच्या कोणाच्या देखील लक्षांत येऊं दिलें नाहीं. आपलं वाईट वाटूं लागलं ह्मणजे मागल्या माडीवर जाऊन तिकडे काय पाहिजे तें करावं आणि डोळेबिळे पुसून मग खालीं यावं. पण आई, आतां नाहींग रहावत ! आई ! मला तेथें रडायची देखील चोरी असेग! मी रडतांना सासूबाईंच्या दृष्टीस पडलें ह्मणजे झालें त्यांचें तोंड सुरूं ! "रडायला काय झालें ? कांहीं कोणी गळा कापायला नाहीं येऊन उभं राहिलं ! अवलक्षणी जन्मास यायचं, आपण रडायचं आणि दुसऱ्याला रडवायचं! यापेक्षां उंदीरघुशीचा जन्म बरा !" इत्यादि बोलणीं निघायचीं ! काय एक नि दोन ! त्या बोलण्याला ताळ ना तंत्र ! पण आई, तें बोलणं नाहीं मी तुला सांगत. आणि मला सांगतांही नाहीं यायचं. मी इतकंच सांगतें कीं, असं कांहीं बोलणं झालं ह्मणजे मला अधीकच हुंदका येई आणि तो मी यांच्या या बोलण्याच्या भीतीनें दाबून धरीत असें. आई, तेथें माझ्या मनांतलं ओकायला देखील कोणी नव्हतें, आज तुझ्या जवळ तें सगळं ओकलें. असंच एकदां मोकळेपणीं रडलें ह्मणजे तरी माझं कांहीं समाधान होईल. आई, सासुबाईंच्या देखत मीं किती वेळां रडूं आवरलं ! पण आई, आतां नाहींच आवरत याला काय करूं ? देवा काय माझा भोग हा ! ( असें ह्मणून रडूं लागते व भुईवर पडते. )

**सत्यभामा**–( पोटाशीं धरून ) तूं अशी किती रड-णार तरी? हें पहा. ह्या रडण्यानें आपली प्रकृति मात्र बिघडून घेशील. उगीच भलतं भलतं मनांत आणून अशी दुःखी होऊं नकोस. ही गोष्ट कांहीं मोठी कठीण आहे असें नाहीं. तुझी सासू देखील इतकी दुराग्रही नाहीं. एखादी असती तर लग्नांतल्या गोष्टीवरूनच दिवाळस-णाला आली नसती. पुढें दिवाळसणांतही त्या ठकूआ-त्यानें तो फार्स केला, पण तिनें तेंही मनांत वागविलें नाहीं व आह्माला इंदुरास नेऊन आमचं आदरातिथ्य केलं, तेव्हां तूं कांहीं काळजी करूं नको. आतां घरीं आले ह्मणजे मी त्यांच्या कानावर घालतें. ते व्याह्यांना पत्र पाठवितील, जरूर वाटली तर समक्ष जातील. चार गोष्टी सांगतील आणि तुझ्या सासऱ्याचं मन वळवितील. तूं काळजी कशाला करतेस? अगदीं स्वस्थ ऐस. बाय-कांचं एक निराळं पण पुरुषांचं कांहीं तसं नाहींना? त्यांना चारचौघांत बसावं लागतं, त्यांना चारचौघांची भीड नाहीं का पडणार? वेडी कुठली! असं रडावं काय? उगी रहा. तितकी वेळच आली तर भावोजी देखील मुजुमदार साहेबांना घेऊन जातील. मग तर झालंना? आणखी जावयी कांहीं आतां लहान नाहींत! चांगले शिकलेले, विद्वान् आहेत. सहसा असा गैरप्रकार त्यां-च्या हातून घडणार नाहीं. तूं अगदीं स्वस्थ ऐस. तिळ-मात्र काळजी करूं नको. देव करील तर सगळं चांगलं होईल. पुस, डोळे पुस. आणि पुन्हां डोळ्यांना पाणी आणूं नको. ( असें ह्मणून तिचे डोळे पुसते व ह्मणते ) जा खेळ जा. ( जातात. )

## प्रवेश दुसरा.

**स्थळ.** इंदूर येथील बाळासाहेबांची अभ्यासाची खोली.

**पात्रें.** बाळासाहेब व लक्ष्मीबाई.

**बाळासाहेब**—( आपल्याशींच ) रजेचे दिवस हे किती मौजेनें जावे? पण जातां जात नाहींत! कॉलेज केव्हां उघडेल असें झालें आहे. यंदां परस्पर कोठें फिरायला गेलों असतों तरी बरें झालें असतें. आपले आनंदानें दिवस गेले असते! येथें येऊन व्यर्थ दुःखांत मात्र पडलों! अभ्यास करावा तर तिकडेही लक्ष लागत नाहीं. करावें तरी काय? पण हेंही एकेपरी बरेंच झालें! आपण येथें असतांना हा योग आला हें चांगलें झालें! ईश्वराचा आपल्यावर अनुग्रहच समजावयाचा! आपल्या पश्चात् हा योग आला असता तर कदाचित् तिचे हाल जास्त झाले असते, व आपला कल वडिलांना लौकर कळला नसता. त्या दिवशीं आई मध्यें आली आणि जो भापणाचा प्रकार झाला त्या वेळेस तिनें जें तांडव केलें तें आपल्या फायद्यांचेंच झालें समजावयाचें! तेव्हांपासून त्या बाबतींत ( लग्नाची ) बाबांनीं गोष्ट काढली नाहीं. यंदाचे तर लग्नाचे दिवस गेले! आतां पुढें अस्तांत लग्नाची गोष्ट बोलावयालाच नको. पुढचें पुढें पाहूं. बाबांबरोबर आज आठ दिवस बाहेरगांवीं फिरावयाला गेलों होतों. तेव्हांही त्यांनीं कांहीं गोष्ट काढली नाहीं. असें कां बरें? का हें प्रकरण इतक्यानेंच मावळलें समजावयाचें? पण छे! मावळावयाचें नाहीं! बाबा कदाचित् मी कॉलेजांत जावयाला निघालों ह्मणजे गोष्ट काढतील!

( इतक्यांत लक्ष्मीबाई हातांत पत्रें घेऊन येते ).

**लक्ष्मी०**—बाळा, हीं तुझीं तीन पत्रें आलीं आहेत. काल तुह्मी आल्याबरोबरच देणार होतें, ती मेलें विसरलें! सकाळपासून शोधीत होतें तीं आतां सांपडलीं. हीं घे. ( पत्रें हातांत देते. )

**बाळासाहेब**—( पत्रें हातांत घेऊन मनाशीं ह्मणतो ) अरे ! हें माझ्या सासऱ्याचें पत्र आणि हें दुसरेंही त्यांचेंच ! तिसरें एक्या स्नेह्याचें आहे. आह्मी आल्याबरोबर पत्रें द्यावयाचीं ती ही विसरली ! काय ह्या आईला ह्मणावें ? ( पत्रें फोडीत फोडीत मोठ्यानें ) आई, बायकांना पत्रांचें महत्त्व कळत नाहीं. पत्रें नीट जपून ठेवीत जावीं. व जेव्हांच्या तेव्हांच ज्याचीं त्याला द्यावीं.

**लक्ष्मी०**—चुकलें बाबा ! बाळा ! खरोखर सांगतें कीं, तुह्मी इंग्रजी शिकलेले जेवढे तेवढ्यांना भीड मर्यादा, कांहीं नाहीं ! अरे, पत्रें रस्त्यावर कारे टाकलीं होतीं ? आणि आजचीं उद्यां दिलीं ह्मणून काय झालें ? कांहीं त्यांतला मजकूर नाहीं पळून जात ? टपालांतून येण्यास नाहीं का एखादे वेळेस उशीर होत ? आणि तुह्माला यायलाच आणखी एक दोन दिवस लागले असते ह्मणजे ? कांहीं तरी बोलतांना विचार करावा ! त्यांचीं तर सरकारी कामाचीं सात आठ पत्रें आतांच नेऊन दिलीं पण एक अक्षर देखील नाहीं बोलले ! आणि हीं असतील मेलीं गोम्याचीं नाहीं तर सोम्याचीं ! आतां बोलतो आहेकां पहा. आधीं बोलावं आणि मग बोलणं आंगास आलं ह्मणजे चिप बसावं !

**बाळा०**—( पत्रें वाचतां वाचतां मनाशीं ) काय बो-

लावं आतां इच्याशीं ? ( उघडपणें ) तूं ह्मणतेस तसें होतें खरें एखादे दिवशीं ! जा आतां तूं. मी अंमळ वाचीत बसतों.

**लक्ष्मी०**—नाहीं. मी जातें. पण आपली तुला शिकवणीची गोष्ट सांगितली. कांहीं विचार करून बोलत जावं, पटकन् एखादा जाब करूं नये. ( जाते. )

**बाळा०**--( मनाशीं ) शिकस्त आहे हिच्या अकलेची आणि विचाराची ! ( सासुरवाडीचीं दोन्हीं पत्रें वाचून ) आजपर्यंत प्रत्यक्ष सासऱ्याचें पत्र मला नव्हतें, कठीण आहे पोटच्या पोराची माया ! किती लांबलचक पत्रें लिहिलीं आहेत हीं ? किती चिंतेंत पडले आहेत ? पण हें बरें झालें कीं स्वतः नाहीं आले ते ! ते स्वतः आमच्या मागें आले असते, ह्मणजे एक तर आपली भेट न झाल्यामुळें त्यांना आपल्याकडे खेडेगांवें हिंडत यावें लागलें असतें, दुसरें आईचा काय नेम सांगावा ? कदाचित् कांहीं कमजास्त बोलली असती आणि विनाकारण त्यांस अधिक दुःख मात्र झालें असतें. पहिल्या पत्राचा जबाब न गेल्यामुळें पत्रोत्तराची एकसारखी वाट पहात असतील व तऱ्हेतऱ्हेच्या तरंगांमुळें त्यांचें मन खचित गोंधळून गेलें असेल. आपण बाबांबरोबर नसतों गेलों तर बरें झालें असतें ! आतां उत्तर लिहून पोष्टांत टाकलें पाहिजे ह्मणजे आजच्या आज रवाना होईल. ( पत्र लिहून शिपायाजवळ पोष्टांत टाकण्याला देतो. )

---

## प्रवेश तिसरा.

**स्थळ.** ठाणें, दप्तरदारांच्या घरांतील एक खोली.

**पात्रें.** अन्नपूर्णा (चिंगी). सत्यभामाबाई व अण्णासा०

**सत्यभामा०**—मी पूर्वींच सांगितलं कीं, समक्ष जावं, पण येथें कांहीं बायकांचें चालायचें आहे काय? दुसऱ्या पत्राच्या जबाबाची देखील वेळ टळली! ह्मटलं ह्मणजे कालच जबाब यायचा! बिचारी गरीब पोरगी ह्मणून कांहीं बोलून दाखवीत नाहीं. पण ती अंतःकरणांत अगदीं खिन्न होऊन गेली आहे. तिची टपालचा शिपायी येण्याच्या वेळेवर स्थिति पहावी. एक सारख्या आंत बाहेर खेंपा चाललेल्या असतात. एकदां पलीकडच्या वरीं शिपाई गेला, ह्मणजे आपली मुकाट्यानें खोलींत जाऊन बसते.

**अण्णासाहेब.**—असें होऊं नये त्यांच्याकडून! मग कोठें परगांवीं गेले आहेत किंवा काय तें नकळे. काय असेल तें असो! आज जर पत्राचा जबाब आला नाहीं तर उद्यां निघतोंच तिकडे जावयाला. हाच बेत!

(इतक्यांत अन्नपूर्णा (चिंगी) धांवत धांवत येते.)

**चिंगी.**—आई! आई! हें पत्र आलं! (आंत अण्णासाहेब बसले आहेत हें पाहून लाजते व त्यांच्यापुढें पत्र टाकून जाऊं लागते.)

**अण्णा०**—बस बेटा बस. हें तुझ्या घरच्यांचेंच पत्र आहे हो.

(सत्यभामाबाई तिला आपलेजवळ बसविते).

**सत्यभामा०**—देव करो आणि त्यांत चांगला मजकूर असो. मी सव्वा रुपयाची खडी साखर वांटीन.

अण्णासाहेब.–( पत्र वाचतात. )

श्री.

इंदूर तारीख २६ मे.

" शिरसाष्टांग नमस्कार विज्ञापना विशेष. आपलें मजला हें पहिलेंच पत्र आणि तें असें दुःखपूरित यावें हें माझें दुर्भाग्य होय. ईश्वरेच्छेपुढें इलाज नाहीं. अस्तु. ती० बाबासाहेबांबरोबर मी हद्दींत फिरावयास गेलों होतों व मागें पत्रें आलीं त्यामुळें उत्तरास विलंब लागला. पत्रें आज माझ्या हातीं आलीं व टपालची वेळ आहे असें पाहून घाईघाईनेंच आपणांस उत्तर लिहीत आहें. आपण येथें आलां नाहीं हें फार उत्तम केलें. जितका मजकूर आपणास कळला आहे त्याहून अधिकोत्तर कांहीं नाहीं. ती० मातोश्रीचें व आमचें भाषण वगैरे होतें. राग बराच निवळला आहे. ती० बाबासाहेब यांनीं अजून मजपाशीं समक्ष गोष्ट काढली नाहीं. त्यांना माझा कल कळलाच आहे. बहुधा ते दुराग्रह धरणार नाहींत, पर्यायापर्यायानें सामुद्रिकावरची त्यांची भक्ति उडविण्याचा मी क्रम चालविला आहे. सामुद्रिकशास्त्रांत ज्यांचीं लक्षणें वाईट आहेत ते चांगले सुखांत आहेत, अशीं शंभर ठळक ठळक उदाहरणें मी त्यांस दाखविण्याकरितां जमविलीं आहेत. आपण अगदीं काळजी करूं नये. हिला टाकून दुसऱ्या लग्नाविषयीं विचार माझ्या मनांत देखील येणार नाहीं. हा आपणास पक्का भरंवसा असूं द्यावा. रजा खपतांच सुमारें आठ जूनला मी पु-

ण्यास कॉलेजांत जाईन. आपली इच्छा असल्यास माझी भेट तेथें घ्यावी. घरांत सर्वांचें शांतवन करावें व निप्काळजी असण्याविषयीं सांगावें. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना."

आपला,

बाळा.

**अण्णा.**—चिंगे, झालीस ना निप्काळजी आतां तूं ?

**चिंगी.**—मला नाहीं ठाऊक.

**सत्यभामा॰**—आतां तर लग्नाचे दिवस नाहींतच्च ह्मणा. पण एकदां ते कॉलेजांत आले ह्मणजे पुण्यास जाऊन जांवयीबोवांची भेट घ्यावीच; ह्मणजे सगळी हकीकत कळेल.

**अण्णा.**—तसं करूं ग ! पण सध्यां तर निप्काळजी झालाना जीव ?

**सत्य॰**—होय. ( असें ह्मणून जाते. ) ( सर्व जातात. )

---

## प्रवेश चवथा.

**स्थळ.** पुणें येथील कॉलेजांतील विद्यार्थ्यांची खोली.

**पात्रें.** बाळासाहेब व मित्रचंद्र.

**मित्रचंद्र.**—आजच्या टिफिनीचा बेत फार छानदार झाला. आतां एकदां तुमच्याकडून पास झाल्याबद्दल टिफिन घेतली पाहिजे.

**बाळासाहेब.**—तुमचें ठीक आहे. आतां हैदराबादेस गेल्याबरोबर बापानें नोकरीची तजवीज लावून ठेविली असेल. तेव्हां तुह्माला टिफिनी सुचतात, हें ठीकच आहे पण मला तुमच्या टिफिनींत जेवायला येणें देखील सुचत नाहीं. इतका मी दुःखी आहें.

**मित्रचंद्र.**—कां, असें कां ह्मणतां? आमच्या बापानें नोकरीची तजवीज लावून ठेविली असेल आणि तुमचे का स्वस्थ बसले असतील? तुमचा तर जाडा वशिला आहे. आणि तुह्माला नोकरी हवी कशाला? होळकरशाईत तुमचे तीर्थरूप बरेच दिवस आहेत. पावडेओढ लाविली असेल!

**बाळासाहेब.**—आपल्यावरून जग ओळखूं नका. मोगलाईत आणि होळकरशाईत पुष्कळ अंतर आहे. तुमच्या तीर्थरूपांना जसे लाट सांपडत असतील, तसेच सगळ्यांना सांपडत असतील असें मनांत आणणें ही मात्र चुकी होईल. त्यांत आमच्या बाबांचा अगदीं नेम आहे कीं पगाराशिवाय एक्या दिडकीला देखील शिवायचें नाहीं. कोणी भेटी दाखल कांहीं वस्तु पाठविल्या तरी त्या परत करितात.

**मित्रचंद्र.**—ह्मणून काय झालें? कांहीं आजच तुमच्या गळ्यांत संसार नाहीं पडला? त्या गोविंदरावानें देखील टिफिनीकरितां मंडळीजवळ दहा रुपये देऊन मग तो नोकरीवर गेला. त्याच्या इतकी प्रपंचाची काळजी तुह्माला नाहींना? खुशाल वर्ष दोन वर्षे बसले चैनींत! आपले खाताहेत विसावा! तें कांहीं चालायचें नाहीं. तुह्मी टिफिन दिलीच पाहिजे.

**बाळासाहेब.**—कसली चैन आणि कसला विसावा? मित्रा मी फार दुःखी आहें रे! मी खर्चाला भितों असें नाहीं, पण मला ह्या तुमच्या चैनीच्या गोष्टी, टिफिनी, कांहीं देखील गोड लागत नाहीं रे! अरे तं पहातोसना? आज दोन वर्षांत मी घरीं देखील गेलों नाहीं. ह्याचें खरें

कारण कांहीं तुह्माला ठाऊक आहे? मी तुमच्यांत बसतों, उठतों, हंसतों खेळतों पण माझें मन काळजीनें अगदीं दग्ध होऊन जाण्याची वेळ आली आहे! कांहीं उपाय सुचत नाहीं. खचित मी एखाद्या गाडीवानासारखा निर्बुद्ध उपजलों असतों, तर फार चांगलें झालें असतें. मजपासून वडिलांना दुःख तरी नसतें झालें. ही माझी विद्वत्ता आणि विचारशक्ति हींच त्यांना दुःख देण्याला मूळ कारणभूत आहेत. ( डोळ्यांला पाणी आणितो. )

**मित्र०**—अरे! रडतोस काय? विद्वत्ता आणि विचारशक्ति वडिलांना दुःख देण्याला कारण ह्मणजे? ही जर तुझ्यांत नसावी असें त्यांस वाटलें असतें तर त्यांनीं तुला कॉलेजांतच ठेविलें नसतें. ह्या तुझ्या ह्मणण्याचा अर्थ तरी काय?

**बाळा०**—ह्या ह्मणण्याचा अर्थ फार खोल नाहीं. अगदीं उघड करून दाखवायलाच नको. ह्या विद्वत्तेच्या आणि विचारशक्तीच्या योगानेंच वडिलांची अवज्ञा करण्याचा प्रसंग मजवर येणार आहे. आणि अशी अवज्ञा माझ्या हातून न घडो, पण जर घडली तर त्यांना दुःखच होणार कीं नाहीं? ह्या दुःखाचें कारण माझी विद्वत्ता आणि विचारशक्ति हेंचना? मित्रा! मी मोठा हतभागी आहें? माझ्या हातून वडिलांना कसें सुख प्राप्त होईल कोण जाणे? ( रडूं लागतो ).

**मित्र०**—अरे! ज्या मुलाला विद्वत्ता आहे, विचारशक्ति आहे, जो सुशिक्षित आहे, त्याच्या हातून जर वडिलांना दुःख होणार तर का अविद्वान् व अविचारी ह्यांच्या हातून सुख मिळणार? हें काय बोलणें?

बाळा०—होय. होय. हेंच बोलणें खरें! ज्याला विचारशक्ति मुळींच नाहीं. तो वडिलांचें निमुटपणें ऐकेल आणि त्यापासून त्यांस सुख होईल. आणि आपल्यासारखे शिकलेले जे आहेत, ते त्यांचें ऐकणार नाहींत! त्यांना ब्रह्मज्ञानाच्या गोष्टी सांगूं लागतील! वडिलांचा इच्छाभंग होईल! व कदाचित् हेंच त्यांच्या मोठ्या दुःखाचें कारण होऊन बसेल. ऐक आतां तुला उघड करून सांगतों. मजवरच तो प्रसंग येऊं पहातो आहे. आमच्या बाबांच्या मनांतून काय आहे कीं, मीं दुसरें लग्न करावें आणि पहिल्या बायकोचा त्याग करावा. आणि कारण ह्मणशील तर तिचें कांहीं सामुद्रिक लक्षण वाईट आहे! आज दोन वर्षे ती माहेरींच आहे! वडिलांना माझा कल कळलाच आहे, तथापि त्यांना अजून वाटतें आहे कीं, हा आज नाहीं उद्यां दुसरें लग्न करील. त्यांना अजून आशा आहे, परंतु वडिलांच्या आग्रहास्तव हिचा त्याग करणें मला प्रशस्त वाटत नाहीं. त्यांचें तर पत्र असें आलें आहे कीं, तुझी परीक्षा उतरली हें ऐकून आनंद झाला. आतां पुण्यास राहूं नकोस किंवा इकडे तिकडे फिरावयास जाऊं नकोस. लौकर निघून इकडे ये. आतां मी घरीं गेल्यावर ते मजभोंवतीं गर्दी करतील. हें एक झालें! दुसरी पंचाईत कशी आली आहे पहा. माझ्या सासऱ्याचें पत्र आलें आहे कीं, आमची भेट घेऊन मग तीर्थरूपांकडे जावें. ह्यांचें ह्मणणें आहे कीं, आईबापांची आज्ञा घेण्याची व सम्मती मिळवण्याची तुम्ही वाट पाहूं नका. त्यांच्याकडून तुह्मास मंजुरी मिळेल असें वाटत नाहीं. तुह्मी परस्परेंच हिचा अंगिकार करावा.

मामींच्या भेटीसही फार दिवस झाले आहेत व त्यांचाही भेटून जाण्याविषयीं फार आग्रह आहे. ह्या सर्व गोष्टी खऱ्या आहेत तरी पण वडिलांची आज्ञा घेतल्यावांचून इकडे जाणें मला प्रशस्त वाटत नाहीं. सबब प्रथमतः वडिलांकडे जाऊन नंतर सासुरवाडीस जाणार होतों. परंतु मला आतांच आपल्या गणपतरावानें सांगितलें कीं, आमचे सासरे स्वतःच मला नेण्याकरितां येथें आले आहेत. आतां कसें करावें ? ह्यांना मी कितीही अडचणी सांगितल्या तरी ते मला घेऊन गेल्यावांचून रहाणार नाहींत. याला काय तोड निघणार ? मला तर कांहीं तोड सुचत नाहीं. सासुरवाडीस ह्यांच्याबरोबर जावेंच लागेल. मग ह्यांची मंडळी मला गुलकाऊन घेईल, तेव्हां ह्यांच्याशीं वचनांत गुंतावें लागेल, तिकडे वडिलांनीं आपला हेका नाहीं सोडला ह्मणजे संसार गळ्यांत पडलाच ह्मणावयाचा ! आणि त्यांत अधिक हें कीं, आईबापांचा रोष मजवर होणार !

**मित्रचंद्र.**—अरे, बराच खोल आहेसरे! आजपर्यंत ही दुसऱ्या लग्नाची गोष्ट किंवा ह्या प्रकरणापैकीं एक अवक्षर देखील मजजवळ बोलला नाहींस ?

**बाळासाहेब**—काय बोलूं ! सुखाची गोष्ट असती ह्मणजे कळविली असती. ही कळवून दुःखच होणार कीं नाहीं.

**मित्रचंद्र**—वहावा ! हा खासा न्याय ! सुखाची कळवायची आणि दुःखाची नाहीं कळवायची ! मग मित्रत्व तें कसलें ? जा तूं कांहीं काळजी करूं नकोस. परमेश्वर करील तर तुझ्या मनाप्रमाणेंच सर्व यथास्थित घडेल. इतक्याउपर नच घडलें तर पत्र पाठीव. तूं आज दोन वर्षांत बाबासाहेबांकडे गेला नाहींस ह्याजवरून दुसरें लग्न

करावयाचें नाहीं ह्याजविषयीं तुझा दृढनिश्चय आहे हें त्यांस खास वाटलें असेल. आतां तूं सध्यां सासुरवाडीसच जाऊन मग बापाकडे जा. माझ्या विचारास असें येतें कीं, तूं जें करितो आहेस तें अगदीं योग्य आहे. परमेश्वर ह्यांत तुला यशच देईल. सर्व गोष्टी तुझ्या मनाप्रमाणें होतील व मगच आह्मी जंगी टिफिन घेऊं.

**बाळासाहेब.**—अहाहा ! असें घडलें तर मजसारखा सुखी कोण आहे ? मी एक सोडून दोन टिफिणी देईन. मी आतां उद्यां जाणार. पत्रव्यवहार चालू असूं दे. लोभांत अंतर पडूं देऊं नको ( नमस्कार करून जातो. )

**मित्रचंद्र.**—( मनाशीं ) काय बिचाऱ्यावर संकट आलें आहे हें ! आईबाप टाकावे तरी पंचाईत आणि बायको टाकावी तरी पंचाईतच ! असल्या वडील मनुष्यांशीं गांठ पडली ह्मणजे मोठा विद्वान् एम्. ए. आणि बी. ए. मुलगा असला तरी काय करणार ? यांच्या कपाळीं "इंग्रजी शिकलेले तेवढे निर्भीड ! सख्ख्या बापाचें ऐकावयाचे नाहींत, मग इतरांची गोष्ट कशाला ?" असे आरोप येणारच. ईश्वर करो आणि त्याजवर असा प्रसंग न येवो. ( असें बोलून जातो. )

---

## प्रवेश पांचवा.*

**स्थळ.** ठाणें. दप्तरदारांचा वाडा.

**पात्रें.** अन्नपूर्णा, सत्यभामाबाई, बाळासाहेब, गणोजी, शास्त्री व इतर बायका.

**सत्यभामाबाई**—कायग ? यमुने ! अग मिरवून आ-

---

* हा प्रवेश बायकांच्या पार्टीची कमताई असल्यास पाहिजे तर गाळावा. हा गाळला तरी नाटकांत विसंगति दिसणार नाहीं.

मराठी

त्याला किती वेळ झाला? तुह्मी करतां आहां तरी काय? तिची ओंटी नाहीं का भरायची तयारी झाली अजून?

**यमुना**—हो. ओंटीची तयारी अगोदरच करून ठेविली आहे. पण ती कोरं लुगडं नेसते आहे आणि मुनसफीणबाई आणि आवडूताई यायच्या आहेत.

**आवडूताई**—ही मी आलें! माझा नाहीं हो खोळंबा. तिची चुलतीच कोठं आहे ठिकाणावर?

**सत्यभामाबाई**—आतां मिरवायला होती बरोबर, आणि इतक्यांत कोणीकडे गेली? तिकडे खोलींत पहा. मुलाला पाजीत बिजीत असेल!

**चुलती**—मी आलं बरं! मी कुठं गेलें नाहीं! हं तिला बसवा मखरांत.

**गणोजी**—बाईसाहेब! जांवई आले! आपले इंदूरकर.

**एक बाई**—वहावा! वहावा! ही दुधांत साखर पडली. त्यांना ह्मणावं पाय धुवा आणि मखरांत या. थांबाग बायांनों अंमळ!

**बाळासाहेब**—चालूं द्या! तुमचें काय चाललें आहे तें! मी आतांच नुकता येतों आहें. अंगरखा पागोटें आंगांत आहे.

**एक बाई**—मग असेना! पागोटें घालूनच शेजारीं बसलं पाहिजे! कसे पण ऐन वेळेवर आलां! आतां का एकटीला मखरांत बसवून कोणी ओंटी भरील! दुपारीं आलां असतां तर पुन्हा नसतं कांहीं बसवलं कोणीं मखरांत!

**बाळासाहेब**—पण मी नव्हतों आलों तेव्हां कसें चाललें होतें! तसेंच चालूं द्या आतां, म्हणजे झालें.

**सत्यभामाबाई**—आतां नाहीं तसं चालायचं! देवानें अवचित अमृतसिद्धियोग आणला, आतां कोण तुह्माला सोडणार आहे?

**एक बाई**—चला, उठा. पाय धुवा! हं देग पाणी!

**बाळासाहेब**—शास्त्रीबोवा इतक्यांत आले हें बरें झालें! काय हो शास्त्रीबोवा, येथें पुरुषांचें काय कारण आहे?

**शास्त्रीबोवा**—अरे बोवा! येथें कारण बिरण कांहीं पहावयाचें नाहीं. हा शिष्टाचार आहे. बायकांची हौस असते. करावें झालें घटकाभर त्या सांगतील तसें! आमची तिसरी बायको! पण आह्माला देखील मखरांत बसावें लागलें होतें! हं उठाच आतां नि काय!

**एक बाई**—आतां ठीक झालं! अग पाणी द्या कोणी! पहातां आहां काय?

**दुसरी एक बाई**—पाणी केऽव्हांच नेऊन ठेवलं आहे. जांवई बोवांचाच खोळंबा! आणि पाहिजे तर तस्त आणून चिंगीपासूनच धुववतें!

**बाळा०**—नको नको बोवा! आणखी एकेक प्रकार वाढवूं नका!

(जांवई पाय धुवून मखरांत येऊन बसतात).

**सत्यभामा०**—चिंगे! चल येग बस शेजारीं! (चिंगी लाजत लाजत येऊन बसते.) सोमणीणबाई! तुह्मी ओंटी भरा.

**सोमणीणबाई.**—गंगाबाई तुह्मी भरा. (दुसऱ्या एका बाईकडे पाहून) तुह्मी भरा.

**सगळ्या बायका**—तुह्मीच भरा! तुह्मीच भरा!

**सोमणीणबाई**–आजी सासूबाई, ओंटी भरतें हो! माई, ओंटी भरतें हो!

**दोघी जणी**–भरतीच हो.

( सोमणीणबाई* ओंटी भरते. )

**सत्यभामाबाई**–हं चला न्हाणुली ह्मणा आणि आटपा लौकर. त्यांना फार वेळ बसवूं नका.

( बायका न्हाणुली ह्मणतात )

**न्हाणुली.**

" पंचमी बुधवारीं, पुष्य नक्षत्रावरी ॥
" लाजुनी रखुमाई, उभी परूसदारीं ॥
" देवकी नातु झाला, वसुदेव आनंदले ॥
" दोहों दारीं वाजंतरी, कालु कर्णे तुतारी ॥
" बाका मुर्दुगावरी, चौघडे वाजताती ॥
" हलके शिंगें आरब, मिळुनी सर्वेही आले ॥
" बाजा करूं लागले, रुखमाई न्हाण आलें ॥ १ ॥ धृ० ॥
" जिनगर बोलावूनी, गजकाड्या आणिल्या ॥
" रुप्याचे रोउनि खांब, नवे रत्नांकित केले ॥
" सोन्याच्या कोरिव जाळ्या, वरती हिरे जडिले ॥
" चांदवे किनखापाचे, लखलखाट आरशांचे ॥
" वरती कळस सोनियाचे ॥
" मिळूनी दीर भावे, मखर सिद्ध झालें ॥ २ ॥ रुख० ॥
" फुलांची करुनी शेज, वरती श्रीरंग नीजे ॥
" रखुमाई शृंगार साजे, विडा देतां ती लाजे ॥
" खिडक्यांतून पाहती नारी, दोघें बसलीं शेजारीं ॥
" रखुमाई न्हाण आलें ॥ ३ ॥

---

* कोठें कोठें पांच बायकांकडून ओंटी भरवितात.

**सत्यभामा**–चला आटपा आतां! अगदीं सोळाही कडवीं नको ह्मणायला कांहीं. एकदां नावं घेऊं द्या.

**एक बाई**–जांवईबोवा तुह्मी घ्या अगोदर!

**बाळासाहेब**–ऐका हो! मग कोणी ऐकलं नाहीं ह्मणाल! अ-न्न-पू-र्णा!

**दोघी जणी**–हं उखाणा घेऊन घेतलं पाहिजे! असं साधं नाहीं उपयोगी!

**बाळासाहेब**–पाहिलेंना! कांहीं तरी पुन्हां बोलणें काढलेंच! ऐका एकदां. समोर होता कोनाडा, त्यांत होती चांदीची झारी; आणि परसांत पेपरमिठाचें झाड लावलें, त्याला घूस लागली अन्नपूर्णा प्यारी (जातो).

(सर्व बायका हंसतात.)

**एक बाई**–चिंगे, पेपरमिठाचीं पानें बिनें खुडलींस का ग कधीं?

**दुसरी**–आतां चिंगे तूं घे नांव.

**तिसरी**–चांगला उखाणा घालून घे हो! ऐका ग बायांनों! चिंगी नांव घेते आहे.

**चिंगी** (अन्नपूर्णा)–बेलाचं पान शिवाला वाह्यलं; नि बाळासाहेबांच्या जिवासाठीं पनवेल गांव पाह्यलं. (मुका मारून दूर जाते.)

---

## प्रवेश साहावा.

**स्थळ.** ठाणें, दप्तरदारांच्या वाड्यांतील माडी.

**पात्रें.** बाळासाहेब, अन्नपूर्णा (चिंगी.)

(बाळासाहेब माडीवर तक्याशीं टेंकून बसले आहेत).

**चिंगी**०–(माडीवर येऊन डोकावून पहाते व मना-

शीं ) आतां कोणी दिवाणखान्यांत नाहीं. सगळीं माणसं बाहेर गेलीं आहेत. एकटंच बसणं झालं आहे. जावं आणि घट्ट पाय धरावे. मग काय होईल तें होवो. ( तसें करते. )

**बाळासाहेब.**—हं ! हं ! हें काय ? ऊठ, कोणी येईल ना ?

**चिंगी.**—कोणी नाहीं यायचं. मी जिन्याच्या दाराला कडी लावून घेतली आहे.

**बाळा०**—तरी पण उठशील तर खरी ! ( हातानें उठवितो. )

**चिंगी.**—( रडूं लागते ).

**बाळासाहेब.**—अग पण तूं रडतेस कां ? ( पदरानें डोळे पुसतो. )

**चिंगी**—माझ्या नशिबालाच रडणं लागलं आहे.

**बाळासा०**—उगी रहा, वेड्यासारखें रडावें काय ? अक्षयीं कांहीं नशिबीं रडणेंच का असतें ? कांहीं दिवस असे असतात, कांहीं दिवस तसे असतात. चाललेंच आहे. हे दिवस जाऊन दुसरे सुखाचे दिवस येतील. अक्षयीं असेच दिवस रहाणार नाहींत कांहीं. आजचा दिवस पहा देवानें कसा आणला तो ! मला कांहीं ठाऊक होतें कीं तुला ह्मणजे आज चौथा दिवस असेल, आजच गेलों ह्मणजे तूं भरवरांत दृष्टीस पडशील, सगळ्यांना आनंद होईल ! देव आणूं लागला ह्मणजे सगळे योग जमून येतात. आणि आनंदच आनंद होऊन जातो.

**चिंगी.**—( हंसून ) मी नाहीं पण आतां माहेरीं रहावयाची ! जिकडे आपण तिकडे मी. मला बरोबर घेऊन जायचं व्हावं.

वाळा०—आणिं प्रिये, सासूबाईंचा जाच सोसवेल का तुझ्याच्यानें ?

चिंगी—आपल्याला कां त्याची काळजी ? मी आपला सोशीन. पण येथें नाहीं रहाणार आतां.

वाळा०—मघाशीं मी आपला विचार मामासाहेबांला समजवून दिला आहे व त्याप्रमाणें त्यांनीं कबूलही केलें आहे. आतां सध्यां तूं येथेंच रहा. मी तेथें जातों, तुला ऋतुप्राप्ति झाल्याचें पत्र पुढें गेलेंच आहे. तिकडे त्यांचा विचार काय आहे तो पहातों. आईचा राग कितपत शांत झाला आहे तो पहातों आणि मग तुला नेण्याचा विचार करीन.

चिंगी.—तें कांहीं आतां घडावयाचें नाहीं. मी आपल्यावरोवर येणार ! आपण निघालां कीं चार पावलें मी आपल्या पुढेंच ! मग माझं कांहीं होवो. माझ्या बापानें मामंजींच्या मनाचा पक्का खुलासा काढला आहे. दोन वर्षांत आपण घरीं गेलांच नाहीं ह्मणून त्यांचा नाइलाज झाला ! नाहीं तर आजला कधींच त्यांनीं दुसरं लगीन उरकून घेतलं असतं !

वाळा०—अग पण मी आतां लहान नाहींना ? कीं रहा उभा ह्मटलें ह्मणजे उभा राहीन ? मीच लग्नाला उभा न राहिलों तर ते लग्न कसं लावणार ?

चिंगी.—तें कांहीं असो ! पण मला नेण्यांत तरी आपला कोणता तोटा ?

वाळा०—तोटा दुसरा कांहीं नाहीं. पण आईबापांच्या आज्ञेवांचून मी आजच तुला नेणें, हें अयोग्य आहे. ही अवज्ञा त्यांस सहन होणार नाहीं आणि व्यर्थ त्यांचीं

अंतःकरणें दुःखित मात्र होतील. मी दुसरें लग्न खास करीत नाहीं, याजविषयीं त्यांची खात्री झालीच असेल. पर्यायापर्यायानें मी आपले विचार त्यांच्या कानावर घातलेच आहेत. आतां बहुधा मी गेल्यावर तुला न्यायला येईल. तूं कांहीं काळजी करूं नको.

**चिंगी.**–आपण इतके अवज्ञेला भितां आणि त्यांच्या ह्मणण्याप्रमाणें दुसरं लगीन करीत नाहीं. ही नाहीं का अवज्ञा होत? ह्यानें त्यांच्या अंतःकरणाला दुःख नसेल का झालं? तें कांहीं नाहीं, मला बरोबर न्यावयाची नाहीं ह्मणून हीं सारीं निमित्यें आहेत. मी कांहीं आतां येथें राहणार नाहीं साफ सांगतें.

**वाळा०**–(मनाशीं) हिनें थोडेसें अडवलें खरें! (उघडपणें) तर कां तुला असें वाटतें कीं मी दुसरें लग्न करीन?

**चिंगी.**–आपल्या मनांतलं मी काय सांगावं? आणि कदाचित् आज आपल्या मनांत नसलं आणि तेथें गेल्यावर चार चौघांची भीड पडली तर त्याचा नेम कोणी सांगावा?

**वाळा०**–तूं बरावर आल्यावर नाहीं का तसें होणार? भिडेनें किंवा आणखी कोणत्याही प्रकारानें आह्मीच लग्न करण्याचें मनांत आणल्यावर तूं काय करणार?

**चिंगी.**–मी काय करणार दुसरें! मी आपल्याना सांगेन कीं, मला विहिरींत ढकलून द्या आणि मग खुशाल दुसरं लग्न करा. दुसरं काय आमच्या बायकांच्या स्वाधीन आहे? सासुबाईचं आणि आपलं बोलणं झालं तेव्हां किती वेळा माझ्या मनांत आलं कीं, एकदां एकांतीं

गांठावं आणि बोलावं आपल्यापाशीं. पण त्या वेळेस हिंमत होईना. शेवटीं इतके दिवसांचा हेतु परमेश्वरानें आज शेवटास नेला. आतां मनाचा निश्चय झाला आहे कीं, जेथें आपण तेथें मी ! पुष्कळ दिवस माहेरीं राहिलें. आतां कांहीं मी हे पाय सोडणार नाहीं ! इतकी माझी विनवणी मान्य करा. मी आग्रहच धरतें. मग यांत मला कोणी वेडी ह्मणो कीं शहाणी ह्मणो !

**वाळा०**—आह्मी वेडीच ह्मणतों. चांगलें सोईनें होण्यासारखें असून असें गैरसोईनें कां करावें? मी तिकडे जातों आणि तिकडून तुला न्यावयाला आलें ह्मणजे ये.

**चिंगी**—मग नाहींच ना माझं ऐकाचं? नशीब ! देवा, कशीरे मला अभागिणीला उपजवलीस? माझं पहिलंच मागणं ! कांहीं खर्च नाहीं वेच नाहीं ! आणि तें देखील इकडून मान्य होऊं नये ना ! आपल्याकडे काय त्याचें ! मीच अभागी ! मीच कोणी जन्मांतरींची वैरीण आपल्या पदरीं पडलें आहे. ( हुंदका येऊन रडूं लागते ).

**वाळा०**— ( तिचे डोळे पुसून ) नको उगीच भलतेंसलतें आपल्याला बोलून घेऊं. परमेश्वरदयेनें सर्व चांगलें होईल. मी तुझें चित्त जाणत नाहीं का? मी येथें तुला सुखामें का ठेविली आहे? माझें मन प्रिये! तुझ्याकडे कितीं आहे याचा कांहीं तरी विचार कर. आईला ज्या वेळेस मी उत्तर दिलें कीं, दुसरे लग्नाची गोष्ट मजजवळ काढूं नको, त्या वेळेस प्रिये, असा आग्रह धरा ह्मणून तूं सांगितलें होतेंस कां? किंवा दुसऱ्या कोणाच्या भिडेनें मी हा आग्रह धरला आहे? माझा मीच ना आग्रह धरला? प्रिये, हा कधींही टळावयाचा नाहीं; हें तूं पक्कें

ध्यानांत ठेव. मी दुसरें लग्न करीन ही शंका देखील मनांत आणूं नको. चारचौघांच्या भिडेची गोष्ट कशाला? पण शेकडों लोकांनीं जरी भिडा खर्चिल्या तरी ह्या गोष्टीस मी वळणार नाहीं. ही पक्की खात्री असूं दे. प्रिये! तुला काय सांगूं? ह्या गोष्टीविषयीं आज दोन वर्षांत जे माझ्या मनांत विचार आले आहेत, त्यांचें अनुमानही कोणाच्यानें करवणार नाहीं. वडिलांची गोष्ट तर राहिलीच; परंतु प्रिये! प्रत्यक्ष ईश्वर जर मजपुढें येऊन मला सांगेल कीं, तूं हिचा त्याग कर, तर मी त्याचेंही ऐकणार नाहीं. मी त्याच्यापाशीं देखील भांडेन कीं, यांत हिचा काय अपराध आहे. तूं जर हिचा अन्याय नसून शिक्षा करण्यास सांगतोस तर तूं ईश्वरच नाहींस. न्यायी ईश्वराला विनाकारण अबलेचा गळा कापणें कधीं आवडणार नाहीं. माझ्या बोलण्यावर विश्वास ठेव आणि स्वस्थ ऐस, व आतां बरोबर नेण्याचा आग्रह धरूं नको. आपल्याकडून बिघडूं देऊं नये. मी जाईन. वेळ आली तर बाबाशींही स्पष्ट बोलेन आणि इतक्या उप्परही त्यांनीं नच आग्रह सोडला तर तुझें ह्मणणें ऐकेन!

**चिंगी**—खचितना पण हें?

**बाळा**०—हो हो खचित!

**चिंगी**०—द्यावं तर मग वचन. ह्मणजे मी आपल्या इच्छेच्या आड नाहीं येत. ( असें बोलून हात पुढें करिते. )

**बाळा**०—हें घे वचन! ( हातावर हात मारतो. )

**चिंगी**—पहा बरं! ह्या वचनाची आठवण असूं द्यावी. मी ह्या वचनावर जीव धरून राहणार आहें. ( आपले डोळे पुसूं लागते ).

**बाळा०**—तूं अगदीं काळजी करूं नको स्वस्थ ऐस. वेडीं कुठली ! रडतेस काय ? ( तिचे डोळे पुसतो व एक मुका घेऊन ) जा आतां, कोणी येईल.

( चिंगी जाते ).

---

## प्रवेश सातवा.

**स्थळ.** ठाणें. दप्तरदारांच्या वाड्यांतील एक खोली.

**पात्रें.** सत्यभामाबाई, ठकूआत्या, अन्नपूर्णा ( चिंगी ).

**ठकू आत्या**–( हेल काढून ) गेले का जांवयीबोवा ? त्यांना ह्मणायचं होतं कीं नाहीं ? आलांच आहां ते गर्भाधान करून जा.

**सत्यभामा**—ते इकडे आईबापाला नकळत आले होते. आतां घरींच जाणार आहेत. आमचं पत्र गेलं आहे. तिकडून सासूसासऱ्यांचं न्यायला येईल आणि मग तेथें गर्भाधान होईल. इथें कसलं ?

**ठकू आत्या**—इथें होईल तें तिथें नाहीं व्हायचं ! ठाऊक आहे सासूबाई घडानि गोडाची ! तिनें आज दोन वर्षांत पोरीची केली नाहीं वास्तपुस्त ! ती कसचं न्यायला पाठविते आणि ही कसची जाते ! बरोबर जायचं होतं कीं नाहीं ? इथें कशाला राहिली धिडका ! ( चिंगीकडे हात दाखवते ) आणि तिकडे दुसरं लग्नबिग्न केलं ह्मणजे मग ?

**सत्यभामा**—जाईल कशी पण ? नेतच नाहीं ह्मणाले नि !

**ठकू आत्या** ( आश्चर्यचकीत मुद्रा करून ) हें हो

काय बाई बोलणं? जाईल कशी ह्मणजे? आतां कांहीं ल्हान नाहीं. ते निघाले कीं चार पावलें त्यांच्या पुढेंच! अस्सं करायला पाहिजे होतें! एकदां माझ्या घरच्यांच नि माझं झालं भांडण, मला ह्मणाले घरांतून निघून जा! मी म्हणालें, मी नाहीं जायची! तेव्हां ते ह्मणाले तूं नाहीं जात तर मीच जातों! आणि बाई निघाले नि काय! त्यांच्या बरोबर मीहि निघालें. मी ह्मटलं, जिथें तुह्मी तिथें मी! घराचा दरवाजा देखील नाहीं लावला. ते बसले ह्मणजे मी बसें! ( फतकल मारून बसून दाखवते ) ते उठले ह्मणजे मी उठें! ( पटकन् उभी राहून दाखवते ) ते चालूं लागले ह्मणजे मी चालूं लागें! ( लगबगीनें चालून दाखविते ) ( हात जोडून ) ही गर्दी भोंवताली मौज पहायला जमली होती. चांगले सोव्या ह्मसोबापर्यंत गेलों होतों! तिकडून देवळांतून हरभटजी आले आणि त्यांनीं आमचे दोघांचे हात धरले नि घरांत आणून घातलं, विचारा पाहिजेतर त्यांना! जाईल कशी ह्मणजे काय? अस्सं जावं बरं चिगूबाई!

**सत्यभामा**–तें खरं! पण सोईनें होत असलं तर असं कशाला करावं? आज नाहीं उद्यां जायचंच आहे सासरीं! जन्मभर माहेरीं नाहींना रहावयाचें कांहीं?

**ठकू आत्या**–जावो बाई! सुखानें नांदो! देव कोणाचंही बरं करो! पण मी सांगून ठेवितें. माझ्या बोलण्याची आठवण येईल तुम्हाला! मग ह्मणाल, ठकू आत्या बोलली तें खरं! माझी मुलगी असती तर मी अश्शी पाठविली असती! ( चिगीकडे हात ओंवाळून ) ह्या धिडकेसारखी घरीं नसती राहूं दिली! जातें आतां. उशीर झाला.

आज सयंपाकाला जायचं आहे त्या धांदल्या जोशी-बोवाकडे !

( जाते. ) ( सर्व जातात- )

# अंक चवथा.

## प्रवेश पहिला.

**स्थळ.** इंदूर रावसाहेबांचा वाडा.

**पात्रें.** रावसाहेब आणि बाबासाहेब.

**बाबा०**—रावसाहेब ! काय बोवा ! कांहीं अक्कल चालत नाहीं ! मुलगा दुसरें लग्न करावयाला वळेल असें वाटत नाहीं !

**राव०**—कां ? असे निराश कशानें झालां ? त्याचें तुमचें समक्ष कांहीं बोलणें झालें कीं काय ?

**बाबा०**—नाहीं ! आज चार महिने त्याला येथें आल्याला झाले व मी स्वतः कांहीं या बाबतींत त्याच्याशीं अक्षर देखील बोललों नाहीं. त्याचाच कोणी एक सोबती आला होता पर्वा ! त्याची व ह्याची एक प्रहरभर हुजत चालली होती ह्याच कारणावरून ! पण ह्याचा आपला एक हेका ! दुसरें लग्न मिळून करावयाचें नाहीं.

**राव०**—आतां एक माझी मसलत ऐकतां ? तो अशानें ऐकणारा नाहीं. आपण त्याच्यापुढें बोलूं लागलों तर आपला टिकाव लागणार नाहीं व त्याचें मन वळावयाचें नाहीं. त्याच्या मनांत हजारों तरंग येत असतील. आज ऋतु प्राप्त झालेल्या बायकोला टाकावयाचें आणि दुसरें

लग्न करण्याविषयीं मनांत आणावयाचें. कशी मिळेल, केव्हां मिळेल इत्यादि अनेक विचार त्याच्या मनांत घोळत असतील. तेव्हां तो होऊन तर रुकार देणारच नाहीं. पण जर तुह्मी असेच स्वस्थ बसलां तर काम फसेल. पटकन एखादे दिवशीं आपल्या बायकोला घेईल आणि निघून जाईल. मग बसाल हाक मारीत. कसेंही करून एकदां त्याच्या पायांत बिडी अडकवून दिली पाहिजे.

**बाबा०**—मग आह्मीं तेंच तर ह्मणतों. पण अडकवावी कशी ? त्याचाच तर विचार पडला आहे.

**रावसाहेब**—त्याचा विचार मी तुह्माला सांगतों. पण ही मसलत अगदीं गुपचिप् कोणाला न कळतां बराबर बठली पाहिजे. योग्य वेळ आल्यावांचून तुमच्या कुटुंबास देखील कळतां कामा नये.

**बाबा०**—आपलें कार्य होत आहे तर नाहीं कळविणार. सांगा तर खरी ! एकदां काय मसलत तुमची आहे ती.

**राव०**—मसलत अशी आहे कीं, कोल्हापूरचे हेडक्लार्क आहेत ते ! गुदस्तां आपण येथें त्यांची मुलगी पाहिली होती ते ! त्यांच्या मुलीचें लग्न गुदस्तां झालें नाहीं. ते आपल्या येथें मुलगी देण्याला तयार आहेत.

**बाबा०**—मुली पुष्कळ मिळतील हो. काल एक सांगून आली होती ! पण हा कबूल होण्याची मसलत काय सांगतां ?

**रावसाहेब**—ऐका तर खरें ! आतां ह्याची कबूली अगोदर विचारायची नाहीं. आपण ती मुलगी पाहिले-

ली आहे. सगळे विचार ठरलेलेच आहेत. एकदम त्यांस पत्र पाठवून तिथिनिश्चय कळवावा आणि येथेंच लग्नाकरितां बोलवावें.

**बाबासाहेब**—आणि आपली फजीति करून घ्यावी होय ?

**रावसाहेब**—पुरतें ऐकून तर घ्या. मी तुमची फजीती होण्याची मसलत नाहीं सांगत. मसलत मोठी छांदार आहे ! पहा तर खरी ! त्यांना बोलावून घ्यावे व ते येथें आले ह्मणजे एकदम बाळासाहेब यांस तुह्मी स्वतः सांगावें कीं, आतां लग्नाला उभा रहातोस कीं लोकांत माझी फजीती करतोस ? आजपर्यंत तूं माझा शब्द मोडला नाहींस आणि आतां जर तूं माझें बोलणें अमान्य केलेंस व कोल्हापूरकरांस परत जावें लागलें, तर मला लोकांत तोंड दाखवायला जागा रहाणार नाहीं. मग माझ्या जिवाची आशा तूं सोड ! असें स्पष्ट सांगावें आणि त्याला ह्मणावें, याचा पुरता विचार कर आणि काय उत्तर देणें तें दे. इतकें तुह्मी बोलला कीं पुरे ! तो पडलाच घोटाळ्यांत समजा. मग त्याच्याच्यानें नाहीं करीत असें ह्मणवेल काय ? आह्मी, काकासाहेब वगैरे मंडळी आहोंच पुरवणी करण्याला ! प्रसंगावर अवसान येतें. एकदम त्याच्या भोंवतीं गर्दी करून कार्य उरकून घ्यावें ! त्याला त्या वेळेस अशी भीड पडेल कीं, ब्र नाहीं तोंडांतून काढवणार ! अशी झटक्यासरशीं कैक कामें पार पडून जातात. एंकदां टाळी वाजली ह्मणजे झालें ! आहे काय त्यांत ? एक दिवसांत कार्य उरकून घ्यावें ! पण एक मात्र आहे ! अगोदर बातमी बिलकूल

फुटतां कामास नये! जर असें झालें, तर काम फत्याच समजा! कां कशी आहे मसलत?

**बाबा०**—आहे खरी बोवा! साधली मात्र पाहिजे.

**रावसाहेब**—साधायचें काय त्यांत? गुपचुप सगळी व्यवस्था होऊं द्या ह्मणजे झालें! सामानसुमान देखील सगळें आमच्या येथें करवायचें! भोळेपणानें आपल्या कुटुंबापाशीं देखील बोलूं नका. बायकांच्या तोंडांत गुप्त गोष्ट रहात नाहीं. अहो ह्या घाडग्यांच्या लग्नाच्या वेळेस आह्मी एक अशीच मसलत केली होती. सगळ्या गांवाच्या मनांतून तें काम फिसकटवायचें होतें. पण ते घाडगे मराठे असून असले वस्ताद कीं, संकेत ठरल्याप्रमाणें कार्य होईपावेतों घरच्या कारकुनाला देखील त्यांनीं कळूं दिलें नाहीं. यात्रेला जातों ह्मणून गाड्या भरून निघून गेलों आणि एकदां बार उडून गेल्यावर मग सगळ्यांना खबर! असें झालें पाहिजे! कां? असें झाल्यावर आपलें काम होईल कीं नाहीं? तुह्माला कसें वाटतें?

**बाबा०**—अशा प्रसंगाला चारचौघांत मला नाहीं ह्मणायला त्याला विचार तर पडेल खरा! असें वाटतें.

**रावसाहेब**—बस पुरे! विचारांत पडला कीं, आह्मी घेरलाच त्याला! एक एक बोलतो. एक दुसरें बोलतो. तों आली लग्नाची वेळ! मग काय ती खरोखरीच लगीनगर्दी! त्याला विचार करण्याला सवडच सापडूं द्यावयाची नाहीं! एकदां माळ गळ्यांत पडली ह्मणजे त्यापासून दूर व्हावयाचें. मग ह्मणावें, कर सावकाश विचार!

**बाबा०**—ठीक आहे! करितों याप्रमाणें! लिहितों आज पत्र.

**रावसाहेब**–लिहाच ! शुभस्य शीघ्रं ! ह्यावांचून दुसरी तोड नाहीं. जशाशीं तसें ! उगीच रिकामा घोटाळा घालून ठेवला आहे आज तीन वर्षें ! अहो हे आतांचे मुलगे असेच चमत्कारिक असतात. त्यांना असे कचाटींत पकडले पाहिजेत. ह्मणजे ते आपोआप सुधे येतात. बाकी ते विद्वान् खरे ! पण तुह्मी कांहीं ह्मणा, या इंग्रजी विद्वानांना असलीं कारस्थानें कांहीं कळत नाहींत. ठरलें हो ! आतां सत्रा विचार मनांत आणूं नका. तुह्मीही कोल्हापुरकरांना पत्र लिहा. आणि मीही त्यांस आज भलावणपत्र लिहितों.

**बाबा०**–ठीक आहे !

**रावसाहेब**– येतों आतां.

( नमस्कार करून जातात. )

---

## प्रवेश दुसरा.

**स्थळ.** ठाणें येथील दप्तरदारांचा वाडा.

**पात्रें.** सत्यभामाबाई, ठकू आत्या, आणि चिंगी.

**ठकू आत्या**–बाईसाहेब, तुमच्याकडे यायला किं नाहीं पाऊल ओढत नाहीं. ( चिंगीकडे हात करून ) ह्या पोरीकडे पाहिलं ह्मणजे आपलं पोटांत तटतटा तुटूं लागतं ! चार महिने झाले असतील नाहीं का न्हाण येऊन ?

**सत्यभामा०**–हो ! चार कां पांच देखील झाले असतील ! नाहीं तर होतील मेले आठ पंधरा दिवसांनीं ! करायचं काय ? बसलों आहों झालं वाट पहात ! आज न्यायला येईल उद्यां न्यायला येईल पण वार्ता नाहीं या गोष्टीची ! जो दिवस उजाडतो तो सारखाच ! कांहीं

बाई सुचत नाहींसं झालं आहे. वेड्यापिशासारखं होतं एखाद वेळेस.

**ठकू आत्या**—मी तेव्हांच तुह्माला सांगितलं कीं, नवऱ्याबरोबर पुढें घालून पाठवून द्यावयाची होती ! सासूसासऱ्याचं एक तिच्यावर मन नाहीं, पण नवऱ्याचं तर आहे-ना ह्मणता ? मग ह्मणतो काय तो ?

**सत्यभामा०**—त्यांचं कांहीं ह्मणणं गैर नाहीं. नेहमीं पत्रं येतात कीं, तुह्मी काळजी करूं नका. मी लौकरच नेण्याची तजवीज करितों. त्यांच्या मनांतून कांहीं दुसरं लगीन करावयाचं नाहीं व अजून आईबाप कांहीं आपला आग्रह सोडीत नाहींत. आह्माला जांवयांची खात्री आहे. ते कांहीं हिला टाकणार नाहींत.

**ठकू आत्या**—अहो ! कसली खात्री घेऊन बसलां आहां. हीं आतांचीं पोरं बोलतील एक आणि करतील एक. आपल्या शेजारचा संभूराव नाहीं का ? गळ्यांत रुद्राक्षांच्या माळा काय घालतो ! मुद्रा काय लावतो ! जसा भोळा शंकर ! बाप दुसरं लग्न करायला सांगतो तर करीत नाहीं. आणि रात्रीचा कांहीं कधीं घरीं मिळावयाचा नाहीं !

**सत्यभामा०**—छे ! छे ! असं बोलूं देखील नका ! तुह्मी त्यांना पाहिलं नाहीं. अशी तर गोष्ट त्यांच्या हातून कधींच घडावयाची नाहीं. असल्यांच्या संगतीला देखील उभे रहायचे नाहींत ते.

**ठकू आत्या**—असेल बाई ! नाहीं कोणी ह्मणावें ? पण असं वाढलेलं ताट पुढें येतं आणि त्यांनां ढकलून द्यावंसं कां वाटतं ?

**सत्यभामा०**—नशीब पोरीचं ! दुसरं काय ह्मणावं ?

**ठकू आत्या**—असं नका ह्मणूं ! तुमच्या कांहीं देवाधर्माचं तर अंतरलं नाहींना ? नवसबिवस कांहीं फेडायचा राहिला असला तर पहा. तसं कांहीं असलं तर होईल असं ! कध्धीं नाहीं नवरा बायकोची गांठ पडावयाची ! सत्यनारायणाच्या कथेंत नाहीं का तुम्हीं ऐकलंत ! नुस्ता प्रसाद भक्षण करावयाला ती विसरली होती, तर देवानें नवऱ्याची गांठ नाहीं पडूं दिली.

**सत्यभामा०**—आमच्या देवाधर्माचं कांहीं दुसऱ्यासारखं मुळींच कठीण नाहीं ! गुडीपाडव्याच्या दिवशीं जाखाई जोखाईच्या नांवांनीं दोन सवाष्णी सांगितल्या ह्मणजे झालें. त्या आह्मी कधींच अंतरीत नाहीं. पण बाई चिंगीच्या नवसाची मला काल बाईनीं आठवण केली. लग्नाच्या अगोदर दोन वर्षें तिला मोठें दुखणें झालें होतें तें ! तेव्हां तुळजापूरच्या भवानीला नवस केला होता. बरी झाली ह्मणजे हिला तुझ्या पायां पडायला घेऊन येईन. तो नवस तेवढा फेडावयाचा राहिला आहे. मी एकदां लग्नाच्या अगोदर गोष्ट काढली होती. पण घरांतून सांगणं झालं कीं, फेडूं सावकास लग्न झाल्यावर. आणि तो फेडावयाचा आजपर्यंत तसाच राहिला. त्यानें होईल का असं ?

**ठकू आत्या**—हो ! होईल म्हणजे ? हें तुमचं सत्यनारायणाच्या कथेसारखंच झालं आहे ! त्या वाण्यानें असंच तर केलं. संतति झाली ह्मणजे व्रत करीन, हा पहिला नवस ! पुढें तिचें लग्न झालें ह्मणजे व्रत करीन ह्मणाला, आणि तेंही केलन् नाहीं आणि मग विसरलाच नि काय ?

मग जीं त्याचीं फळं भोगावीं लागलीं तीं कांहीं पुसूंच नका. जांवयासुद्धां कैदेंत तर पडले होते! गलबत तर बुडालं! अखेरीस जेव्हां त्याच्या बायकोनें घरीं सत्यनारायण केला, तेव्हां ते संकटांतून मुक्त झाले! देवाला तरी काय? चाळवणीसारखं वाटतं! ह्मटलं ह्मणजे तुह्मीही मुलगी बरी झाल्याबराबर नवस फेडायला जायचं! बरें, तेव्हां नाहीं गेल्यात तर नाहीं; लगीन झाल्यावर केव्हांच नेऊन पायां पडून आणावयाची होती! देवीनें तरी किती दिवस वाट पहावी? तें तुळजापूरचं दैवत! कांहीं सामान्य नका समजूं! ती देवी नवस फेडून घेतल्यावांचून कध्धीं नाहीं दोघांची गाठ पडूं द्यावयाची! "देवी देवळांत आणि नायटे गांवभर," अशी उगीच नाहीं ह्मण पडली! एकावर एक, एकावर एक, संकटं पाठवून आपोआप तो पायां पडायला येईल असं करितात. कांहीं तुमच्या घरीं बोलावणीं नाहीं पाठविणार कि याहो बायांनों नवस फेडायला! सत्यम्बाई मी तुह्माला खरंच सांगतें, आमच्या गरिबांचं पुष्कळ बरं! तुमच्या श्रीमंतांचं नेहमीं अस्संच! अनुकूळ असून सवरून देवाधर्माची आणि नवसाविवसाची अशीच हेळसांड! पहा तर खरा ठकूबाईचा होरा! तुह्मी पोरीला पायां पडून आणा नि मग सगळं सोईचं जमतं कीं नाहीं तें पहा. हें नवसाचंच कारण दुसरं कांहीं नाहीं त्यांत.

**सत्यभामा**—इतक्यावरच असलं तर उद्यां बेत करतें जाण्याचा! बाई गेल्या आहेत बाहेर, आल्या ह्मणजे त्यांना सांगून ठेवतें, ह्मणजे त्या जेवतांना दोन गोष्टी बोलतील ह्मणजे मनांत चांगलं बिंबेल. असल्या गोष्टींवर वि-

श्वास कमी आहे ह्मणून ह्मटलं ! आज खचीत जवळ मीही हट्ट धरूनच सांगेन.

**टकू आत्या**—सांगेन हो ! करीन हो ! असं नका करीत बसूं. नवी तरणी पोर घरांत वावरते. तिच्याकडे लक्ष्य द्या ! तुह्माला बोललं म्हणजे येईल राग, मग ह्मणाल टकू आत्या बोलते ! आणि मेलं वेळ आल्यावर बोलल्यावांचून तर रहावत नाहीं ! आतां बोलतेंच ! ओघास आल्यावर कोणाच्या बापाची भीड धरूं नये ! हें पहा ! काय होत असतं ? ( अंमळ हळूच ) रात्र झाली म्हणजे सगळीं जोडपीं आपआपल्या खोल्यांतून जातात आणि ह्या पोरी असतात माजघरांत. मग यांच्या मनांत काय काय येतं नि काय काय नाहीं ! वरं तर वरं ! नाहीं तर ही आतां पर्वा नित्सुऱ्यांची लेंक गेली कीं नाहीं हात धरून निघून ! अगोदर आईबापांनीं हेळसांड केली आणि आतां कोकलताहेत तिच्या नांवानें ! ( चिंगीकडे हात दाखवून ) अहो ह्या जळत शेगड्या ! जिकडल्या तिकडे असल्या ह्मणजे बऱ्या ! कां मी ह्मणतें हें खरें कीं नाहीं ? माझं बोलणं आपलं उघडं आहे.

**सत्यभामा०**—खरं आहे ! खरं आहे ! वाजवीला खरं ह्मणायला काय हरकत आहे ?

**टकू आत्या**—तर मग अगदीं स्वस्थ बसूं नका. उद्यांच्या उद्यांच बेत करा. ( चिंगीकडे वळून ) चिंगे, झालं बरं तुझं काम ! एकदां नवस फेडून या आणि सासऱ्यां जाऊन सुखानें रामराज्य करा.

**सत्यभामा**—असं झालं ह्मणजे मी तुमची वाचा साखरेनें भरीन !

**ठकू आत्या**—मला लोक म्हणतात भडभडी! ही काय बोलेल नि काय नाहीं? पण माझ्या बोलण्याची तुम्ही प्रचीत पहा! नवस फेडल्यावर जर तुमचं काम नाहीं झालं तर हिला पुन्हा ठकू आत्या ह्मणूं नका! जातें मी आतां उशिर झाला! (पुन्हा मागें वळून) पण विसरूं नका हो, परमेश्वर तुमचं बरं करील. ( जाते )

**सत्यभामा०**—चिंगे, तूं बस, मी ह्या शेजारच्या रमाबाईकडून जाऊन येतें! तूं तेवढें तिळाचें हजार मोजून ठेव. ( जाते ).

**चिंगी**—( आपल्याशीं ) काय काय माझ्या नशिबीं आहे नि काय काय नाहीं तें कळत नाहीं! लोक नांवं ठेवतील ह्मणून किती जपून मी वागतें आहें? घराच्या बाहेर एकटीचं तर पाऊल देखील नाहीं. मला कोठें जाणं सुचतच नाहीं! सगळींच माणसं एकादशीच्या दिवशीं विठोबास जावयाला निघालीं, तेव्हां देखील मी जाणार नव्हतें पण काकूपुढें कांहीं चालेचना! ह्मणून निरुपायास्तव गेलें. तरी देखील एकसारखी पायांखालीं पाहून चालत होतें. इकडे कीं तिकडे नजर देखील जाऊं दिली नाहीं. इतकं भिऊन वागतें. आतां आणखी किती जपून वागावं? पण कितीही जपून वागलें तरी लोक काय बोलतील नि काय नाहीं. ह्याचा नेम नाहीं. नित्सुऱ्यांच्या मुलीची गोष्ट निघायला कारण मी झालेंना? ठकू आत्या कांहीं मला लागावं ह्मणून बोलली नाहीं, हें खरं आहे. पण सहज बोलतांना जी गोष्ट तिनें काढली ती माझ्या मनाला किती खाते आहे! आपलं लंगडं झालं ह्मणून ना असलं बोलणं निघालं! आणि तें पुन्हा

आईच्या समोर! पण काय करायचं! हीच जर मी सासऱ्यां असतें आणि माझं सगळं नीट असतं तर असं बोलणं निघालं असतं काय? देवा! मी हतभागी ह्मणून वडिलांना निमुटपणीं असलं बोलणं ऐकून घ्यावं लागतं! अजून चार पांच महिनेही पुरते झाले नाहींत तोंच हा प्रकार! आणि जर असंच कांहीं दिवस चाललं तर वडिलांना किती दुःख होईल? ठकू आत्या ह्मणते तें खरं! खरोखरच आह्मी जळत शेगड्या! ह्या आमच्या आगीपासून वडिलांचीं अंतःकरणं करपून जात असतील. आतां याला काय करावं? कांहीं इलाज नाहीं! देवा, कशालारे मला जन्मास घातलीस? अरे मजपासून कोणाला तरी सुख व्हायचं होतं? स्वतः मी दुःखी! सासूसासरे दुःखी! तिकडे त्यांनाही दुःखच! इकडे ज्या आईबापांनीं मला जन्म दिला त्यांनाही दुःखच! जिकडे तिकडे माझ्यामुळें दुःखच दुःख! देवा, तुला तरी यांत कांहीं सुख वाटत असेल काय! अरे ही दुःखकारकच हकीकत! ज्यांच्या ज्यांच्या कानांवरून जाते त्यांना देखील दुःख देते. आणि तूं कशीरे पहातोस? अरे! तूं दयाघन ना? तुला माझी कशी करुणा येत नाहीं? अरे रोज रोज मी तुझी करुणा भाकितें, रोज रोज तुजपुढें रडकथा गातें आणि तुझ्याच्यानें ती कशी ऐकवते! काय तुझं इतकं कठोर अंतःकरण आहे? काय तुझ्यांत हें निवारण करण्याची शक्ति नाहीं? छे! छे! हें काय मी बोलतें! सर्वशक्तिमान् परमेश्वर तूं! तुझ्यांत हें निवारण करण्याची शक्ति नाहीं असा संशय देखील मनांत आणणं म्हणजे वेडेपण आहे. ती सर्वशक्ति तुझ्यांत आहे! तूं दुःख मुक्त करूं

लागलास तर आज करशील! आत्तां करशील! पण तुझ्या मनांतच ही गोष्ट येत नसेल. तूंही जाणून बुजून मला शिक्षा केली असशील. पूर्वजन्मींचा काय पापसंचय असेल तो मला कळत नाहीं; पण देवा, ह्या जन्मीं तर मी कधीं तुला विसरलें नाहींना? ह्या जन्मीं माझ्या मनाला कधीं वाईट कल्पनेनें स्पर्श केला आहे काय? "ह्या असल्या पोरींच्या मनांत काय काय येत असेल नि काय काय नाहीं" असं लोक खुशाल म्हणोत बापडे! त्यांना कांहीं ऊर फाडून अंतःकरण काढून दाखवितां येत नाहीं कीं, पहा हें कसं निर्मळ आहे तें! पण देवा, तूं अज्ञान नाहींस ना? तुला तर दिसतें आहेना? अज्ञान लोक पाहिजे तें ह्मणतील! हवीं तीं दूषणें देतील! पण देवा, तुला माझं सत्य काय आहे तें कळत आहेना? अरे, अंतःकरणपूर्वक मी प्रार्थना करितें हें तूं जाणत नाहींस काय? आतां किती माझा अंत पहाणार? अजून किती मला दुःख देणार? देवा एकट्या माझ्यामुळें किती जिवांना दुःख होत आहे. ह्याचा तरी विचार कर! त्यांची तरी दया येऊं दे! मी क्षमेला पात्रच नसलें किंवा मी अघोर पातकीच असलें तर तूं माझी पाहिजे ती दशा कर. पण मजकरितां दुसरे दुःखी होतात हें नाहींरे माझ्याच्यानें पहावत! तुला मलाच दुःखरूपी शिक्षा करावयाची होती तर मला अनाथ तरी करावयाचं होतंस. ज्यांचीं आयुष्यं संपलीं आहेत अशांच्या पोटीं मला घातलं असतंस तर माझे पुष्कळ हाल झाले असते. हवी तेवढी शिक्षा देतां आली असती! अरे ज्यांनीं मला मायाममतेनें वाढवलं त्यांना व ज्यांच्या पदरीं मी पडलें

आहें त्यांना कां विनाकारण दुःख देतोस? हाय हाय! मजकरितां ते किती दुःख भोगीत आहेत! प्रत्येक रजेंत घरीं यावयाचे ते दोन वर्षांत घरीं गेलेच नाहींत. एकटे पुण्यास खाणावळीच्या जेवणानें निर्वाह करून राहिले! घरीं आले म्हणजे म्हणणं होत असे कीं, "रजेच्या दिवसांत पोटभर जेवण होतं आणि हवं तसं खायला जेवायला सांपडतं! दोन चार महिने खाणावळीच्या जेवणाला झाले ह्मणजे घरीं येण्याची कशी हडपू येते," आणि आईबाप लग्नाचा आग्रह करतील ह्मणून घरीं जाणंसुद्धां टाकलं होतं, ते यंदां गेले! ह्याला कारण मीना! देवा, मी लग्नाच्या अगोदर मरतां मरतां वाचलें ह्मणून ह्मणतात ती मी तेव्हांच कां नाहीं मेलें? तेव्हां मेलें असतें तर ह्यांना तर दुःखाचं कारणच नव्हतं पण वडिलांनाही इतकं दुःख झालं नसतं, आणि देवा, अझूनही मी तुला हीच विनवणी करतें कीं, कांहीं सुखाचे दिवस दाखवायचे असतील तर लौकर दाखीव, नाहीं तर तूं मला आपलं मरण दे. सगळ्यांत मोठं भय मरणाचं ना? पण मी त्याला मुळींच भीत नाहीं! मी तें सुखानें पतकरतें! मी मेलें म्हणजे सर्वांच्या दुःखाचं आदिकारणच नष्ट झालं! आईबापांला तत्काल थोडेंसं दुःख होईल पण पदोपदीं होणाऱ्या दुःखापासून ते मुक्त होतील! त्यांनाही दुःख होईल पण लौकरच त्यांचं दुसरं लगीन होईल आणि त्यांच्या आईबापांसही आनंद होईल. मग ह्या दुःखाचा सहज विसर पडेल. खरोखर ह्या माझ्या मरणापासून परिणामीं सुखच होईल. देवा, जर माझ्यापासून इतरांना असंच दुःख होणार असलं तर मी आज मरणाला तयार आहें!

पण देवा, तुझी करणी किती चमत्कारिक आहेरे ! आठवड्या आठवड्याला तिकडचं पत्र पाठवून पुन्हां पुन्हां सुखाची आशा वाढवितोस ! त्यामुळें भलतं सलतं करण्यालाही धीर होत नाहीं. नाहीं तर मी कधींच ह्या दुःखांतून सुटलें असतें आणि ह्यांनाही सोडविलें असतें. पण देवा, खरोखर तुझ्या मनांत काय आहे तें कळत नाहीं. तूं करूं लागलास तर उद्यां ( नवस फेडून आलें कीं ) सुखी करशील. इतकं तुझ्यांत सामर्थ्य आहे ! देवा, मी तुला शरण आलें आहें. आतां काय इच्छेस येईल तें कर. तुझी प्रार्थना कशी करावी तें देखील मला कळत नाहीं. ( पडद्यांतून दोन तीन हाका ( आईच्या ) ऐकूं येतात. ) ( चपापून डोळे पुसून ) आलें हो आलें काय बाई ! अस्स होतं एखादे वेळेस ! किती हाका मारिल्या असतील कोण जाणे ! आईनें सांगितलेलें काम देखील मी विसरलें. एकदां हे विचार मनांत येऊं लागले म्हणजे जेवणाची देखील आठवण होत नाहीं. मग लोक भ्रमिष्ठ, नादी, जें म्हणतील तें ऐकून घ्यावं लागतं. देवा, मी एकदां पक्की वेडी झालें असतें तरी बरें झालें असतें. मग कशाचंच कांहीं नाहीं. आतां आई बोलेल तें मुकाट्यानें ऐकून घेतलें पाहिजे ! ( पुन्हा हाक ऐकूं येते ) आलें हो आलें ! ( जाते ).

---

## प्रवेश तिसरा.

**स्थळ.** इंदूर. बाळासाहेबांची अभ्यासाची खोली.

**पात्रें.** बाळासाहेब.

**बाळासाहेब**—( मनाशीं ) झाली ! आतां आईबापांचें

मन वळण्याची निराशा झाली ! आज चार पांच महिने वडिलांची वाट पाहिली ! मनाला वाटत होतें कीं, आईबापांच्या अंतःकरणाला दुःख देऊं नये, पण आतां निरुपाय झाला. आपल्या नशिवीं तूर्त आईबापांला दुःख देणें आलें खरें ! त्यावांचून दुसरी तोड नाहीं. नोकरीचें शिजल्यासारखेंच आहे. मित्रचंद्राचें काल पत्र आलें हेंही ठीक झालें ! त्यानें काय लिहिलें आहे कीं, नबाबसाहेबांच्या मनांतून तुह्माला समक्ष पहावयाचें आहे. तर तुह्मी पत्रदर्शनींच निघून यावें. हल्लींचे नबाब नवीन विद्वानांस फार चहातात; पण त्यांचा नेम आहे कीं, मोठ्या हुद्द्यावर जीं मनुष्यें नेमावयाचीं त्यांना समक्ष बोलावून आणून नंतर त्यांस हुकूम द्यावयाचा, व त्यास नेकीनें नोकरी करण्याविषयीं उमेद यावी अशा प्रकारचे चार शब्द त्याजपाशीं बोलायचे. ठीक आहे ! हें त्यांचें म्हणणें कांहीं गैर नाहीं. आपल्यांनाही असाच यजमान पाहिजे ! आतां हाच विचार कीं, नोकरीवर जाऊन रुजू व्हावें आणि मागाहून कुटुंबास घेऊन तिकडेच रहावें. तर कांहीं दुःखांत सुखाचा लाभ होईल. दुसरा इलाज नाहीं ! परमेश्वरदयेनें लौकर आपणास संतति झाली तर आईबापांची सहचज खात्री होईल व निर्वंश होण्याची त्यांची भीती मुळींच नाहींशी होईल. व मग आपला सहज अंगीकार करतील. माया का तुटते ? आज चार पांच महिने अगदीं फुकट गेले ! त्यांची मर्यादा राखून पर्यायापर्यायानें त्यांना समक्ष सुचविलें, कुटुंबास आणवण्याविषयीं विनवणीचे निरोप कळविले, पण ते सारे व्यर्थ गेले ! त्यांच्या मनावर माझ्या प्रयत्नांचें कांहींच कार्य घडलें

नाहीं. आणि शेवटीं ज्या दत्ताला भीत होतों तेंच येऊन पुढें राहिलें. असो, ईश्वराची मर्जी! आतां येथून निघून जाणें मात्र गुपचिप झालें पाहिजे आणि आम्ही उभयतां अमुक ठिकाणीं आहों, ही देखील गोष्ट यांस लौकर न कळेल तर बरी! आतां ह्यायोगानें वडिलांस दुःख तर खास होईल पण हिच्या दुःखाचा विचार नकोका मला करण्याला! हिनें तरी किती दिवस पतिवियोगानें काढावेत आणि अशी कांहीं तोड काढल्यावांचून चालणार कसें? कांहींच तजवीज न केली तर बारा नि बारा चोवीस वर्षे अशीं निघून जातील. त्यांचा हेका सुटावयाचा नाहीं! माझा नेम टळावयाचा नाहीं! आपला पहिला दिवस! मग त्यांत अर्थ काय! आणि प्रस्तुत मी मनांत आणिलें आहे ह्या प्रकारानें काय होणार आहे कीं, देवानें दिवस दाखविला तर पुढच्या वर्षी वडिलांची भेट! देवानें घडविलें मात्र पाहिजे कीं, बारशालाच तेथें नेऊं. सर्व गोष्टी ईश्वराधीन आहेत. आईबापांना नकळत निघून जावयाचें मोठें जिवावर आलें आहे, पण काय इलाज याला? ह्यांना कळवलें तर हे अडथळा आणतील आणि मला घोटाळ्यांत घालतील. आतां घ्यावें देवाचें नांव! आणि ल्याहावीं दोहोंकडे पत्रें! एक मित्रचंद्रास ल्याहावें कीं, मी उद्यांच्या उद्यांच निघून येतों आणि एक सासुरवाडीस पाठवावें कीं नोकरीवर रुजू झालों कीं, सौभाग्यवतीस घेऊन जातों. कांहीं काळजी करूं नये. आतां वडिलांच्या मनवळवणीचा नाद सोडला! ह्मणजे तिला तितका धीर येईल. ठरला! हाच विचार काईम! परमेश्वरा मी आरंभलें आहे ह्या कृत्यांत मला चांगलें यश

दे ! आणि लौकर मातापितरांची भेट पुन्हा घडेल असा योग आण !

(पत्रें लिहून टपालांत टाकण्याकरितां शिपायाजवळ देतो.)

# अंक पांचवा.

## प्रवेश पहिला.

**स्थळ.** पुण्याजवळ एक्या मुक्कामावरील धर्मशाळा.

**पात्रें.** अण्णासाहेब, सत्यभामाबाई, चिंगी, गणोजी, एक ह्यातारा शिपायी.

**गणोजी**—ह्या मुक्कामावर उतरावयाला जागा फार छांदार आहे. अण्णासाहेब मी पाहून आलों. मोठी जंगी धर्मशाळा आहे. दोन तीन खोल्या आहेत. खाशी चिरेबंदी विहीर आहे. पाणी गोड असून गार ! तेथें एक लग्नाचें वऱ्हाड उतरलें होतें त्यांचें सामान विमान रवाना झालें व खाशा स्वाऱ्याही निघण्याच्या बेतांत आहेत. सगळी जागा मोकळी आहे व भोंवतालीं आंबराई असल्यामुळें जागा उत्तम हवाशीर आहे. तिकडेच चला उतरावयाला.

**अण्णासाहेब**—ठीक आहे. चला.

**सत्यभामाबाई**—चला कोठें तरी लावा एकदां विऱ्हाड-चिंगीला मघांपासून तहान लागली आहे.

**गणोजी**—हें आलेंच ! अगदीं जवळ आहे. ह्या ह्याच्या पलिकडे गेलों कीं धर्मशाळाच ( हातानें दाखवितो ).

( सर्व जाऊन उतरतात व सामानसुमान एके बाजूस लाऊन ठेवतात ) ( चिंगी दरवाजांतून धर्मशाळे-च्या दुसरे बाजूकडे पहाते. ) ( पडद्यांत ).

**एक पुरुष**–( मोठ्यानें ) हं निघा लौकर ! खटाऱ्या गाड्या देखील लांब गेल्या असतील. ह्या बायकांचें लौकर आटपायचें नाहीं !

**एक बायको**–आमचं आटपलं आहे हो ! पण ह्या गंगाबाईचं लुगडं विहिरीवरच वाळत घातलेलं तसंच राहिलं आहे, तें आणायाला ती जात आहे !

**म्हातारा शिपायी**–लुगडं व्हय? हं चला तुमी बसा अक्शी गाडींत. मी इयरीवरून लुगडं घेऊनशान् येतों. ( पडद्याबाहेर येतो. )

**चिंगी**–आई, मी ह्या म्हाताऱ्याबरोबर विहिरीवर पाणी प्यायला जाऊं? मला केव्हांची तहान लागली आहे. हे विहिरीवरच जात आहेत.

**सत्यभामा०**–शिपाईबोवा, तुह्मी विहिरीवर कां जातां? आमच्या ह्या मुलीला विहीर दाखवा. जवळ आहेना?

**म्हातारा शिपायी**–जवळ हाये. अक्शी ह्या धरम-साळच्या मागच्च ! ये मुली ये ! दोरीबिरी कांई नग ! दोरी मप हाये.

**सत्यभामाबाई**–ह्यांच्या बरोबर पाठवूं का? कां ग-णोजीला देतां बरोबर?

**अण्णासाहेब**–( म्हाताऱ्याकडे पहातात. म्हातारा त्यां-स रामराम करतो. ) ( त्यास रामराम करून ) पाठीव पाठीव ! तो आपल्या ओळखीचा आहे. जाग जा चिंगे, नीट जपून जा, नाहींतर पायांत कांटाबिटा भरेल.

**सत्यभामा.**—अग ए! पाय बीय निसरेल हो तिथं बुळबुळीत असलं तर, नाहीं तर धांदल्या धांदल्या जाशील आणि पडशील.

**म्हातारा**—न्हाई बाईसाब ! थतं निसरडं बिसरडं काइबी न्हाइ. पानीपन् पानी हाये. अक्शी मोराचं असूंच्र जनु ! नामी चिरेबंदी बाव हायेना ?

( म्हातारा व चिंगी, दोघेंजणं जातात. )

---

## प्रवेश दुसरा.

**स्थळ.** धर्मशाळेजवळची विहीर.

**पात्रें.** चिंगी ( अन्न० ) म्हातारा शिपार्या.

**चिंगी**—ती तिथें खांबापाशीं बसली होती ती नवरी वाटतं ?

**म्हातारा.**—व्हय. तीच ! तीच !

**चिंगी**—केवढी मोठी दिसते हो मुलगी ? बिजवरा जोगी आहे ! प्रथमवर मिळाला कीं बिजवर ?

**म्हातारा**—नवरदेव व्हय ? नवरदेव ? नवरदेव बिजवरच हाये अन् त्यामंदीपन् सवत जिवंत हाये म्हनत्यात.

**चिंगी**—कोणत्या गांवाला जायचं हो लगीन ? कोणाच्या मुलाला दिली ? श्रीमंत आहेत कां गरीब ?

**म्हातारा**—त्ये कोकनूच हायता ! ठान ममईकडच ! कोकनात त्यांचं घरबी हाये, शेतभातबी हाये. समुदं हाय, त्यास्नी काय कमी हाय ? इक्तं असूनशानि इंदुरास मोठ कामगार हायता म्हणत्याति. काय त्याचं नांव बगा ! निगुत तोंडाम्होर व्हतं की; हं आली याद ! बाबासाव ! बाबासाव ! ठिकान लई सरस हायेनि नवरदेव पन् वि-

ग्रजी लिवन्यामंदी लई हुषार हाये ह्मनत्यात. आज मनसुबीची नोकरी मिळवील असा हायेना? अक्शीं चांगलं हाये पन रांड सवत हाये इत्कंच वाईट बगा!

**चिंगी**—कांहो? एक असून दुसरी कां करितात?

**ह्मातारा**—कोना ल्येकाला ठावं? पन् इक्तं ऐकन्यांत हाये कीं, पहिल्या बायकोला कांहीं खोड हाये ह्मनूनशान् तिला टाकली हाये न् कायनुबायनु सांगत्यात! समदं कुनाला ठावं! तवांपासूनशान् अक्शी आईच्याच घरीं ऱ्हाती बगा! तिला हकडं आनीतच न्हाईत. हं चला बिगी बिगी आटपा लौकर! वादूळ झालाय.

**चिंगी**—जा तुम्ही आतां? मला वाट ठाऊक आहे. (ह्मातारा जातो)

(ह्मातारा गणोजीपाशीं चिलीम ओढून चालता होतो.)

---

## प्रवेश तिसरा.

**स्थळ.** धर्मशाळा.

**पात्रें.** गणोजी, अण्णासाहेब, सत्यभामाबाई.

**गणोजी**—अण्णासाहेब! हें वऱ्हाड गेलं हें, हें इंदुरास गेलं! आपल्या बाबासाहेबांचे व्याही होणार हे!

**अण्णासाहेब**—(आश्चर्यांत पडून) अरे, हें काय म्हणतोस तूं?

**गणोजी**—हो. हो. खरंच! त्यांचा शिपायी मजजवळ चिलीम ओढीत बसला होता नाहींका? त्यानें मला सगळी हकीकत सांगितली! बाळासाहेबांचें दुसरें लगीन करणार ते! पर्वांची लगीनतीथ!

**अण्णासाहेब**—अरे! हळू बोल अमळसा! चिंगीला यांतलें अक्षर देखील कळवूं नका कोणी!

**गणोजी**—नाहीं महाराज! ती येथें नाहीं. विहिरीवर गेली आहेना? पाणी प्यायला? ती येथें असती तर मी हळूच सांगितलें असतें! इतकी कां मला अक्कल नाहीं?

**सत्यभामाबाई**—अरे पण तिला जाऊन बराच वेळ झाला. पहा पहा! तिकडे काय करते आहे ती! तिला ह्यांतली हकीकत नाहींना कळली? ह्या सामान लावण्याच्या गर्दीत मी त्या ह्यातान्याबरोबर पोरीला तिकडे पाठविली. पण तिला जर ही हकीकत कळलीअसली तर धडगत नाहीं.

**अण्णासाहेब**—अरे त्या ह्यातान्या शिपायांनीं का तुला ही हकीकत कळविली?

**गणोजी**—होय!

**अण्णासाहेब**—काय भोग पहा! मी त्याच्या बरोबरच तिला विहिरिवर पाठविली होती. अरे कोणीकडे आहे ती विहीर? चल चल अगोदर तिकडे.

( दोघे तिकडे लगबगीनें जातात. )

---

## प्रवेश चवथा.

**स्थळ.** धर्मशाळेची विहीर.

**पात्रें.** चिंगी, अण्णासाहेब, गणोजी, सत्यभामाबाई, बोवाजी आणि रखवालदार.

( विहिरीच्या कांठावर चिंगी आकाशाकडे तोंड करून व हात जोडून उभी आहे. )

**चिंगी**—( मनाशीं ) परमेश्वरा! नारायणा! हा कारे

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे

प्रसंग आणलास शेवटीं? अरे मी बरोबर नेण्याविषयीं आग्रह धरला होता तेंव्हां किती शांतपणानें मला वचन दिलं कीं तूं निष्काळजी रहा ! मी तुला टाकून दुसरं लगीन करणार नाहीं. आणि शेवटीं ही का त्याची प्रचिती? आ-तां मी कसा काळ कंठावा ? मी तुमच्या वचनावर जीव धरून आहें असें बोललें आणि हातावर हात घेतला होता, त्याची त्यांना आठवण नसेल काय ? माझ्या जिवाविषयीं त्यांच्या मनांत कांहींच आलें नसेल काय ? छे ! छे ! असं कधींही होणार नाहीं. इतकं कठोर अंतःकरण नाहींच त्यांचं ! मला टाकून जातांना त्यांच्या डोळ्यांला पाणी आलं होतं ! त्यांची पूर्ण माया होती ! ह्याजविषयीं संशयच नाहीं ! आठ आठ दिवसांनीं पत्रें येत असत आणि मला धीर देणं होत असे ! त्यांना दिलेल्या वचनाची आठवण झाली नसेल. हें बोलणें व्यर्थ आहे ! त्यांनीं जाणून बुजून वचन मोडलं असावं ! त्यांना अति-शयच संकट पडलं असलं तर ते तरी काय करितात ! आईबापांनीं जर त्यांना असंच सांगितलं असलं कीं, तूं दुसरं लगीन नाहीं केलंस तर आम्ही जीव देऊं ! तर मग त्यांनीं ह्या हतभागीकरतां का आईबापांचे बळी द्यावेत? जें त्यांनीं केलं असेल तें बरोबरच केलं असेल. ते वि-चारी आहेत. त्यांना दोष देण्यापेक्षां आपल्याच न-शिबाला दोष द्यावा ! मीच वेडी ! मी उगीच त्यांचं व-चन घेऊन त्यांना गुंतवलं ! बरं पण, काय चिंता आहे ? पर्वाचं लगीन ना ? मी त्यांना वचनांतून आतां मोकळी करितें ! मी जिवंत आहें तोंपर्यंत दुसरं लगीन करावयाचं नाहीं, हेंच ना त्यांचं वचन ? हें मी सत्य करतें. हे

विहिरी ! मी तुझ्या कांठावर बसलें आहें; मला तूं आसरा दे. ह्मणजे माझ्या पतीचं वचन मोकळं झालं ! मी मेलें ह्मणजे त्यांना दुसरं लगीन करण्याला कांहीं हरकत नाहीं ! झाला. हाच विचार काईम ! आतां आईबापांला अंमळ वाईट वाटेल, पण हेंच शेवटलं वाईट वाटणं ! वारंवार मजकरितां त्यांस वाईट वाटायला नको ! सुटतील बिचारीं ! मजकरितां त्यांनीं पुष्कळ दुःखें भोगलीं ! हा माझा त्यांना शेवटला नमस्कार ! मला लौकर जीव दिला पाहिजे ! नाहीं तर ही मसलत फसेल. काय करावं कोणी जवळ असतं किंवा आईबाप परगांवीं असते तर त्यांना मी शेवटलं पत्र किंवा निरोप सांगितला असता कीं, त्यांची तुमची भेट झाली तर तुह्मी त्यांस कधीं दुखवूं नका. "दुसरं लगीन केलं हें गैर केलं" असं कधीं अक्षर देखील तोंडांतून काढूं नका, इतकं मी शेवटलं मागणं मागतें. पण नको ते नाहींच बोलणार ! बोलून तरी मी मेल्यावर काय फायदा होणार आहे ? आतां जलदेवतेच्याच पायां पडावं आणि उडी घ्यावी आंत ! ( असें ह्मणून ओंचे आवरून कंबरेस पदर बांधते ) ( जलदेवतेस नमस्कार करिते ) ( वर पाहून ) देवा नारायणा ! तुलाही हा माझा शेवटला नमस्कार ! ( पुनः नमस्कार करते ) आतां माझ्याबद्दल मी तुला मुळींच विनवीत नाहीं. पण मरतेवेळचं शेवटलं मागणं एक मागतें कीं, एवढं पूर्ण केलंस तर पहा ! आईबापांनीं व त्यांनीं मजकरितां फार दुःखें भोगलीं आहेत तर ह्यापुढें त्यांस दुःख दाखवूं नको. आणि सासूसासऱ्यांना पुष्कळ आयुष्य देऊन नातवंड त्यांच्या दृष्टीस पडूं दे.

हे सूर्यनारायणा, तुला नमस्कार ! हे जलदेवतांनों, तुह्माला नमस्कार ! ( नमस्कार करते व जयगंगाबाई ह्मणून उडी टाकते ) ( इतक्यांत गणोजी येतो व मागोमाग अण्णासाहेब येतात. )

**गणोजी**—अण्णासाहेब, धांवाहो धांवा ! घात हो घात ! मला पाहूनच जशी कांहीं तिनें उडी टाकलीन ! मी तिला पाठमोरी पाहिली देखील ! चिंगीच ती ! हा नुसता तांब्या मात्र विहिरीच्या कांठावर आहे. हें पहा पाणी देखील खळखळतें आहे अजून ! ( विहिरींत पाण्याकडे बोट दाखवतो. )

**अण्णासाहेब**—अरे पहातोस काय ? आंत उडी टाक. ती खास विहिरींतच पडली. दुसरी कल्पना नको. उडी टाक.

**गणोजी**—( घाबरून ) पागोटें तरी आंत सोडा ! तें तिकडे कायसेंसें दिसतें आहे. ( विहिरींत दाखवतो ) मला पोहतां येत नाहीं. ( मोठ्यानें ) कोणी धांवाहो धांवा. ( ओरडा करतो )

( इतक्यांत एक बोवाजी व सत्यभामाबाई रडत ओरडत येतात. )

**बोवाजी**—क्या है क्या है ?

**अण्णासाहेब**—आमची मुलगी विहिरींत पडली ! कोणी उडी टाकून लौकर बाहेर काढा.

**सत्यभामा०**—( रडत ) त्याच्या पायां पडते.

**बोवाजी**—अच्छा डरो मत ! भगवत् तेरा कल्यान करेगा. बंभोला शंकर !

( असें ह्मणून बोवाजी आंत उडी टाकतो व चिंगीला बाहेर काढतो. ) ( सर्व तिच्याभोवतालीं जमतात व तिजकडे पाहून तींत कांहीं अर्थ राहिला नाहीं असें समजून बाजूला सरकतात. सत्यभामाबाई चिंगीला मिठी मारते ).

**सत्यभामा**–( रडत रडत ) चिंगे, चिंगे! काय केलंस ग हें? अग मी होऊन तुला विहिरीवर पाठविलें आणि शेवटीं तेंच घाताला कारण झालें काग? मीच तुझी अंतरवैरीण कशी झालें? चिंगे, आतां आह्मी कोणाकडे पहावं ग? देवा एकुलती एक पोर दिली होतीस. आम्ही तीच मुलगा समजत होतों. तीही घेऊन गेलास काय? आंधळ्याचा एक डोळा! तोही फुटला तर त्यानें काय करावं? अरे देवा कसारे घात केलास हा? काय पोरीचं शहाणपण! काय पोरीचे गुण! किती लीनपणा! कध्धीं कध्धीं देखील उलटून शब्द बोलली नाहीं! देवा! तुला चांगलीं माणसं फार दिवस ठेवावयाचीं नसतात तर मग तीं देतोस तरी कशाला? अरे, अरे, अरे, अरे! फार दुःख भोगलन तिनें! मोठी आशा होती हो संसार करण्याची! तिकडच्या पत्राची किती वाट पहावी? झा–लं शेवटली हकीकत कळली न् सोडली मृत्युलोकची वस्ति! गेलीस ग गेलीस! चिंगे, तूं सुटलीस पण आह्मी आतां घरीं जाऊन तोंड कसं दाखवावं? चुलते, चुलत्या विचारतील त्यांना काय सांगावं? चिंगे, अग हें फार वाईट केलंस ग? शिवशिव! शिवशिव! चिंगे, तुझी एकदम कशीग आशा खुंटली? चिंगे, ते लग्नाला उभे नच राहिले आणि ऐन सावधानाच्या वेळेस तेथून पळून आले आणि येथें तुझ्याकरितां येऊन उभे राहिले तर त्यांना आम्ही काय

सांगावं ? चिंगे, नवस तरी पुरता फेडून येऊं द्यायचं होतंस ! चिंगी ! चिंगे ! चिंगुडे ! आतां किती हाका मारूंग ! आतां कशाची चिंगी बोलते ! चिंगे मनची हौस मनांत राहिलीग ! चिंगे त्यांचं लग्न झाल्याचं तरी पक्कं ऐकायचं होतंस आणि मग असं करायचं होतंस ! पुढचं दुःख तुझ्याच्यानें सोसवणार नाहीं म्हणून कांग असं केलंस ? चिंगे, चिंगे, देवा, देवा !

**बोवाजी**—अब रोनेमें क्या हसल है ? हुवासो हुवा ! भगवत्की खुषी ! हरहर ! बहुत बुरी बात हो गयी ! मेरे दवडनेका कुच फायदा नहीं हुवा !

**अण्णासाहेब**—बोवाजी, तुमच्याकडे काय त्याचं ? तुमचे आमच्यावर उपकारच आहेत. तुम्ही आलां ह्मणून लौकर बाहेर तरी निघाली ! झालं ! जितके दिवस तिचा आमचा ऋणानुबंध होता तितके दिवस होती आमच्या जवळ ! ऋणानुबंध सरला तशी गेली सोडून ! दुःख करीत बसून काय उपयोग आहे ? ( स्त्रीकडे वळून ) तुला वाईट वाटतं आणि आह्माला नाहीं का वाटत ? पण करायचं काय ? प्रसंग पाहून वागलं पाहिजे ! आपण प्रवासांत आहों ! येथें तूं अशी रडत बसलीस तर पुढची व्यवस्था कशी लागावी ? कांहीं तरी विचार कर ! पुष्कळ रडलीस आणि ओरडलीस तर काय आतां परत येते ती ? देवाची मर्जी ह्मणावी ! आणि स्वस्थ बसावं !

**सत्यभामा०**—त्या सगळ्या गोष्टी मला समजतात पण पोटांत हुंदका येतो तो नाहीं हो आवरत ? याला मी काय करूं ? ( मोठ्यानें हंबरडा फोडते ).

**अण्णासाहेब**–( अंमळ रागावल्यासारख्या स्वरानें ) बस, तर मग बस ! तिला पुढें घेऊन आणखी रडत बस ! मनुष्याला प्रसंग कळत नाहीं ह्मणजे काय ?

**गणोजी**–बाईसाहेब ! अण्णासाहेब म्हणतात तें खरें आहे. आपल्यावर मोठा प्रसंग गुदरला आहे; झाल्या गोष्टीला उपाय नाहीं ! तुम्ही जर रडतच बसलां, तर अण्णासाहेबांना पुढची व्यवस्था कशी सुचेल ? मन कसें निगरगट्ट केलें पाहिजे. येथें कोणी आपले सगे सोयरे आहेत कीं, ओळखी देळखीचीं आहेत ? कीं आपलें कोणी शांतवन करावयाला येईल ! आपले आपणच शांत झालें पाहिजे. प्रसंग मोठा कठिण असतो ! प्रसंगीं धीरच धरला पाहिजे !

**अण्णासाहेब**–सांग सांग ! अशा कांहीं विचाराच्या गोष्टी सांग तिला.

( उगी रहाते व धर्मशाळेच्या बाजूस तोंड फिरवून बसते. )

( अण्णासाहेब व गणोजी आणि बोवाजी हळूहळू कुजबुजतात. )

**अण्णासाहेब**–( मोठ्यानें ) समजलां सर्व ? आतां जितकी लौकर तयारी होईल तितकी करा. जाच तूं आतां.

( पडदा पडतो. )

---

## प्रवेश पांचवा.

**स्थळ.** खाणावळ.

**पात्रें,** बाळासाहेब. सयंपाकी, रखवालदार.

( बाळासाहेब जेवीत बसला आहे )

**रखवालदार**–कोण आहे घरांत ?

**सयंपा०**—कोणरे महादेवा! कां आला होतास?

**रखवालदार**—दोन चार ब्राह्मण मिळतील तर पाहिजे आहेत. आमच्या त्या धर्मशाळेच्या विहिरींत एक्या ब्राह्मणाच्या पोरीनें जीव दिलान. आईबाप बरोबर आहेत. एक गडी आहे. कोणी मोठे गृहस्थ असावेत, पण काय करितात? त्यांच्यावर मोठा प्रसंग आला आहे.

**बाळा०**—काय आहे हो काय? कोणी जीव दिला?

**सयंपा०**—कोणी ब्राह्मणाची मुलगी आहे ह्मणतो. पहा बोवा तुम्ही जात असलेत तर जा. ह्या येथें असें कांहीं असलें ह्मणजे मोठी पंचाईत पडते. अशा प्रसंगीं उपयोगी पडल्याचें मोठें पुण्य आहे.

**बाळा०**—आमच्यावर तरी असा कधीं प्रसंग नाहीं. त्यांत आमचे तीर्थरूप अजून जिवंत आहेत. पण प्रसंगच आला तर कां मागें हटायचें आहे? ब्राह्मणाला ब्राह्मणांनीं मदत न करावी तर ह्या कामाला पुष्कळ शंभर कुणबी आले तरी काय उपयोग? मी तर येतोंच पण आणखी कोणी मिळण्यासारखा असला तर पहा. माझें झालेंच समजा! ( पाणी पितो )

**रखवालदार**—या येथून एक कोसावर एक कुळकर्णी आहे तो येतो अशा कामाला. त्या शिवाय दुसरं कोणी जवळ पास नाहीं.

**बाळा०**—अहो, कांहीं नको दुसरं कोणी? वाटेंतला प्रसंग. तिचा बाप चांगला धीरवान आहेना? जर तो धीरवान असला तर दुसऱ्या कोणाची जरूर नाहीं. तेव्हांच फुंकून टाकूं आणि मोकळे होऊं! आहे काय त्यांत?

**रखवालदार**--तो खबरदार आहे. तिच्या आईनें काय आकांत केला होता, पण त्यानें तिला चार धिराच्या गोष्टी सांगून एकीकडे चिप्प बसवलं.

**बाळा०**--प्रसंगीं असेंच केलें पाहिजे !

**संयपाक्या**--कांहो जीव देण्याचें कांहीं कारण कळलें का ? बसा, जेवले कीं आलेच !

**रखवालदार**--काय बोवा, त्यांचा शिपायी का गडी कोणीसा आहे, तो सांगत होता कीं, हिच्या नवऱ्याचं उद्यां का पर्वां दुसरं लगीन आहे. ही हकीकत तिला कळली ह्मणून तिनें जीव दिला !

**बाळा०**--( मनाशीं ) जर आपण दुसरें लग्न केलें असतें तर आमचेंही असेंच होणार होतें. कठीण आहे !

**संयपाक्या**--तिला येथेंच कोणी सांगितलं प्रवासांत ? काय चमत्कार आहे बोवा लोकांचा ?

**रखवालदार**--चमत्कार कसला ? तिला कोणी मुद्दाम का सांगायला गेलं ? तें वऱ्हाडच धर्मशाळेंत उतरलं होतं. प्रत्यक्ष होणारी सवत देखील तिनें पाहिली असेल. ह्यांची उतरावयाची गर्दी आणि त्यांची निघायची गर्दी ! कोणी सहज बोललं असेल कीं, हें वऱ्हाड इंदुरास जातं ह्मणून.

**बाळा०**--( मनाशींच ह्म० ) काय इंदुरास ? इंदुरास कोण बरें असावा ? असेल झालें कोणी ! मोठें शहर आहे तेथें सगळे खेळ आहेत. ( उघडपणें ) जेवण चालत नाहीं बोवा ! उन्हांतून थकून आल्यानें असें होतें ! ( उठतो ). अरे, ज्यांच्या मुलीनें जीव दिला ते कुठलेरे ? कांहीं ठाऊक आहे ?

**रखवालदार**–ठाण्याचे ह्मणत होता तो! चला महाराज, ते तिकडे वाट पहात असतील..

**बाळा०**–( मनांत चपापून ) ठाण्याचे कोण असावे बरें? ( उघडपणें ) चल चल! झालें हें गाठोडें बांधलें! बरोबर घ्यावें हेंच बरें! तेथें त्यांच्या शिपायी मनुष्याच्या ताब्यांत देऊं. चलाच. ( जातोंहं मी, असें संयपाक्यास सांगतो. )

( खाणावळीचा दरवाजा बंद होतो. )

---

## प्रवेश सातवा.

**स्थळ.** धर्मशाळेची वाट.

**पात्रें.** रखवालदार, बाळासाहेब.

**रखवालदार**–द्या मजपाशीं! मी घेतों गांठोडें! हीच वाट नीट जाते. ती धर्मशाळा ( हातानें दाखवितो. )

**बाळा०**– ( गांठोडें त्याजपाशीं देऊन मनाशीं ) ठाण्याचे कोण असावे, कांहीं लक्षांत येत नाहीं! बहुधा ते माझ्या ओळखीचे असतील, नसलेच तरी सासुरवाडच्या मनुष्यांना तरी ओळखत असतील! ( आश्चर्यानें ) अरे पण काय चमत्कार आहे! दोन्हीं गांवेंही एक मिळालीं! हा सांगतो ही गोष्ट तर माझ्या गोष्टीशीं अगदीं मिळते. इतकेंच कीं, आह्मी दुसरें लग्न करणारे नाहीं! आणि त्यानें दुसऱ्या लग्नाचा बेत केल्यामुळें ही विचारी प्राणाला मुकली! काय चमत्कार आहे! हीच दशा आमचीची झाली असती बरें! आमच्या तिकडेही कोणी दुष्टानें असली खोटी बातमी सांगितली तर असेंच होईल! ( अंमळसा स्तब्ध राहून ) पण असेंच तर नसेल ना?

कोणी कांहीं लचांड केलें नाहींना? (उघडपणें) अरे ती मेलेली मुलगी पाहिलीस तूं?

**खवालदार**–(मनाशीं) हा कां बरें इतकें खोदून खोदून विचारतो? (मोठ्यानें) वाः! हें काय महाराज! पाहिली ह्मणजे? नवी तरणी पोर! गोरी पान! अजून प्रेतकळा देखील तिच्या तोंडावर आली नाहीं. जसाच्या तसा चेहरा आहे!

**बाळा०**–अरे! तिच्या कपाळावर कांहीं खूण आहे?

**खवालदार**–(मनाशीं) ह्याचा तिचा कांहीं तरी संबंध असेल. एरव्हीं हा इतकें खोदून विचारणारा नाहीं. आतां आपण ह्यास जास्ती खुलासा देऊं नये. (उघडपणें) इतकें नाहीं मीं पाहिलें.

**बाळासाहेब**–(मनाशीं) हा आतां बराबर सांगत नाहीं. ह्याच्या मनांत खचित मजविषयीं संशय आला असावा, हें उघड दिसतें. कपाळावरची खूण स्पष्ट दिसण्याजोगी आहे, पण हा ती नाहीं असें न सांगतां पाहिली नाहीं असें ह्मणतो. काय असेल तें असो! परमेश्वराच्या दयेनें भलताच प्रसंग येऊं नये ह्मणजे बरें! (उघडपणें) अरे बोवा, चल, लौकर चल.

**खवाल०**–(मनाशीं) ह्याच्या चेहऱ्यावरून व तिकडे जाण्याच्या जलदीवरून हा कोणी तरी अगदीं जवळचा नातलग असावासा वाटतें. (उघडपणें, बोट दाखवून) हीच धर्मशाळा. हिच्या पाठीमागेंच विहीर!

## प्रवेश सातवा.

**स्थळ.** धर्मशाळेची विहीर.

**पात्रें.** अण्णासाहेब, बाळासाहेब, अन्नपूर्णा, डॉक्टर, बोवाजी, सत्यभामा, बाबासाहेब, लक्ष्मीबाई, गणोजी वगैरे.

( अण्णासाहेब दुरूनच ओळखतात व परस्परें धांवत जाऊन मिठी मारतात. )

**अण्णासाहेब**—घात झाला हो घात झाला! सर्वस्वी आमचा घात झाला! आतां तुह्मी दुसरें लग्न करण्यास मोकळे झालां! खुशाल दुसरें लग्न करा!

**बाळासाहेब**—काय हें भलतेंच बोलणें! मी आणि दुसरें लग्न करीन? ही तुमची मुलगी मेली असें नका समजूं! हा माझा प्राण निघून गेला! ( असें ह्मणून तिच्या अंगावर पडतो व बेसावध होतो. )

**अण्णासाहेब**—( त्यास आवरून धरतात, तो मान टाकलेला पाहून ) अरे गणोजी पहातोस काय? हा दुसरा प्रसंग येतो आहे. यांनीं डोळे पांढरे केलेना? अरे कांदा तरी आण हुंगवायला. ( बोवाजीकडे वळून ) येथें कोणी डॉक्टर अगर वैद्य मिळेल काय?

**बोवाजी**—है. यह इस्टेसनपर एक बडा अच्छा डॉक्टर है. उस्कू मैं बुलाताहूं. तुम डरो मत. ( असें ह्मणून डॉक्टरास बोलावूं जाऊं लागतो तों रस्त्याकडे डॉक्टरच दृष्टीस पडतो, त्याजकडे पाहून ) मेहरबानी करके पहिले इदर चलो! ह्यां दो खुन हो रहे हैं! ( डॉक्टर व त्याच्या बरोबर मेडीसिनचेष्ट आणि विजेची पेटी घेतलेला एक चाकर येतो. )

**डॉक्टर**–भिऊं नका. पहिल्यानें भोंवतालची मंडळी दूर व्हा. मला नीट पाहूं द्या.

( बाळासाहेबाच्या नाकाशीं कुपी धरतो व बाळा-साहेब सावध होतो. )

**बाळा०**–प्रिये! शेवटीं गेलीस ना मला टाकून! झाला आतां माझा संसार! डॉक्टरसाहेब मला कशालाहो सावध केलात? मी मेलों असें समजून जर माझें दहन झालें असतें तर आह्मी परलोकीं तरी सुख भोगिलें असतें! प्रिये! मजपासून खचीत तुला सुख मिळणार नाहीं असें मनांत आणून मला टाकून तूं गेलीस काय? लाडके, आतां मी कसा जीव ठेवूं? प्रिये! आतां मी प्रिये असें कोणाला ह्मणूं? ( असें ह्मणून पुन्हां तिच्यावर पडतो व बेशुद्ध होतो. )

**डॉक्टर**–( पुन्हा कुपी लावून सावध करितो आणि अवसानानें ) हें काय? हा मूर्खपणा कोठला? मेल्याबरोबर मरायचें आहे कीं काय? ही केव्हां विहिरींत पडली व हिला केव्हां काढली? मला पाहूं द्या. ( त्याहाकून पाहून नाडी पहातो व हृदयास नळी लावून सांगतो कीं ) भिऊं नका. अजून थोडी आशा आहे. ( कुपी नाकाशीं लावतो. विजेची पेटी लावतो व ती दीर्घ श्वास सोडून सावध होऊं लागते. )

**अन्नपूर्णा**–अंः! अंः! ऊं! ऊं! ऊंः! (आळस देते.)

**डॉक्टरसाहेब**–( नाडी पाहून ) आतां हिला कोरडें वस्त्र नेसवा आणि शेकीत बसा. आतां हिला भीती नाहीं.

हिच्या पोटांत पाणी मुळींच गेलें नाहीं. ही शोकानें बेसावध झाली होती.

**अण्णा०**—डॉक्टरसाहेब ! आपण आज अवचित येथें आलां ह्मणून; नाहीं तर अंमळ उशीर झाला असता तर दोन्ही खुनच झाले असते. आपले फार उपकार आहेत. आपणाला आज ईश्वरानें येथें पाठविलें असेंच म्हणावयाचें! हें घ्या. (फी देतो.)

**बाळा०***—आय् ऍम हायली ओब्लाइज्ड टु यू जन्टलमन्, फॉर धि व्हॉल्युएबल सर्व्हिसीस् यू हॅव् रेंडर्ड टु मि जस्ट नाऊ. आय् ऍम सॉरी आय ऍम नॉट् एबल टु मेक ए स्प्लेंडिड् रिटर्न फॉर धिस् काइंड ऍक्ट ऑफ् योर्स, बीइंग फॉर धि प्रेझेंट ए मियर पेनिलेस ट्रॅव्हलर. आय् क्यान् डू नथिंग मोअर फॉर धि प्रेझंट दॅन् प्रोस्ट्रेट् मायसेल्फ बिफोर यू. (पायां पडतो.) यू उइल बी, डिपेंड अपॉन मी, ऍम्प्ली रिवॉर्डेड् फॉर धि काइंडनेस् यू हॅव शोन् टु मी नाऊ. प्रे, वाट्स् योर नेम ?

---

* इंग्रेजी भाषणांतील भावार्थ मराठी वाचकांकरितां खालीं देतों.

**बाळासाहेब**—आपण ह्या वेळेस जे माझ्या उपयोगीं पडलां आहां त्याबद्दल मी आपला फारच आभारी आहें ! हल्लीं मी प्रवासांत असल्यामुळें मजपाशीं कांहीं आपल्यास यथायोग्य माझ्या मनासारखें बक्षीस देण्यास सवड नाहीं, यामुळें मी फार दिलगीर आहें, आपल्यापुढें लोटांगण घालण्याशिवाय मला हल्लीं दुसरें कांहीं करवत नाहीं. (पायां पडतो.) मजवर जी आपण कृपा केलीत त्याजबद्दल मी आपणांस चांगलें बक्षीस देईन इतका मात्र मजवर आपला भरंवसा असूं द्या. आपलें नांव काय बरें ?

**डाक्टर**-*बी॰ डी॰ व्ही॰ एम् डी. ( बाळासाहेब आपल्या नोट बुकावर लिहून घेतो ) आय् ऍम् क्काइट कन्टेंट् उईथ वॉट् योर फादर-इन-लॉ गेव्ह मी. इट्स क्काइट् इनफ्. नो ! नो ! आय् डोंट उविश फॉर मोअर. योर केस आय शुड से वॉज नॉट ऍट्टॉल होप्लेस; बट् धिस् योर वाइफ् हिअर उड् हेव् शुअर्ली लेफ्ट धिस् वर्ल्ड अंडर धि ट्रीट्मेंट, आय् ऍम् शॉक्ड टु से, ऑफ् एनी बार्बरस् मेडिकल ॲड्वायसर, ओन्ली ए स्लाइट् पाल्पिटेशन ऑफ् हर हार्ट वॉज गोइंग ऑन्, युसी !

† **बाळा॰**-ऍंड् इटिज् फॉर हर सेक् आय् से दॅट् आ-य् फील् ओब्लाइज्ड, ऍज् फॉर माय् ओन् लाईफ् आय् नेव्हर केअर्ड.

§ **डॉक्टर**-वेल्, नाऊ गुडबाय !

( बाळा साहेबाशीं शेकह्यांड करून जातो. )

---

* **डाक्तर**-बी॰ डी॰ व्ही॰ एम्. डी. आपल्या सासऱ्यानें जें मला दिलें त्यांत मला पूर्ण संतोष आहे. दिलें एवढें बस्स आहे. नाहीं नाहीं मी जास्ती इच्छित नाहीं. समजलांत. तुमच्या प्रकृतीविषयीं ह्मटलें ह्मणजे कांहीं धास्तीसारखें नव्हतें, पण भलत्याच अडाणी डाक्टराच्या हाताखालीं ही तुमच्या बायकोची केस गेली असती तर मला सांगायला फार वाईट वाटतें कीं, या जगाला ती खरोखर मुकली असती, समजलांत. हिची नुस्ती हृदयाची क्रिया मात्र थोडीशी चालत होती.

† **बाळासाहेब**-आणि मी जो एवढा आपला आभारी आहें तो केवळ तिच्यासाठींच. माझ्या जिवाची मी ह्या वेळेस मुळींच पर्वा ठेविली नव्हती.

§ **डाक्टरसाहेब**-बरें आतां रजा, मागतों. उशीर झाला.

**बोवाजी**—बहोत अच्छा आदमी है. आज भगवतके मेहरसे ह्यां डॉक्टर साब् आ पोहोंचे. आपका तक्‌दीर कहो या नसीब कहो बहोत अच्छा है !

**अण्णासाबेह**—तुह्मी आह्माला ईश्वर भेटलां. तुह्मी जर लौकर येऊन पोंचलां नसतां व विहिरींत उडी टाकली नसती तर हिनें विहिरींतच राम ह्मटला असता ! जांवईबोवा, मुख्य उपकार ह्यांचे आहेत. ह्यांच्या पायां पडा.

**बाळासाहेव**—( पायां पडतात ) आज आपण मला जीवदान दिलेंत. आपले उपकार जन्मभर फिटणार नाहींत. मी आपली चांगली सेवा करीन !

**बोवाजी**—भगवतके मेहरसे सब अच्छा होता है. मैं कौन जीवदान देनेवाला. यह माई बडी भाग्यवान् है. ( स्त्रीकडे वळून ) अब् तो आनंद हुवा ?

**सत्यभामा०**—( पायां पडते ) आपल्यासारख्या साधूंच्या दर्शनानेंच हा प्रसाद मिळाला ह्मणावयाचा. ही घ्या तुह्माला. ( त्याला बनात देते ) ( इतक्यांत बाबासाहेब व लक्ष्मीबाई येतात. )

**बाबा०**—त्या डॉक्टरानें सांगितलेली धर्मशाळा हीच ! तीं तिकडे बरींच माणसें दिसताहेत. चल लौकर लौकर.

( येऊन पोहोंचतात, व्याही व्याही नमस्कार करितात, आणि बाळासाहेब उठून आईजवळ येतो. )

**बाळा०**—आई तूं ग कोणीकडे इकडे ?

**लक्ष्मीबाई**—शाबास ! बाळा शाबास ! अरे आमच्या तोंडचें पाणी पळालें होतें ! एकदां तुझं तोंड कसं दृष्टीस

पडतं असं झालं होतं आणि ह्मणे ( वेडाऊन ) तूं ग कोणीकडे इकडे ? वहावारे ! आतां दृष्टीस पडलास ह्मणून हसूं येतं ! नाहीं तर रडून भुई थोडी झाली होती ! ( मिठी मारून मुका घेते ). ( लोकांकडे पाहून ) पहा काय चमत्कार आहे तो ! उलटा मलाच ह्मणतो ( हेल काढून ) तूं ग कोणीकडे इकडे ? ( बोवाजीकडे दृष्टी जाते ) बाबासाहेबांकडे वळून ) ऐकलं का ? हा पहा केवढा लाभ झाला ! हेच ते साधुमहाराज ( पायां पडते ) बाबासाहेब पायां पडतात ) पाहिलें ना ? कसं रूप आहे तें ! प्रतिईश्वरच आहे तो ! आतां त्याला विचारावं कीं आमचं भोक्तृत्व अजून किती आहे तें ! ( बाळाकडे वळून ) तूं देखील पायां पड ह्मणजे परमेश्वर तुला चांगली बुद्धि देईल. ( बोवाजी मनांत भिऊन आतां आपली धडगत नाहीं असें ह्मणतो व पायां पडणारास मोठ्या धीरानें भगवत् तेरा कल्यान करेगा, असें आशीर्वचन देतो आणि चिंताग्रस्तचर्येनें शंकर शंकर ह्मणतो. )

**बाळा०**—( आपणाशींच ) बहुधा हा तोच ईश्वर असेल. ( दांत ओंठ खाऊन ) ह्यानेंच आमच्या संसाराचा पूर्ण बिघाड करून टाकिला असावा. कळेल आतां ( उघडपणें ) मी त्याच्या पायां पडलों आहें ! त्याचे मजवर फार उपकार आहेत ! आज तो येथें नसता तर मी असा तुमच्या दृष्टीस पडलोंच नसतों ! पण बाबा तुह्मी इकडेसच कसे आलां ?

**बाबा**०—अरे ! तें कांहीं विचारूं नकोस. तूं नाहींसा झाल्यावर तिसरा प्रहरपावेतों तुला सगळ्या इंदूरभर शोधिला. कोठेंच तुझा पत्ता लागेना ! ज्याला विचारावें तो

आपला कानावर हात ठेवी ! तिसरा प्रहर होऊन गेला ! आह्माला, हिला, घरांतील सर्व मनुष्यांना, जेवणें सुचेना कीं खाणें सुचेना. इतक्यांत टपालाच्या शिपायानें एक तुझ्या नांवाचें पत्र आणलें. मित्रचंद्र अशी सही आहे त्याजवर ! तें पत्र आह्मी फोडून पाहिलें आणि आमची कल्पना बसली कीं, ही स्वारी तिकडेच गेली असावी ! दुसरी गोष्ट नको बोलावयाला ! त्यानें स्पष्ट लिहिलेंच आहे कीं, तुह्मी तावडतोब निघून या. तुमची नेमणूक हैदराबादेस काईमची झाली ! आणखी–

**लक्ष्मीबाई**–पुरे ! पुरे ! तें भारूड मग सांगू सावकाश ! अगोदर त्याला साधु महाराजांच्या पायां पडूं द्या, व चांगला आशीर्वाद घेऊं द्या !

**अण्णासाहेब**–तो पुष्कळ वेळ पायां पडला आहे. साधु महाराजांनीं तर हिला विहिरींतून बाहेर काढली. ( त्रिंगीकडे बोट दाखवतो ) हा त्यांचे उपकार जन्मभर विसणार नाहीं.

**बोवाजी**–कायके उपकार ! भगवतनें कुव्वेमेंसे निकाला. हम् कोन निकालनेवाले ! देखो भगत, मैं कहताहूं ये सत् है के झूट ? भगवत्के हुकूम बगर झाडका पत्ताभी न हाल सकेगा ! इतने दिन तक तुमारा तकदीर बहुत बुरा था, लेकीन आज भगवत्नें कैसा अच्छा किया है. देखो. ये तुमारी बहू जो है इसका पुनर्जन्म हो रहा है ! और आपका लडकाभी नया हो रहा है. ये दोनो जी आज दुनयामें नये पैदा हुवे हैं. समजो ! आज दीनसें आपनेपर भगवतकी कृपा रोज बरोज बढनेवाली है. अब अच्छा तऱ्हेसे दोनोंका प्रतिपाल करना और कुच पक

मनमें रखना नहीं. आनंदमें रहना. भगवत तेरा कल्यान करेगा !

**लक्ष्मीबाई**—तथास्तु. ( पायां पडते ) आपले आमच्यावर मोठे उपकार आहेत.

**बाबासाहेब**—तथास्तु. ( पायां पडतात ) ( अण्णासाहेबही पायां पडतात. )

( बोवाजी शंकर शंकर ह्मणत आशीर्वाद देतात बाळासाहेब एकसारखा बोवाजीच्या तोंडाकडे पहात रहातो. )

**लक्ष्मीबाई**—अरे एक सारखी तंद्री कसची लागली आहे तुझी ? त्यांच्या पायां पड !

**बाळासाहेब**—( मनाशीं पुटपुटतो व अधिकच टवकारून बोवाजीकडे पहातो ) ह्या दुष्टानें आह्माला इतकें संकटांत घातलें. ह्याजबद्दल मी ह्याचे आभार मानूं कीं ह्याला या वेळेस चांगलें प्रायश्चित्त देऊं ? आज तर ह्यानें मजवर मोठे उपकार करून ठेविले आहेत आणि मी जन्मभर हे उपकार विसरणार नाहीं असें त्याजपाशीं बोलून चुकलों आहें ! मी करूं तरी काय ! मी ह्या वेळेस मोठ्या घोंटाळ्यांत पडलों आहें !

( एकसारखा आभाळाकडे किंवा बोवाजीकडे पहातो ).

**लक्ष्मीबाई**—अरे बाळा, विचारांत कसला पडला आहेस ? साधूमहाराजांच्या पायां पडतोस ना ?

**बोवाजी**—( मुलाच्या मुद्रेकडे पाहून ) नहीं नहीं ! पाव पडनेका कुच कारन नहीं है. तुमारे लडकेपर हमारी बहोत मर्जी खुष है, और ओ हमारा भगत बहोत पुनवान् है ! हम उस्कू हमारा सब पून दे देते हैं.

( असें ह्मणून त्याच्या पायां पडूं लागतो. ) ( बाळा जागचा हालत नाहीं. )

**सर्व लोक**—हं, हं, हें काय ? ( असें ह्मणून त्यास उठवूं लागतात. )

**बाळा**--आतां उठा ! उठा ! ( हातानें पलीकडे ढकलूं लागतो. )

**बोवाजी**—अब तूं ऐसा मत् कर. मैं तेरेकूं दो मंत्र सुनाताहूं, इस्से तेरा कल्याण होनेवाला है. इसवास्ते तूं जरा इसतरफ तो आव.

**बाळा०**—पुरे झालें आमचें कल्याण ! बोवाजी, आतां माझं पित्त खवळूं नका ! तुमचा हिला विहिरींतून बाहेर काढण्याच्या कामीं फार चांगला उपयोग झाला ह्मणून मी बोलून चुकलों कीं तुमचे उपकार जन्मभर विसरणार नाहीं व इतक्या करितांच क्षमा करितों, नाहीं तर मी तुला खरंच सांगतों कीं, ह्या वेळेस तुला चमत्कारच दाखविला असता !

**लक्ष्मीबाई**—कां, त्यांनीं असा तुझा कोणता अपराध केला ?

**बाळा०**—आई ! काय सांगूं तुला ? सर्वस्वी घात करणारा हाच ! ह्यानेंच तुझ्या मनांत ह्या मिथ्याशंकेचें बीजारोपणा केलें ! ह्यानेंच आपल्या कुळाचा क्षय होण्याजोगी करणी केली होती ! जर ह्याची व माझी काल गांठ पडली असती व ही ओळख पटली असती तर आः मी तर ह्याच्या नरडीचा घोट घेतला असता ! आः !

**बोवाजी**—( हात जोडून ) मेरेपर इतना गुस्सा मत कर. मैं ए कामसें एक निमित्तमात्र हूं. जैसा कुवेमेंसे आ-

पके औरतकूं जिंदी निकालनेका जस मुझे दिया है. वैसा यह काम करनेवाला भी दुसरा अदमी है ! मैं एक निमित्तका कारन हूं. इसमें मेरी एक तकसीर है, लेकीन आपका दुष्मन् तात्यासाब आगलावे था. उन्होंनें मेरे हातसें ये काम किया है. उन्होंनें मुझे कहा—

**बाळा०**—पुरे पुरे तें सगळें माझ्या लक्ष्यांत आलें !

**अण्णासाहेब**—काय ! त्या आगलाव्यानें ही आग लाविली ? धिःकार असो तुझ्या करणीला ! उगीच नाहीं मरते वेळेस तुला किडे पडले ! करणी तशीं फळें ! भोग ! भोग ! ह्या जन्मीं भोग ! आणि उरलीं असतील तीं पुढच्याजन्मीं !

**बाळा०**—काय ? तात्या मेला ? कधीं ? काय चमत्कार आहे ? चांडाळ करणी होती त्याची चांडाळ करणी ! मला दुसऱ्या लग्नाचा बोध करण्याला एकदां कालेजांत आला होता ! मी त्या वेळेस त्याची पक्की ढोंपरभर बाहेर काढली होती.

**बोवाजी**—देखो भगत ! मैं कहताहूं. अब किसीपर घुस्सा मत कर. ये काम करनेवाला जो मूळ तात्या था उसकी क्या हालत हो गई ये आपके सुन्नेमें आज आयी. ये काम करनेसें मेरेकूं बहोत पश्चात्ताप हुवा है. ह्यांतक् इसका परिणाम होगा ये कल्पनाभी मेरे दिलमें आयी नहीं ! दयावंत, अब वैसेही समझना के ये बात आपके तकदीरमें लिखी होगी ! भगवतकी करनी अगम्य है ! देखो मेरे हातसे आपका बहोत नुकसानका काम हो रहाथा. और यह भगवतनें मेरे हातसे आपके औरतकूं जिंदी निकाली है. क्या अजब बात है ! कहां तुम थे ! कहां हम थे ! अब जंगलमें मंगल कैसा बन रहा है ! कैसी रीतसें सबकी मुलाकात हुई ? क्या हा-

लत हो रहीथी? कैसा डॉक्टर आया? आपकूं होपमें लाया! आपके औरतकूंभी उठायी! इनके मावापकूं बहोत आनंद हो रहा है! आपकूंभी बहुत आनंद हो रहा है! आपके मावापकूंभी बहुत आनंद हो रहा है! देखो यह एक चमत्कारिक नाटक बन रहा है! और ये देखनेवालेकूंभी बहुत आनंद होता है! तो अब् आपनें इतनाही करना के मेरा गुन्हा माफ करना और मुझेभी आनंद देना. इस्सें आपकूं रोज बरोज आनंदही बढ जावेगा. और आपके वहुका और आपका प्रतिपाल यह माईनें अच्छे तऱ्हेसें करना. कुच षक् मनमें रखना नहीं. सब गोतनें आपके अंतरमेंका सब भेद छांडना. और आनंदमें रहना. यह मेरी बिनती है.

**लक्ष्मीबाई, बाबासाहेब** व **अण्णासाहेब**—ठीक आहे! ठीक आहे. असेंच!

**बाळासाहेब**—ठीक आहे तर ठीक आहे!

**बोवाजी**—मैं आपका बहुत उपकारी हूं. क्या अजब बात है! भगवत्की करनी अचिंत्य है. जंगलमें मंगल हो रहा है! शंकर! शंकर!

( अन्नपूर्णा लक्ष्मीबाईच्या पायां पडते व सर्वांच्या पायां पडते. लक्ष्मीबाई तिला पोटाशीं धरते. )

**समाप्त.**

# विक्रीस तयार.

---

## विनायक कोंडदेव ओककृत
## सवाई माधवरावसाहेब पेशवे
### ह्यांच्या कारकीर्दीची गोष्ट.

किंमत तीन आणे, डांकहांशिल अर्धा आणा.

---

## स्वदेशाभिमान.

ह्यांतल्या कित्येक विषयांची अनुक्रमणिका. पृष्ठ.

आमचे हक्क आह्मांकडे राहूं दिले, तर तुह्मी आमचे राजे. ... २
द्रव्य नको, स्वदेशाभिमान पाहिजे. ... ... ... ८
बहुमान शस्त्रास्त्रांत आहे. ... ... ... ... २६
मरण पतकरलें; देशाचा अपमान नको.... ... ... ३
मरायाचें; पळायाचें नाहीं. ... ... ... ... १४
ह्यातारीचा स्वदेशाभिमान. ... ... ... ... १५
राज्याधिकार नको; स्वदेशस्वातंत्र्य पाहिजे. ... ... २०
स्वातंत्र्य द्या, नाहीं तर मरण द्या. ... ... ... १८
स्वाभिमानापेक्षां स्वदेशाभिमान अधिक... ... ... ११
ही तरवार घे. ... ... ... ... ... १

किं० २ आणे, पो० ॥ आणा.

---

**फुलांची परडी**—महाराष्ट्रभाषाकाव्यसंग्रह हा बाग; ह्यांत स्वस्थपणें संचार करीत असतां, जागोजाग, अत्यंत मनोरम अशीं जीं लहान लहान पद्यपुष्पें आढळलीं, त्यांचा संग्रह ह्या पुस्तकांत केला आहे, ह्यांतलें कोणतेंही पृष्ठ काढून कोणतेंही पद्य वाचावें, तर त्यापासून मनास बोध आणि रंजन हीं प्राप्त व्हावीं अशी योजना केली आहे. तुकाराम, मोरोपंत, वामन, श्रीधर, मुक्तेश्वर, इत्यादिकांच्या काव्यांतले लहान लहान निवडक निवडक वेंचे ह्यांत घेतले आहेत. पृष्ठें ६०.

किं० ४ आणे, पो० ॥ आणा.

**नळदमयंतीचरित्र.**—हें श्रीमहाभारताच्या वनपर्वांतून महाराष्ट्र भाषेंत लिहिलें आहे. किं० ४ आणे, पो० ॥ आणा.

**सद्वर्तन.**—हें पुस्तक रा. गोविंद शंकरशास्त्री बापट ह्यांनीं स्माइल्स् साहेबांच्या 'क्यरेक्टर' ह्या नांवाच्या इंग्रजी पुस्तकाच्या आधारानें रचिलें. किं० १२ आणे, पो० १॥ आणा.

**सावित्रीचरित्र.**—यांत, सावित्री ह्मणून सुशीला, रूपवती, विदुषी अशी राजकन्या होती, तिला बापानें स्वयंवर करण्यास सांगितलें, तिनें सामान्य स्त्रीस्वभावाप्रमाणें ऐश्वर्याकडे लक्ष न देतां गुणांवर लक्ष देऊन पति वरिला. किं० १ आणा, पो० ॥ आणा.

**स्त्रीशिक्षणबोध.**—ही एक सुलभ पद्यात्मक गोष्ट अशी आहे कीं, बापानें मुलीला, भावानें बहिणीला, नवऱ्यानें बायकोला, आणि आमच्या देशहितेच्छु जनांनीं आपल्या सर्व देशभगिनींस वाचून दाखविली असतां, आमच्या देशांतल्या स्त्रीशिक्षणाच्या वृद्धीस मोठें साह्य होईल. किं० २ आणे, पो० ॥ आणा.

**श्रीमद्भगवद्गीता.**—सुबोधचंद्रिका नामक महाराष्ट्र भाषाटीकासहिता. इजमध्यें मूळगीताग्रंथ असून, त्याखालीं सर्वमान्य टीकाकारांच्या आधारानें, अत्यंत सुबोध, सरळ आणि गोड, असा चालू शुद्ध भाषेनें त्याचा अर्थ दिला आहे.

किंमत १० आणे, पो० १ आणा.

**स्त्रीगीत.**—जुन्या व नव्या दोन्ही पक्षांच्या मंडळींतील स्त्रियांस गावयास योग्य अशीं गाणीं ह्या पुस्तकांत नवीन रचून घातलीं आहेत. भाषा स्त्रियांस समजण्याजोगी आहे, व आंत सुंदर चित्रें आणि उखाणे आहेत. किं० ३ आणे, पो. ॥ आणा.

**द्रौपदीहरण.**—हें महाभारतांतील आख्यान महाराष्ट्र भाषेंत केलेलें आहे. किं० १ आणा, पो० ॥ आणा.

☞ हीं पुस्तकें, रोख पैसा आल्यास मुंबईंत काळकादेवीच्या रस्त्यावर '**निर्णयसागर**' छापखान्यांतून रवाना होतील.

## विक्रीस तयार.

### प्राकृत.

| | कि. रु. आ. | ट. आ. |
| --- | --- | --- |
| [illegible] कथा. ... ... . | ०—१ | ०॥ |
| [illegible]संवाद. .. ... ... | ०—१॥ | ०॥ |
| [illegible]चरित्र. ... ... ... | ०—[illegible] | ०॥ |
| [illegible]चरित्र .. ... .. | ०—१२ | २ |
| जन्माष्टमी ह्मणजे श्रीकृष्णजन्मकथा. ... | ०—२ | ०॥ |
| विचारसाधन. ... ... ... . . | ०—[illegible] | ०। |
| [illegible]. ... ... ... | ०—[illegible] | ०। |
| [illegible]तल. .. . . . | [illegible]—[illegible]॥ | ०॥ |
| [illegible]... . . .. | ०—[illegible] | [illegible]॥ |
| [illegible] प्रहसन.... . . ... | [illegible] | ०॥ |
| [illegible]. ... ... ... .. | ०—[illegible] | ०॥ |
| नीलकंठ[illegible]संवाद. ... . . . | ०—२ | ०॥ |
| हस्तामलकस्तोत्र. ... .. . | ०—२ | ०॥ |
| [illegible]. ... ... ... ... | ०—[illegible] | [illegible]॥ |
| [illegible]. ... .. | ०—[illegible] | ॥ |

### हिंदुस्थानी.

| | | |
| --- | --- | --- |
| योग[illegible] प्रकरणें .. ... ... | [illegible]—० | [illegible] २ |
| न्यायप्रकाश .. ... ... | ७—० | [illegible] |
| योग[illegible] प्रकरणें २ [illegible] व वैराग्य ... | ०—१४ | [illegible] |
| तत्त्वबोध. ... ... . . | ०—२॥ | |
| आत्मबोध. ... ... ... .. | ०—८ | [illegible]॥ |
| [illegible]. . ... ... | ०—१ | ०॥ |

[illegible] पुस्तकें मुंबईत 'निर्णयसागर' छापखान्यांत विकत मिळतील.